पुणे, सोमवार, १० फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 75 • वर्ष ४ थे, अंक ७५ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



दोनशे कोटींची 'झाडाझडती'...!

P३



रोहित शर्माचा झंझावात

१२



## At a Glance


### ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा, २ जवान शहीद

अखेरची लढाई : ना. फडणवीस



**छत्तीसगड :** छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात रविवारी (दि. ९) सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार झाले. चकमकीदरम्यान चार जवान गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यापैकी दोन जवानांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. परिसरात अजुनही शोध मोहीम सुरू आहे.

रविवारी सकाळी बिजापूर आणि नारायणपूरला लागून असलेल्या महाराष्ट्र सीमेवरील इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलात सुरक्षा कर्मचाऱ्यांचे एक पथक नक्षलविरोधी कारवाईवर असताना चकमक सुरू झाली. या चकमकीत ३१ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात जवानांना यश आले. » पान ७ वर



### २७ लाख सूर्यनमस्कार

**पुणे :** पुण्यामध्ये जी सृजनात्मकता आढळते ती कदाचित महाराष्ट्रातील कुठल्या शहरात आढळेल? उत्तम आरोग्यासाठी सूर्यनमस्कार गरजेचा परंतु या सूर्यनमस्काराचे प्रमोशन करण्यासाठी पुणे लोकमान्य फेस्टिवल आणि मनोवर्धन योग संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सूर्यनमस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आली. रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त जवळपास पंधराशे साधकांनी 108 दिवसात तब्बल 27 लाख सूर्यनमस्काराचा संकल्प पूर्ण केला गणेश सातपुते यांनी स्पर्धेच्या आयोजन केले होते.

» सविस्तर वृत्त पान ३ वर





सत्ता आणि सत्य हे दोन परस्पर विरोधी विचारधारा आहेत आणि या दोघांचाही प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे आपण कोणत्या दिशेने जायचे हे विद्यार्थ्यांनी करिअरच्या महत्त्वाच्या टप्प्यावर ठरविले पाहिजे

**- डॉ. कन्हैया कुमार**
( भारतीय छात्र संसदेच्या व्यासपीठावरून )

» सविस्तर वृत्त पान २ वर

### रशिया-युक्रेन युद्ध थांबणार? ट्रम्प यांचे पुतिन यांच्याशी संभाषण

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सातत्याने रशिया-युक्रेन युद्ध थांबण्याची गरज व्यक्त केली होती. आता राष्ट्राध्यक्ष झाल्यावर त्यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवर संभाषण साधले आहे. २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धाला तोंड फुटल्यानंतर, अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांच्या राष्ट्राध्यक्षांनी प्रथमच परस्परांशी संवाद साधला आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, ट्रम्प म्हणाले की, आमच्याबरोबरच पुतिन यांनाही युद्धात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांची चिंता आहे. सर्वसामान्यांची होणारा हा संहार लवकरात लवकर थांबावा, अशी माझी इच्छा आहे. हे युद्ध जवळपास तीन वर्षांपासून सुरू असून मी राष्ट्राध्यक्ष असतो, तर हे युद्ध सुरूच झाले नसते, असे ट्रम्प म्हणाले. पुतिन यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. बायडेन यांनी अमेरिकेसाठी लाजिरवाणी परिस्थिती निर्माण केली असून, त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी आम्हाला थोड वेळ हवा आहे. सध्या तेच काम आम्ही करत आहोत, असेही ते म्हणाले. » पान ७ वर

# २ महिन्यांची प्रतिक्षा

**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकारणाला ढवळून काढणाऱ्या आणि जातीपातीच्या आरोप प्रत्यारोपण खाली सामाजिक स्वास्थ्य घडून करणाऱ्या संतोष देशमुख यांच्या निर्गुण हत्येच्या प्रकाराला आज दोन महिने पूर्ण झाले. याची संधी साधून सत्ताधाऱ्यांवर होत असलेले वार आणि प्रचंड आरोप सहन करून देखील एका मंत्र्याला देण्यात येणारे संरक्षण याच्या वादळाखाली दोन महिने होऊन देखील सापडत नसलेल्या आरोपीची गुढ भयाण शांतता महाराष्ट्राला आता असहनीय झाली आहे !



**महाराष्ट्र पोलिसांना तब्बल 60 दिवस एखाद्या हाय प्रोफाईल गुन्हेगाराला शोधता आले नाही ही अस्वस्थता प्रत्येकाच्या मनात आहे. त्यात मनोज जरांगे, अंजली दमानिया, सुरेश धस, देशमुख कुटुंबीय यांच्या रोजच्या काही ना काही उक्ती आणि कृतीमुळे राजकीय आणि सामाजिक स्वास्थ्याची घडी अद्यापही बसू शकली नाही.**

**दुर्दैवाने मराठा विरुद्ध वंजारी, मुंडे विरुद्ध मुंडे विरोधक, सरकार विरुद्ध आंदोलककर्ते यांच्यात चालू असलेल्या टोकाचा संघर्ष महाराष्ट्राची सामाजिक घडी विस्कटत आहे.**



संतोष देशमुख खून प्रकरणाला आज दोन महिने पूर्ण झाले परंतु मुख्य आरोपी आंधळे हा अद्यापही अटकेत नाही. हे गृहमंत्रालयाचे आणि महाराष्ट्र पोलिसांचं अपयश असल्याचे सार्वत्रिक भावना. विरोधकांसह सत्ता पक्षाच्या आमदार, नेत्यांचीही याबाबत एक वाक्यता आहे. दोन महिन्यानंतरही मुख्य आरोपी सापडत नसल्याने आणि देशमुख कुटुंबियांकडून दैनंदिन मिडीया कव्हरेज सुरू असल्याने सहानुभुती आणि संतापाच्या भावना वाढत आहेत.



अंजली दमानिया यांनी हे प्रकरण पुढे घेतल्यानंतर फडणवीस आणि अजित पवार यांच्या अडचणी वाढल्या . मंत्र्यांना भेटून थेट पुरावे हाती देत आकडेवारी निहाय भ्रष्टाचार आणि मुंडे यांच्या सहभागीत्वाची पोलखोल दमानिया यांनी केली त्यामुळे मुंडे यांच्या विरोधात सामान्य नागरिकांचा रेटा नव्याने लागला गेला. अंजली दमानिया यांनी हा संघर्ष जातीय विवादातून बाहेर आणत त्याला सर्व सामान्यांच्या संघर्षाचे स्वरूप दिले.



सत्ताधारी भाजपचे आमदार असतानाही धनंजय मुंडे वाल्मीक कराड हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे ठामपणाने सुरेश धस यांनी आजही सांगितले सरकारमध्ये असून देखील त्यांचा चालल्या प्रखर विरोध भाजपाला डोकेदुखी ठरला आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा हाच या संपुर्ण संघर्षामधील कळीचा मुद्दा ठरला आहे. मुंडे यांचा राजीनामा घेतला तर थेट अजीत पवार यांच्या राजीनाम्यावरून विरोधक रणकंदन माजवतील असा अंदाज आहे.



विष्णू चाटे यांचे त्यांच्यासह पकडलेल्या आरोपींच्या मोबाईलचे सीडीआर का तपासले जात नाहीत हा दमानियांचा कळीचा प्रश्न? सी डी आर मुळे सर्वच लागेबांधे समोर येत असल्यामुळे सरकार यामध्ये सबुरीची भूमिका घेत असल्याचा त्यांचा आरोप. त्यामुळे मुंडे यांच्या राजीनाम्याशिवाय राजकीय दबाव संपणार नाही आणि खरे गुन्हेगार समोर येणार नाहीत हा त्यांचा आग्रह कायम.



संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, मुलगी वैभवी यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि दररोज मीडियासमोर वक्तव्य, आंदोलनातील सहभाग, नेत्यांच्या गाठीभेटी यामुळे हे प्रकरण दिवसेंदिवस अधिक उग्र होत असल्याचे दिसत आहे. धनंजय देशमुख यांनी आज, आता सहन होत नाही अशी उद्वेगी प्रतिक्रिया देत ही अटीतटीची वेळ असल्याचे सांगितले. वैभवी देशमुख हिनेदेखील आज पुन्हा संवेदनशील प्रतिक्रिया देत धग कायम ठेवली.

### मोदींच्या परदेशवारीनंतर शपथविधी





**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यानंतर दिल्लीच्या नवीन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी समारंभाची तारखी ठरणार आहे. १२ अणि १३ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मोदी अमेरिका दौऱ्यावर आहेत. त्यामुळे दिल्ली मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी १३ फेब्रुवारीनंतर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्रीपदी कोणाची निवड होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर अतिशी यांनी रविवारी (दि. ९) मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी राजभवन येथे अतिशी यांचा राजीनामा स्वीकारला. त्यानंतर त्यांनी दिल्लीची सातवी विधानसभा बरखास्त झाल्याची घोषणा केली. आता दिल्लीत भाजपला नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी ९ फेब्रुवारी पासून राष्ट्रीय राजधानी प्रदेश दिल्लीची सातवी विधानसभा बरखास्त करत आहे, असे आपल्या आदेशात म्हटले आहे. यानंतर भाजपच्या शिष्टमंडळाने राजभवनात नायब राज्यपालांची भेट घेतली, यानंतर लवकरच दिल्लीच्या नवीन मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा मुहूर्त ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शनिवारी (दि.८) दिल्लीच्या मतमोजणीत ७० सदस्यांच्या विधानसभेत » पान ७ वर



# तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर द्या..!

## मेजर जनरल के. के. चक्रवर्ती यांचे प्रतिपादन : दयानंद सागर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या (एआयटी) ओपन सोर्स सॉफ्टवेअर क्लबच्या वतीने आयोजित 'इनर्व्ह ९.०' या भारतातील सर्वात मोठ्या विद्यार्थी-प्रेरित राष्ट्रीय हाकेथॉनचे विजेतेपद बंगळुरू येथील दयानंद सागर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संघाने यांनी पटकविले. विवेक अगरवाल, नमन पार्लेचा, भुवन एम., मोहित नागराज यांच्या संघाने ओपन इनोव्हेशन कॅटेगरीमध्ये लुमिनोसिटी प्रकल्प सादर केला. विजेत्या संघाला रोख १,२५,०००/- चे पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात आले.

हाकेथॉनमध्ये आळंदी येथील एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगच्या पारस सातपुते व झांकी शहापूरे यांच्या 'पीएडब्ल्यूएस' संघाने द्वितीय, तर वाघोली येथील जीएच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या शाहिद शेख, अरमान काद्री, डोलार जैन, तरुण शिखवाल यांच्या स्टार्कटेक मावेरिक्स संघाने तिसरे पारितोषिक मिळाले.




द्वितीय संघाला ७५ हजार, तर तृतीय संघाला ५० हजार रुपयाचे पारितोषिक मिळाले.

'एआयटी'चे चेअरमन मेजर जनरल के. के. चक्रवर्ती यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण झाले. 'एआयटी'च्या दिघी कॅम्पसमध्ये झालेल्या या सोहळ्यात 'एआयटी'चे संचालक ब्रिगेडियर अभय भट, सहसंचालक कर्नल एम. के. प्रसाद, प्राचार्य डॉ. बी. पी. पाटील, ब्रिगेडियर राजीव सिंग, गौतम रेगे, क्लबच्या फॅकल्टी-इन्चार्ज प्रा. वैशाली इंगळे, प्रा. कुलदीप हुले आदी उपस्थित होते.

या हाकेथॉनला जोश सॉफ्टवेअर, उडचलो, क्लाउडफ्लेअर, अकॉप्स, सहाना सिस्टिम्स यांसारख्या उद्योग क्षेत्रातील प्रमुख कंपन्यांचे सहकार्य मिळाले होते. उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होण्यासाठी ही हाकेथॉन महत्वपूर्ण ठरली. स्पर्धकांनी वास्तविक समस्यांवर आधारित नाविन्यपूर्ण दृष्टिकोनातून उपायांचे सादरीकरण केले. भारतभरातील ९,५०० हून अधिक विद्यार्थी २,५०० पेक्षा अधिक संघांद्वारे सहभागी झाले होते. त्यातील ३१ संघ अंतिम फेरीत दाखल झाले होते.

ओपन सोर्स सॉफ्टवेअर क्लबचे विद्यार्थी सेक्रेटरी कौशल व्यास आणि दीपशिखा रावत यांच्या नेतृत्वात अन्य सहकाऱ्यांनी सदस्यांनी हाकेथॉन यशस्वी करण्यात परिश्रम घेतले. सोहेला कौर व अनमोल सिंग राठोड यांनी सूत्रसंचलन केले.

> "स्पर्धेत जिंकणे-हरणे यापेक्षा सहभागी होऊन नावीन्यतेचा अनुभव घेणे महत्वाचे आहे. 'इनर्व्ह ९.०' ही केवळ स्पर्धा नसून, युवा तंत्रज्ञांना उद्योग क्षेत्राचा अनुभव, मार्गदर्शन आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांना वाव मिळवून देणारे व्यासपीठ आहे. अशा उपक्रमातून आव्हान स्वीकारून समस्या समजून घेत त्यावर उपाय शोधण्याची प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांना करिअर अधिक चांगले घडवण्यासाठी हाकेथॉन उपयुक्त ठरेल."
> **— ब्रिगेडियर अभय भट**

> हाकेथॉनसारखे उपक्रम विचार, कल्पकता, इनोव्हेशन आणि टीम वर्कला चालना देते. अतिशय उत्तम पद्धतीने या हाकेथॉनचे आयोजन 'एआयटी'च्या विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्रितपणे केले. तंत्रज्ञान ही दुधारी तलवार आहे. त्यामुळे त्याचा उपयोग चांगल्या गोष्टींसाठी व्हावा. देशहितासाठी तंत्रज्ञान वापरण्यासह समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा, असे त्यांनी नमूद केले.
> **— मेजर जनरल के. के. चक्रवर्ती**

## पुण्यात काय घडतंय...


### गीत सुमनांजली



● राहुल घोरपडे यांचे १२ जानेवारीला निधन झाले. घोरपडे यांच्या जाण्याला एक महिना होत आहे. यानिमित्त चतुरस्र संगीतकार राहुल घोरपडे यांना अनन्वयच्या वतीने गीत सुमनांजली वाहिली जाणार आहे. अनन्वयच्या गायक कलाकारांसह प्रसिद्ध गायक रवींद्र साठे, शौनक अभिषेकी, अनुराधा मराठे, रघुनंदन पणशीकर, मनिषा निश्चल यांचा सहभाग असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

- **कुठे :** द बॉक्स, नळस्टॉप मेट्रो स्टेशनजवळ
- **कधी :** बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वा
- **शुल्क : सर्वांसाठी खुला विनामूल्य**

### मानव्य संस्थेच्या संस्थापिका कै विजया लवाटे यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



- **पुरस्कार :** कर्मयोगिनी कै. विजयाताई लवाटे स्मृती पुरस्कार
- **मानकरी** - डॉ. इरा शहा (एम.डी. पेडियाट्रिक्स), मुंबई
- **पुरस्कार -** कै. डॉ. अरुंधती सरदेसाई स्मृती पुरस्कार
- **मानकरी -** संतोष पवार (संस्थापक, अध्यक्ष, स्वयंप्रेरित संस्था), संगमनेर
- **प्रमुख पाहुणे –** प्रसिद्ध साहित्यिका डॉ. माधवी वैद्य

- **कुठे :** भांडारकर इन्स्टिट्यूटमधील नवलमल फिरोदिया ऑडिटोरियम
- **कधी :** मंगळवार, ११ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ५ वा.
- **शुल्क : सर्वांसाठी खुला विनामूल्य**

# लढाई सत्य आणि सत्तेची असते : डॉ. कन्हैय्या कुमार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सत्तेचे आणि सत्याचे असे दोनच प्रकारचे राजकारण आपल्या देशात आहे. सत्याच्या विचारधारेत संघर्ष भरपूर आहे. मात्र, या विचारधारेला धरुनच काम करा. सत्तेच्या राजकारणाच्या विरोधात हिंमतीने आणि विचारांनी लढून काम करायची इच्छा असेल, तेव्हाच राजकारणात या. तुम्हाला सत्तेच्या राजकारणाशी हातमिळवणी करून, आरामात आयुष्य जागता येईल. मात्र, सत्याची कास धरल्यावर तुम्हाला महात्मा गांधी, गौतम बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गावरून वाटचाल करण्याची संधी मिळेल, असे स्पष्ट मत नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाचे (एनएसयुआय) प्रभारी डॉ. कन्हैया कुमार यांनी व्यक्त केले

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी पुणे आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट पुणे यांच्या वतीने आयोजित १४ व्या भारतीय छात्र संसदेच्या पहिल्या सत्रात 'भारतीय राजकारणाची विचारधारा डावीकडे, उजवीकडे की नजरेच्या बाहेर' या विषयावरील परिसंवादात डॉ. कुमार बोलत होते. या परिसंवादात हिमाचल प्रदेशच्या विधानसभेचे अध्यक्ष कुलदीपसिंह पठानिया, खासदार राजकुमार रोत, खासदार ड. ए. ए. रहीम सहभागी झाले होते. यावेळी कुलगुरु डॉ. आर.एम. चिटणीस व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.



> आपल्या देशाचे राजकारण हे विचारधारेपेक्षा जुळवाजुळवीचे झाले आहे. देशातील राजकारण्यांना राजकारण हे फिजिक्स, केमिस्ट्री आणि मॅथेमॅटिक्सप्रमाणे वाटत असून, त्यांचा ते वेळोवेळी उपयोग करून घेत आहेत. राजकारणाच्या संरचनेत दोन प्रकाराचे लोक असतात. एक म्हणजे लाभ घेणारे, तर दुसरे राजकारणापासून पिढीत झालेले. तुम्हाला लाभ मिळत असेल तर तुम्ही राजकारणाचे गोडवे गाता. मात्र, त्याच राजकारणापासून तुम्हाला त्रास होत असल्यास, तुम्ही त्याच्या विरोधात उभे रहाता. विचारधारा नसल्यास, तुम्हाला प्रश्न विचारण्याची किंवा विरोधात लढण्याची हिंमतच आली नसती. लढाई नेहमी सत्य आणि सत्तेची राहिली आहे.
> **— डॉ. कन्हैय्या कुमार**

# सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "इतिहास उज्ज्वल कार्याने लिहिला जातो. त्याग, बलिदान व समर्पण भावनेने कार्य करणाऱ्या प्रतिभावंत व्यक्तिमत्वांना सन्मानित करून समाजासमोर आदर्श ठेवणाऱ्या 'सूर्यदत्त' संस्थेचा हा सन्मान सोहळा प्रेरक आहे. " असे प्रतिपादन अहिंसा विश्वभारतीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आचार्य लोकेश मुनी यांनी केले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या २७ व्या वर्धापनदिनी २३ व्या 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' वितरण समारंभात डॉ. आचार्य लोकेश मुनी बोलत होते. बाणेर येथील बंटारा भवन येथे आयोजित समारंभावेळी परमवीरचक्र विजेते सुभेदार मेजर संजय कुमार, ज्येष्ठ मूर्तिशास्त्र अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद, सचिन पिळगावकर, ज्येष्ठ अभिनेत्री जया प्रदा, सिस्टर लुसि कुरियन, लेफ्टनंट जनरल अशोक आंब्रे, संगीतकार अबू मलिक, सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, डॉ. किमया गांधी, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल यांच्यासह सूर्यदत्त'च्या सर्व विभागांचे संचालक, प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सन्मान कार्याचा

● आचार्य डॉ. लोकेश मुनीजी यांना 'सूर्यभूषण ग्लोबल पीस अवॉर्ड २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले. यंदाचा 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' परमवीर चक्र विजेते सुभेदार मेजर संजय कुमार, ज्येष्ठ मूर्तीशास्त्र अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, प्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगावकर, अवकाश शास्त्रज्ञ प्रा. डॉ. नरेंद्र भंडारी, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक सीए डॉ. अशोककुमार पगारिया, नीलकंठ ज्वेलर्सचे दिलबाग सिंग बीर, वैद्यकीय सामाजिक सेवा प्रदान करणारे डॉ. सदानंद राऊत, उद्योजक मयूर वोरा, मयूर शाह यांना, तर सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' पर्यावरण अभ्यासक पद्मश्री चैत्राम पवार, माजी खासदार व ज्येष्ठ अभिनेत्री जया प्रदा, अभिनेत्री स्मिता जयकर, क्रस्ना डायग्नोस्टिकचे राजेंद्र मुथा, जागतिक व्यापार तज्ज्ञ सागर चोरडिया, सहकार तज्ज्ञ डॉ. शिवाजीराव डोले, प्रेरक वक्ते राहुल कपूर जैन, उद्योजक इंद्रनील चितळे, सामाजिक कार्यकर्ते किशोर खाबिया, कृषी उद्योजक सुनील वाघमोडे यांना, तर 'सूर्यदत्त नॅशनल यंग अचिव्हर अवॉर्ड' स्टार्टअप आणि उद्योजकतेसाठी जैनम व जीविका जैन यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. 'सूर्यदत्त'च्या विद्यार्थ्यांनी बनवलेले खास उपरणे, मानचिन्ह व मानपत्र देऊन पुरस्कार्थींना सन्मानित करण्यात आले.

# रॅम्बो सर्कसमध्ये देशातील पहिला डिजिटल हत्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अपल्या देशात सर्कसमध्ये प्राण्यांचा खेळ करण्यास तसेच प्राणी पाळण्यास बंदी आहे. बच्चे कंपनीला आवडणारे प्राणी आता आपल्या देशात कोणत्याच सर्कसमध्ये नाहीत. रॅम्बो सर्कस मधील वाघ, सिंह, हत्ती, अस्वल, हिप्पोपोटोमस ,चिंपांझी, उंट, घोडे असे सारे प्राणी सरकारकडे जमा झाले. त्यावेळेस रॅम्बो सर्कसचे मालक सुजित दिलीप यांनी केरळमधील कोईमतूर येथून ६ महिने खपून हुबेहूब डिजीटल हत्ती तयार केला. सुमारे ७-८ फूट उंचीचा हा "डीजीटल हत्ती" चाकांवर ठेवला आहे. हत्तीच्या पाठीवर बसलेला सर्कस कलावंत तांत्रिकदृष्ट्या ऑपरेटिंग करतो व त्यानुसार हा डिजीटल हत्ती डावीकडे उजवीकडे मान वळून बघतो व सोंड उंच करून पाण्यचा फवारा मारतो. तसेच हा डीजीटल हत्ती चीत्त्कारतो देखील ! या सोबतच कापडी चिंपांझी ,जिराफ आणि झेब्रादेखील सर्कसमध्ये आहेत.




येत्या काही महिनात मोठा कापडी चिंपांझी दुबईहून आणि उड्या मारणारा मोठा कापडी कांगारू ऑस्ट्रेलियामधून रॅम्बो सर्कसमध्ये देखील होईल. देशातील पहिले डीजीटल हत्ती सर्कसमध्ये पहिल्यांदा आणण्याचा मान रॅम्बो सर्कसला मिळाला. पुणेकरांनी देखील या डीजीटल हत्तीला मोठा प्रतिसाद दिला, असे सुजित दिलीप म्हणाले. या प्रसंगी अक्षरकला मीडियाच्या तन्मयी मेहेंदळे यांनी "जिना यहा मरना यहा"हे गाणे गाऊन 'रॅम्बो सर्कस'चा शुभारंभ केला.

## Selected

# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानमाला



**पुणे :** गोखलेनगर मधील सुयोग मित्र मंडळाने चंद्रकांत दरोडे माध्यमिक विद्यालयात (विद्यावर्धिनी शाळा) इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानमालेचे हे ३५ वे वर्ष होते. हुशार विद्यार्थ्यांना अधिकाधिक गुण संपादन करता यावेत आणि अनुत्तीर्ण होण्याची भिती वाटणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी नेमका कसा अभ्यास करावा याचे मार्गदर्शन तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांनी केले. प्रा. लक्ष्मण मालुसरे, प्रकाश माळी, जाई देशपांडे, शैलजा जगताप, प्रा. विजयकुमार भवारी या शिक्षकांची व्याख्याने झाली. मुख्याध्यापिका ज्योती देडगे यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय माने, विशाल मोहिते, यशवंत नेटके, संजय आदवडे, नंदकुमार कदम यांनी संयोजन केले.

# कोंढव्यात आग : महिलेचा मृत्यू

**कोंढवा :** कोंढव्यातील एनआयबीएम रस्त्यावर असलेल्या सदनिकेत रविवारी दुपारी आग लागली. आगीत एका महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाने दिली.एनआयबीएम रस्त्यावरील सनफ्लॉवर आणि सनश्री सोसायटी आहे. रविवारी दुपारी सोसायटीतील एका सदनिकेत आग लागली. या घटनेची माहिती मिळताच कोंढवा अग्निशमन केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. गंभीर होररळलेल्या महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली.

# मोबाईलद्वारे मानसिक गुलामी आणण्याचे षडयंत्र :डॉ.हुबनाथ पांडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सामाजिक

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने आयोजित 'गांधी दर्शन' शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. रविवार,दि.९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेपाच या वेळेत आयोजन करण्यात आले होते.कोथरूड येथील गांधी भवनच्या सभागृहात हे शिबीर झाले.ज्येष्ठ पत्रकार विवेक देशपांडे (हिंदुत्वाची वाटचाल आणि पुरोगामित्वापुढील आव्हाने),ज्येष्ठ लेखक डॉ.हुबनाथ पांडे(आज के दौर में गांधी की अहिंसा),ज्येष्ठ पत्रकार कामिल पारखे (मराठी ख्रिश्चन समाज),डॉ.कुमार सप्तर्षी या मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

' गांधी दर्शन' विषयावरचे हे १८ वे शिबीर होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एड.स्वप्नील तोंडे यांनी केले.तेजस भालेराव यांनी संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन केले.डॉ हुबनाथ पांडे यांचे स्वागत तेजस भालेराव यांनी केले तर श्रीकांत मिश्रा यांनी त्यांचा परिचय करून दिला.गांधी स्मारक निधीचे सचिव अन्वर राजन ,सचिन पांडुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.हुबनाथ पांडे म्हणाले,'गेल्या दहा वर्षांत जेवढे खोटं बोलले गेले ,तेवढे गेल्या पाच हजार वर्षात बोलले गेले नव्हते. कुंभमेळ्याची नोंद रामायण महाभारतात मिळत नाही.तो साधारण हर्षवर्धनच्या सातव्या शतकात सुरू झाला. पण, कुंभमेळ्याची सुरूवात पुराणकाळापासून झाल्याची खोटी बतावणीही केली जात आहे.अशा प्रकारच्या अनेक खोट्या गोष्टी जाणून बुजून पसरविल्या जात आहेत, आणि समाजात गोंधळ माजवला जात आहे.यासाठी मोबाईलचा सोशल मीडियाचा साधन म्हणून वापर केला जात आहे. त्यामुळे मोबाईलद्वारे नवीन वैचारिक मानसिक गुलामी आणण्याचे षडयंत्र रचले जात आहे. त्यासाठी मोबाईल फोन स्वस्त करण्यात येत आहेत.'



# नदी पुनर्जीवनासाठी चिपको आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नदीकाठाचा पुनर्विकासाच्या नावाखाली चालणारे प्रकल्प बंद करून नैसर्गिक नदी वाहू द्यावी या मागणीसाठी रविवारी बाणेर येथील डॉक्टर कलमाडी शामराव हायस्कूल पासून रामनदी पर्यंत आंदोलन करण्यात आले. अभिनेते सयाजी शिंदे यांच्यासह वनराईचे सर्व सदस्य आणि हजारो निसर्गप्रेमी या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. जुपिटर हॉस्पिटल जवळून या लॉंग मार्च चा शुभारंभ झाला आणि बाणेर येथील मुळा नदी संगमपर्यंत हा लॉंग मार्च काढत अनेकांनी नदी बचावचा संदेश दिला.



### काय आहे चिपको आंदोलन ?

● पुनर्विकासाच्या नावाखाली अनेक प्रकल्प केले जातात. परंतु निसर्गतः नदीचा प्रवाह अडविणे आणि नैसर्गिक नदीमध्ये अनेक प्रकारची बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न व्यवस्थित करून सुरू आहे. त्याला विरोध करण्यासाठी हे आंदोलन आहे 100% सांडपाणी प्रक्रिया करण्याच्या ऐवजी नदी सुशोभीकरण्यासाठी प्राधान्य देत नदीचे प्रवाह अडवता कामा नयेत हे प्रशासनाला आणि सरकारला सुचविण्याचे काम हे आंदोलन करते .

● नदीची मूळ रुंदी कमी करून पुराचा धोका कसा कळेल ? याबाबतची कशी खात्री देता येईल असे सवाल आंदोलनाने व्यवस्थापनाला विचारले. सिमेंटीकरण आणि अन्य जलस्रोत बंद केल्यास बोर विहिरीचा पाणीसाठा कमी होणार नाही का ? तसेच नदीपात्रा शेजारून सिमेंटचे कठडे बांधले तर नदीमध्ये मिसळणारे नैसर्गिक स्त्रोत देखील थांबणार नाहीत का ? असे प्रश्न आंदोलकांनी विचारले.

● नदीच्या मैदानातील सर्व झाडे तोडल्याने डासांची संख्या वाढेल तसेच झाडांची तोड आणि सिमेंटीकरण यामुळे पुणे शहराचे तापमान देखील वाढेल.

● पूर्ण नैसर्गिक व्यवस्थेमध्ये ही यंत्रणा सुरू राहावी यासाठी निसर्गप्रेमींनी हे आंदोलन उभारले आहे.

● नदीकाठी वसलेले हे शहर, सह्याद्री मधून वाहणारी नदी आणि त्यामुळे पुणे शहराला एक वेगळे सौंदर्य लाभला आहे. परंतु राजकारण्याने ही सुंदर नदी पहिल्यापासून दुर्लक्षित केली आणि काहीतरी विकास कामांच्या नावाखाली या नदीचे प्रदूषण वाढवले. या नदीला अक्षरश: कॅनॉल बनवून टाकले आहे. अख्या नदीची स्वतःची इकोसिस्टीम असते ती सर्व नष्ट होऊन गेली आहे. हे कुठेतरी थांबायला हवं यासाठी हे आंदोलन झाले.

## रसिकांच्या उदंड प्रतिसादाने गाजला गानसरस्वती महोत्सव

# पं. शौनक अभिषेकी यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गानसरस्वती महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशीच्या सकाळच्या सत्रावर विख्यात गायिका डॉ. अश्विनी भिडे यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या गायकीचा ठसा उमटला. अश्विनीताईंनी गायिलेल्या मिया की तोडी, यमनी बिलावल, अल्हैया बिलावल आणि हिंडोलपंचम रागातील रचना रसिकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील, इतक्या रंगल्या.

नाट्यसंपदा प्रतिष्ठान आयोजित अकराव्या 'गानसरस्वती महोत्सवा'च्या चौथ्या सत्राचा प्रारंभ प्रसिद्ध गायक पं. शौनक अभिषेकी यांच्या सुरेल गायकीने झाला. मध्यलय रूपक तालातील रचना व त्याला जोडून शौनक यांनी द्रुत त्रितालातील बंदिश सादर केली. 'रे मन मूरत' या रचनेला विशेष दाद मिळाली.




त्यांना अजिंक्य जोशी (तबला), मिलिंद कुलकर्णी (हार्मोनियम) यांनी अनुरूप साथ केली. करण देवगावकर, राज शहा, सत्यजीत बेडेकर आणि अभेद अभिषेकी यांनी तानपुरा साथ केली.

अश्विनी भिडे यांना नुकताच पद्मश्री सन्मान जाहीर झाल्याबद्दल नाट्यसंपदा प्रतिष्ठान तसेच आमोणकर कुटुंबियांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रतिष्ठानचे विश्वस्त पं. रघुनंदन पणशीकर, अपर्णा पणशीकर, बिभास आमोणकर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

> हे व्यासपीठ ज्यांच्या नावाने आहे, त्या किशोरीताईंकडून भजन शिकण्याची संधी मिळाली. सर्व पूर्वसुरी गुरुजन हे मला संगीतातील संत, योगी वाटतात. वरवरचे काही फरक वगळले तर हे सारे बुजुर्ग कुठल्या ना कुठल्या स्तरावर समान विचार करत असल्याचे जाणवते.
> "
> **— शौनक अभिषेकी**
> सुप्रसिद्ध गायक

#रा

# दोनशे कोटींची 'झाडाझडती'...!

## ठेकेदारांचे 'आर्थिक हितसंबध' जोपासण्यासाठी : अधिकारीही सरसावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'सगळीकडे घाणच घाण' ही पुण्याची परंपराच आहे, त्यासाठी शहरातील सुज्ञ नागरिक 'हातभार' लावत असल्याचे आतापर्यंत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हे शहर स्वच्छ करण्याचा 'विडा' महापालिका प्रशासनाने उचलला आहे; विशेष म्हणजे यांत्रिकी पध्दतीने रस्ते आणि पदपथांची स्वच्छता करण्यात येणार आहे.हा अट्टहास पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने चक्क चढ्या दराने आलेल्या निविदा मान्य केल्या असून ही 'झाडाझडती' तब्बल दोनशे कोटींवर जाऊन पोचणार आहे.

धक्कादायक बाब म्हणजे ठेकेदाराशी 'आर्थिक हितसंबध जोपासण्यासाठी अधिकारीही सरसावले असून अवघ्या दोन ठेकेदारांची नेमणूक करण्यात आली आहे, प्रशासनाच्या या 'भानगडी'मुळे करदात्या नागरिकांना 'दिवाळखोरी'चा सामना करावा लागणार आहे.

शहरातील चार झोनमधील १८ मीटरहून अधिक रुंदीचे ४० किलोमीटरचे रस्ते यांत्रिकी पद्धतीने स्वच्छ करण्यासाठी महापालिकेने २०० कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. रस्ते सफाईसाठी काढण्यात आलेल्या निविदा ५.७५ टक्के अधिक दराने आलेल्या असतानाही त्याला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आल्याने आश्‍चर्य व्यक्त केले जात आहे.

विशेष म्हणजे एकाच ठेकेदाराला तीन निविदा मिळाल्याने यामध्ये 'आर्थिक हितसंबध' जोपासले गेल्याची जोरदार चर्चा महापालिकेत सुरू झाली आहे. पुणे महापालिकेच्या हद्दीतील १८ मीटरपेक्षा अधिक रुंदीचे रस्ते यांत्रिकी पद्धतीने स्वच्छ करण्यासाठा महापापालिकेच्या घनकचरा विभागाने निविदा काढल्या होत्या.

या निविदा १६० कोटी रुपयांच्या होत्या. जादा दराने १७२ कोटी रुपयांच्या निविदा महापालिकेकडे आल्या आहेत. पुढील सात वर्षांसाठी हे काम असून, प्रत्येक वर्षी सहा टक्के इतकी दरवाढ केली जाणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात सात वर्षांमध्ये हा खर्च साधारण २०० कोटी रुपयांपर्यंत जाणार आहे. चार झोनमधील ४० किलोमीटरचे रस्ते साफ केले जाणार आहेत. यासाठी तीन झोनमध्ये एकाच ठेकेदाराला हे काम मिळाले असून, एका झोनमध्ये दुसऱ्या ठेकेदाराला काम मिळाल्याने यामध्ये रिंग झाल्याचे बोलले जात आहे.

गेल्या वर्षी महापालिका प्रशासनाने याच कामासाठी काढलेल्या निविदा ३५ टक्के वाढीव दराने आल्या होत्या. त्यावरून सर्वच स्तरांतून महापालिकेच्या कारभारावर टीका झाल्याने ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. त्यानंतर महापालिकेच्या घनकचरा विभागाने प्रचलित दराचा अभ्यास करून फेरनिविदा काढताना या कामाची अंदाज रक्कम प्रति किलोमीटरसाठी ३१३ रुपयांनी वाढविली.

स्थायी समितीमध्ये मान्य करण्यात आलेल्या चार झोनपैकी तीन झोनची कामे मुंबईतील मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. या कंपनीला मिळाली आहेत. या कंपनीकडे झोन २, ३ आणि ४ चे काम असणार आहे. झोन १ चे काम बी. व्ही. जी. इंडिया लि. कंपनीला मिळाले आहे.




### महापालिकेला चिंता ठेकेदाराच्या दिवाळखोरीची

● गेल्या काही वर्षांपासून पुणे शहरातील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता केली जाते. शहरातील पाचही झोनमधील रस्त्यांच्या सफाईच्या कामासाठी पूर्वी दोन निविदा काढल्या होत्या. त्यापैकी एका ठेकेदाराकडे एका झोनचे काम होते, तर उर्वरित चार झोनची कामे दुसऱ्या एका ठेकेदाराकडे होती. ज्या ठेकेदाराकडे चार झोनची कामे होती, तो दिवाळखोरीत निघाला. त्यामुळे त्याचे काम बंद झाले आहे. परिणामी, चार झोनमधील रस्त्यांचे झाडण काम महापालिकेचे कर्मचारी करीत आहेत. त्यामुळे अन्य ठेकेदारावर दिवाळखोरीची वेळ येऊ नये यासाठीच या निविदा वाढीव दराने काढण्यात आल्याची चर्चा महापालिका वर्तुळात दबक्या आवाजात सुरु आहे.

### स्पर्धा 'श्रीमंत' महापालिकांशी

● महापालिकेने मान्यता दिलेल्या कामांमध्ये चारही झोनमधील साधारण १० किलोमीटरच्या पदपथांचा समावेश आहे. या रस्त्यांची नियमित स्वच्छता होणार आहे. नवीन निविदेत पिंपरी चिंचवड, नवी मुंबई आणि बृहन्मुंबईमध्ये सुरू असलेल्या यांत्रिकी पद्धतीने झाडण कामाशी तौलनिक अभ्यास तसेच रोजंदारीच्या दरातील वाढ गृहीत धरून अंदाज केल्याने हा दर ३१३ प्रतिकिलोमीटर रुपयांनी वाढला आहे. मात्र; या महापालिकांशी स्पर्धा करताना त्यांच्या आणि पुण्याच्या महापालिकेच्या उत्पन्नाचा कोणताही विचार केलेला नाही. त्याचा फटका आगामी काळात पुणेकरांना बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### कामाची गुणवत्ता तपासणार कशी?

● निविदा मंजूर झाली, तरी ठेकेदाराने केलेल्या कामाची पडताळणी कशा पद्धतीने होणार, हे अद्याप गुलदस्तात आहे. यांत्रिकी पद्धतीने झाडणकामात अनेकदा रस्त्यांवर पाण्याचा वापर न करता मोटार फिरल्याने खूप धूळ उडते. त्याचा नागरिकांना मोठा त्रास होतो. धूळ मोठ्या प्रमाणावर असल्याने आरोग्याच्या समस्याही उद्भवण्याची शक्यता राहते. निविदा मंजूर झाली, तरी एखादा रस्ता खरेच स्वस्छ झाला, की नाही, ठेकेदाराने खरेच काम केले की नाही किंवा नागरिकांना यांत्रिकी पद्धतीने झाडणकामाचा त्रास होतो आहे, की नाही हे तपासणारी यंत्रणाही कार्यान्वित होण्याची गरज नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### असे निघणार पुणेकर 'दिवाळखोरी'त

- चाळीस किलोमीटरच्या रस्त्यांच्या स्वच्छतेसाठी दोनशे कोटींचा खर्च
- प्रती किलोमीटरसाठी रक्कम ३१३ रुपयांनी वाढविली
- तीन झोनची कामे मुंबईतील मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. या एकाच कंपनीला
- झोन १ चे काम बी. व्ही. जी. इंडिया लि. कंपनीला
- ठेकेदारीची 'रिंग'झाल्याची महापालिका वर्तुळात चर्चा
- जादा दराच्या निविदेला 'स्थायी'मध्ये मान्यता
- प्रतीवर्षी देणार सहा टक्के दरवाढ



अन्य महापालिकांच्या तुलनेत याठिकाणी देण्यात आलेला दर खूपच कमी आहे, त्यामुळे हे काम जादा दराने दिले असे म्हणता येणार नाही. त्याशिवाय या पध्दतीने रस्त्याची सफाई अधिक गतीने आणि दर्जेदारपणे होणार आहे, त्याचा नागरिकांनाच फायदा होणार आहे. त्याशिवाय आगामी काळात आणखी रस्त्यांच्या साफसफाईची कामे यांत्रिकी पध्दतीवर देण्याचा प्रशासन गांभीर्याने विचार करत आहे.

**— संदिप कदम,** उपायुक्त घनकचरा विभाग, पुणे महापालिका

# जिल्ह्यातील पर्यटनाला येणार आणखीनच 'बहर'

## 'एआय'च्या वापराने पर्यटन आराखडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पर्यटकांचे खास आकर्षण असलेल्या आणि निसर्ग सौंदर्याची खाण असलेल्या पुणे जिल्ह्यातील पर्यटनाला आता आणखीनच 'बहर'येणार आहे, त्यासाठी अत्याधुनिक साधनांचा तसेच 'एआय'चा वापर करुन पर्यटनाचा समग्र आराखडा तयार करण्याचा महत्वपूर्ण निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. विशेष म्हणजे या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी खुद्द जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्यात आणखी ' नवचैतन्य' निर्माण होणार आहे; त्यातूनच स्थानिक बेरोजगारांना रोजगारही उपलब्ध होणार आहे.

**प्रकल्प**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि अत्याधुनिक साधनांचा वापर करून पुणे जिल्ह्याचा समग्र पर्यटन आराखडा तयार करण्यात येणार आहे. या आराखड्यात ऐतिहासिक गडकिल्ले, धार्मिकस्थळे, सांस्कृतिक, क्रीडा, नद्या, वन्यजीव, जैवविविधता, धरणे, कृषी, वन, जल पर्यटन, साहसी खेळ, पक्षी निरीक्षण, गवताळ प्रदेश सफारी यांचा समावेश केला जाणार आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबाबतचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'पुणे जिल्हा समग्र पर्यटन आराखडा' निर्मितीबाबत बैठक झाली. उपवनसंरक्षक महादेव मोहिते, अमोल सातपुते, पर्यटन संचालनालयाच्या पुणे प्रादेशिक उपसंचालक शमा पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, कार्यकारी अभियंता अमोल पवार, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, श्‍वेता कुऱ्हाडे, पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वहाणे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.

डुडी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अमूल्य कार्याची ओळख करून देणारे गडकिल्ले जिल्ह्यात आहेत. या गडकिल्ल्यांकडे देशविदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने कामे करावीत. तसेच महसुलात वाढ, स्थानिकांना रोजगार, स्थानिक लोकपरंपरा, साहित्य, कला, संगीत, नाट्य, आदी बाबींचा प्रामुख्याने विचार करून पर्यटन स्थळांची निवड करण्यात यावी. या स्थळावर स्वच्छता, प्रदूषण न होणे, पर्यावरण ऱ्हास टाळण्यावर भर द्यावा. पर्यटनस्थळांची व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यासोबत सर्वंकष माहिती ऑनलाइन स्वरुपात मिळणे आवश्यक आहे.



येत्या नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यात पर्यटन महोत्सव आयोजित करण्याचे नियोजन करावे. त्यासाठी आधी स्थळ निश्‍चिती करून आंतरराष्ट्रीय पातळीवरील मार्गदर्शक, पर्यटन क्षेत्राशी निगडित विविध सामाजिक संस्थांना निमंत्रित करावे. पुणे जिल्ह्याच्या पर्यटन क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रचारासाठी पुणे जिल्हा समग्र आराखडा महत्त्वाचा ठरणार आहे.

**— जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी पुणे

# सूर्यनमस्काराचा प्रचार व प्रसार करणे काळाची गरज - अ‍ॅड.गणेश सातपुते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे लोकमान्य फेस्टिवल आणि मनो-वर्धन योग संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सूर्यनमस्कार स्पर्धाचे आयोजन सदाशिव पेठ येथील 'लोकमान्य नगर उद्यान येथे करण्यात आले होते. 'अखंड सूर्यनमस्कार महायज्ञ' या अभियाना अंतर्गत ही स्पर्धा पार पडली. या अभियानाचे हे २७ वे वर्ष होते. 'रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिना'निमित्त संस्थेच्या १४७८ साधकांनी '१०८ दिवसात २७ लाख सूर्यनमस्काराचा संकल्प' पूर्ण केला. सदरील स्पर्धेत



३७५ योग साधकांनी सहभाग घेतला होता. अ‍ॅड. गणेश सातपुते यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते.

महिला व पुरुष मिळून एकूण १२ गटात ही स्पर्धा पार पडली. प्रत्येक गटातल्या प्रथम तीन विजेत्या स्पर्धकांना सन्मान चिन्हाने गौरविण्यात आले. याव्यतिरिक्त 'सर्वोत्कृष्ट संस्थात्मक सहभागा'साठी प्रथम तीन संस्थांना सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच सूर्यनमस्काराचा प्रचार व प्रसार करणाऱ्या योगतज्ञान असणाऱ्या सांगलीच्या डॉ. हर्षला पटवर्धन यांना यंदाचा सूर्यदूत' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. रुईया मूकबधिर शाळेच्या विद्यार्थीचा या कार्यक्रमात विशेष सहभाग होता.

सातपुते म्हणाले की सूर्यनमस्कार हा सर्वांग सुंदर व्यायामाच्याही पलीकडे जाऊन एक तेजाची, चैतन्याची उपासना अशा दृष्टीने तो केला जावा या दृष्टीने या उपक्रम आम्ही दरवर्षी घेत असतो. भविष्यात आम्ही सूर्यनमस्काराच्या आंतरशालीय स्पर्धा पुण्यातील प्रत्येक शाळेत जाऊन घेणार आहोत. यातून आरोग्याविषयी जनजागृती करणार आहेत. रोज सूर्यनमस्कार करणे काळाची गरज आहे. उत्तम आरोग्यासाठी रोज सूर्यनमस्कार प्रत्येकाने करावा असे त्यांनी उपस्थितांना आवाहन केले.

कार्यक्रमाचे आभार अ‍ॅड. गणेश सातपुते यांनी मानले तर मनोज पटवर्धन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वराली गोखले यांनी केले.

# महिला सक्षमीकरणात सिम्बॉयसिस करणार गुडविलला मदत-डॉ. मुजुमदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिम्बॉयसिस विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष ड. शा. ब. मुजुमदार यांच्या हस्ते गुडविलच्या कन्यारत्न विवाह मदत योजने अंतर्गत काजल गाडे रा. पुणे व अश्‍विनी चव्हाण रा. पुणे या दोन गरजू मुलींना त्यांच्या होणाऱ्या लग्नात भांड्यांचा संच, साडी व चप्पल (झाल) भेट देण्याच्या कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी कोंढवे गावचे माजी सरपंच नितीन धावडे, उद्योजक अमित चोरगे, पत्रकार प्रसाद घारे व सावरकर प्रेमी संघटनेचे विवेक विप्रदास उपस्थित होते.

महिला सक्षमीकरणात गुडविलने गेल्या बारा वर्षात अशा प्रकारच्या 'झाल' दिलेल्या मुलींचा १००० चा आकडा लवकरच गुडविल पूर्ण करेल. तसेच या सक्षमीकरण मोहीमेमध्ये आत्तापर्यंत सत्तर महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे, अशी माहिती गुडविल इंडियाचे अध्यक्ष कालिदास मोरे यांनी दिली.



भारत देशाला विकसित करायचे असेल तर महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची नितांत आवश्यकता आहे. कारण महिला या पुरुषांपेक्षा जास्त जबाबदारीने, मेहनतीने दिलेले काम पार पाडत असतात. 'गुडविल इंडिया' सारखी संस्था विविध मार्गांनी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करते. यासाठी समाजात गुडविल सारख्या अनेक संस्था आणि कालिदास मोरे यांच्या सारख्या अनेक व्यक्ती निर्माण होण्याची गरज आहे. तसेच महिलांच्या शिक्षणावर देखील भर द्यावा.

**— शा.ब. मुजुमदार** संस्थापक अध्यक्ष, सिम्बॉयसिस विद्यापीठ, पुणे.

गुडविलमधील महिलांनी शिवलेले कपडे पाहिल्यावर त्याची गुणवत्ता व आकर्षकता पाहून डॉ. मुजुमदार यांनी प्रशंसा केली. याप्रसंगी गुडविलमधील महिलांना सिम्बॉयसिस युनिव्हर्सिटी अजून शिवणकाम देईल याशिवाय अजून इतरही कामात कशी मदत करता येईल याचा आढावा घेण्यात येईल असे सांगितले.

# पतित पावन संघटना महाराष्ट्र प्रांत प्रवक्तापदी अली दारुवाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पतित पावन संघटनेच्या महाराष्ट्र प्रांत प्रवक्ता पदी अली दारुवाला यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. आज पुण्यातील बोट क्लब येथे पतित पावन संघटनेचे प्रांत सरचिटणीस नितीनजी सोनटक्के यांच्या आदेशाने दारुवाला यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले. यावेळी प्रांत उपाध्यक्ष बाळासाहेब भामरे, प्रांत संपर्क प्रमुख राजेश मोटे, पुणे शहर अध्यक्ष श्रीकांत शिळीमकर, पुणे शहर पालक मनोज नायर, पुणे शहर कार्याध्यक्ष गोकुळ शेलार आदी उपस्थित होते.

**निवड -नियुक्ती**

यावेळी बोलताना अली दारुवाला म्हणाले, " आज समाजात सर्व सामान्यांचे अनेक प्रश्न आहेत.



त्यातून त्यांना न्याय मिळत नसल्याचे नेहमीच निदर्शनात आले आहे. त्यातच मुख्यता लव्ह जिहाद, लँड जिहाद, वोट जिहाद सारखे प्रश्न ऐरणीवर आहेत. यावर संघटनेच्या वतीने जास्त लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. शासनाकडे यासंदर्भात पाठपुरवठा करण्यात येणार आहे. मात्र जर शासनाने याकडे लक्ष नाही दिले तर मग पतित पावन संघटना त्यांच्या स्टाईलने आंदोलन करेल एवढे नक्की".

# पुण्यात तीन नवीन संशयित रूग्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात जीबीएसने चांगलेच डोके वर काढले आहे. दररोज रुग्णांच्या संख्येत वाढ होत चालली आहे. शनिवारी पुण्यात तीन नवीन संशयित रूग्ण सापडले होते. त्यामुळे जीबीएस बाधित संशयित रूग्णांचा आकडा आता १८३ वर पोहोचला आहे. यातील १५१ नागरीकांना जीबीएस झाल्याचे निदान झाले आहे. तर आतापर्यंत महाराष्ट्रात सहा रुग्णांचा मृत्यू झाला आहे. पालिकेने नागरी आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांच्या अध्यक्षतेखालील एक मृत्यू समिती गठीत केली होती. या समितीत साथीच्या आजारांमधील तज्ज्ञ, डॉक्टर, बालरोगतज्ज्ञ, न्यूरो फिजिशियन आणि संसर्गजन्य रोग तज्ज्ञांसह सरकारी आणि खाजगी संस्थांमधील इतरांचा समावेश आहे.

# खूनी चार तासात जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पाषाण :** लमत्तेच्या कारणावरुन भर रस्त्यात काकाचा निर्घुण खून करणाऱ्या पुतण्यासह तिघांना पोलिसांनी चार तासात जेरबंद केले. शुभम महेंद्र तुपे (वय २८, रा, निम्हण विठ्ठल मंदिराजवळ, पाषाण), रोहन सूर्यवंशी (वय २०, रा. पाषाणगाव), ओम बाळासाहेब निम्हण (वय २०, रा. विठ्ठल मंदिराचेजवळ, पाषाणगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. महेश जयसिंगराव तुपे (वय ५६) यांचा खुन करण्यात आला होता. याबाबत वरद महेश तुपे (वय १९, रा. निम्हण विठ्ठल मंदिराजवळ, पाषाण) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना पाषाण गावातील कोकाटे आळी येथे शनिवारी सकाळी ६ वाजता घडली होती.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेश तुपे आणि शुभम तुपे यांच्यामध्ये जागेच्या बाबतीत वाद होता. शुभम तुपे त्यांच्याकडे पैशांची मागणी करीत होता. महेश तुपे यांनी त्याला पैसे देण्यास नकार दिला होता. या कारणावरुन शुभम व त्याच्या दोघा साथीदारांनी खुनाचा कट रचलाया बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे व त्यांचे पथक लागलीच तेथे गेले. त्यांनी ओम निम्हण याला ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी चतु:श्रृंगी पोलिसांच्या ताब्यात दिले. चतु:श्रृंगी पोलिसांनी शुभम तुपे आणि रोहन सूर्यवंशी यांना अटक केली.

ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त विवेक मासाळ, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, पोलीस अंमलदार अजय गायकवाड, हरिष मोरे, विशाल गाडे, विनोद महाजन, एकनाथ जोशी, प्रविण भालचीम, वैभव रणपिसे, रोहिणी पांढरकर, मयुरी नलावडे यांनी केली आहे.




# खासनीसांच्या मधुरवाणीतून विजय ग्रंथ पारायण

**सोहळा**

**प्रकट दिनानिमित्त'श्रीं' चा पालखी सोहळा :**


**सर्व सांस्कृतिक कार्यक्रम सहकारनगर येथील श्री गजानन महाराज मंदिराच्या प्रागंणात होणार आहेत. गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी श्री गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त सकाळी ७ वाजता महाअभिषेक, सकाळी ८ ते १० यावेळात 'श्रीं' चा पालखी सोहळा होणार आहे. शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

- **श्री गजानन महाराज (शेगांव) सेवा प्रतिष्ठानच्या वतीने**
- **भजन, पारायण पालखी सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम**

**पुणे :** सहकारनगर येथील श्री गजानन महाराज (शेगांव) सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने १३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांचा १४७ वा प्रकट दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्त भजन, पारायण, पालखी सोहळा, सांस्कृतिक महोत्सव, महाप्रसाद अशा अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विश्‍वस्त मंडळाच्या अध्यक्षा पौर्णिमा भारत पवार यांनी दिली.

रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते दुपारी २ यावेळेत गजानन खासनीस यांच्या मधुरवाणीतून विजय ग्रंथ पारायण होणार आहे. याच दिवशी मराठी



भाषेची थोरवी गाणारा 'अमृत मराठी' हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन, निवेदन मिलिंद कुलकर्णी यांचे असून हृषिकेश रानडे, प्राजक्ता रानडे, स्वरदा गोडबोले हे गायक असणार आहेत. केदार परांजपे यांचे संगीत संयोजन या कार्यक्रमाला लाभले आहे.


गुरुवार दि. १३ फेब्रुवारी रोजी स्मृतीगंध निर्मित, गौरी थिएटर्स प्रस्तुत, प्रशांत दामले फॅन फौंडेशन प्रकाशित 'संकर्षण via स्पृहा' हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात संकर्षण कऱ्हाडे आणि स्पृहा जोशी सहभागी होणार आहेत. शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी 'तुझी आठवण' हा सावनी शेंडे आणि वैभव जोशी यांचा कार्यक्रम होणार आहे. शनिवार दि. १५ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय किर्तीच्या ख्यातनाम गायिका विदुषी देवकी पंडित यांची शास्त्रीय व अभंग गायनाची मैफल होणार आहे. त्यांना तबल्यावर प्रशांत पांडव आणि हार्मोनियमवर अभिनय रवंदे साथसंगत करणार आहेत.

सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी ज्ञानेश्‍वर मेश्राम यांचा 'भजनाजंली' हा कार्यक्रम होणार आहे. रेखा मानवतकर या कार्यक्रमात सहगायिका असून स्वामीराज भिसे हे निरुपण करणार आहेत. मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी अभूतपूर्व संतवाणी गायक कलाकार अभिनव गंधर्व पं. रघुनाथ खंडाळकर, शुभम खंडाळकर, सुरंजन खंडाळकर गायनाची अनोखी मैफल होणार आहे.

बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवकालीन गोंधळी शिवशाहीर हरिदास शिंदे यांचा 'वारसा महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात पांडुरंग शिंदे, शाहीर रामजी पांढरे, शाहीर रामदास येशूदास, शाहीर नामदेव देसाई आदी सहभागी होणार आहेत.

## At a Glance

### देवदुर्लभ कार्यकर्त्यांचा 'अग्रेसर' हरपला



**पुणे :** कार्यकर्ता हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामाचा आधार आहे. म्हणूनच शताब्दी वर्षातही संघ वर्धिष्णू आहे. अशा देवदुर्लभ कार्यकर्त्यांच्या मांदियाळीत अग्रेसर असलेला धनंजय सारखा कार्यकर्ता आज हरपला, अशी भावना जनकल्याण समितीचे प्रांत कार्यकारणी सदस्य विनायकराव डंबीर यांनी व्यक्त केली. संघाचे प्रांत सहकार्यवाह कै. धनंजय घाटे यांना न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग शाळेच्या मैदानावर आयोजित सभेत श्रद्धांजली वाहण्यात आली.

### पीएमआरडीएच्या सदनिकांची बुधवारी सोडत

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पेठ क्र. १२ आणि पेठ क्र. ३०-३२ येथील परवडणारी घरे योजनेअंतर्गत काढण्यात आलेल्या लॉटरीची बुधवारी (१२ फेब्रुवारी) सोडत काढण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत सोडतीचा कार्यक्रम दृकश्राव्य पद्धतीने मुंबई येथे होणार आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यावेळी उपस्थित राहणार आहेत. पात्र लाभार्थ्यांकरिता सदनिकाची सोडत २२ जानेवारीला नियोजित होती. मात्र प्रशासकीय कारणामुळे ती पुढे ढकलण्यात आली होती.

# कसबा मतदारसंघात 'इंदूर पॅटर्न'

## पुण्यातील ३०० जणांच्या शिष्टमंडळाची इंदूरला भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मध्य प्रदेशचे इंदूर हे शहर सलग ७ वेळा स्वच्छ सर्वेक्षणात भारतातील पहिला क्रमांक मिळवणारे एकमेव शहर आहे. या शहराने असं काय केलं आणि इथल्या नागरिकांनी प्रशासनाला कसा हातभार लावला आहे हे पाहण्यासाठी पुण्यातील ३०० जणांच्या शिष्टमंडळाने इंदूरला भेट दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही महिन्यांपूर्वी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन त्यांना मतदारसंघात सर्वोत्तम विकासकामे करण्यासाठी अभ्यास दौरा करण्याचा सल्ला दिला होता. याच निमित्ताने स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा अभियाना अंतर्गत आमदार हेमंत रासने यांच्या नेतृत्वात हे ३०० जणांच्या शिष्ठमंडळाने २ दिवसाचा इंदूर दौरा केला.

दौऱ्यादरम्यान शिष्टमंडळाने इंदूर मधील नेपरा रिसोर्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड आणि एव्हर एन्विरो बायोगॅस या कचरा पुनर्चक्रीकरण (रिसायकलिंग) प्रकल्पास भेट देऊन तेथील वैशिष्ट्य जाणून घेतले. यावेळी पुणे महापालिकेच्या अधिकारी, सफाई कर्मचाऱ्यांनी तसेच कचऱ्याचे विघटन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या उपयुक्त गोष्टी याची प्रक्रिया समजून घेतली. तसेच इंदूरचे महापालिका आयुक्त शिवम वर्मा आणि अतिरिक्त आयुक्त यांची भेट घेतली. घरोघरी जाऊन पालिकेचे कर्मचारी कचरा कसा गोळा करतात, कचऱ्याचे वर्गीकरण कसं केलं जातं, सफाई कर्मचाऱ्यांवर प्रशासनाकडून कसे नियंत्रण ठेवले जाते, स्वच्छतेच्या बाबत इतर महत्वाच्या घटकांबाबत सुद्धा यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.



पुणे इंदूर दौरा: स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा अभियाना अंतर्गत आमदार हेमंत रासने यांच्या नेतृत्वात हे ३०० जणांच्या शिष्ठमंडळाने २ दिवसाचा इंदूर दौरा केला.

### इंदूर सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटची वैशिष्टये :

- १) इंदूर शहरात इंटिग्रेटेड सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट सेंटर या ठिकाणी स्मार्ट सिटी अंतर्गत एक कमांड सेंटर उभारण्यात आलेलं आहे.
- २) या ठिकाणी कचरा गोळा करण्यासाठी शहरातील ४७० पेक्षा अधिक वाहनांवर एका सॉफ्टवेअरच्या माध्यमातून लक्ष ठेवले जाते.
- ३) २५ पेक्षा अधिक कर्मचारी या कमांड सेंटरमध्ये काम करतात. काम करत असलेल्या कर्मचाऱ्याला प्रत्येक व्हॅनचा मार्ग माहित असतो.
- ४) गाडीचा वाहक कोण आहे, ती व्हॅन नेमकी कधी थांबते, कचरा गोळा करायला किती वेळ लावते तसेच ती गाडी वेळेत पोहचली आहे का अशा अनेक गोष्टींवर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक वाहनाला जी पी एस ट्रॅकर बसवले आहेत.





"इंदूर महापालिकेने लोकांमध्ये जाऊन कचऱ्याच्या बाबत एक प्रबोधन केलं आहे. घराघरातील कचऱ्याचे ६ भागात वर्गीकरण केलं जातं. यावर दंडात्मक कारवाई आहे पण तत्पूर्वी इथल्या प्रशासनाने तेवढी सेवा सुद्धा तत्परतेने दिली आहे. इंदूर मॉडेलचा आढावा घेऊन त्याचा फक्त अहवाल येऊन पडेल असं होणार नाही पण त्याची अंमलबजावणी केली जाईल."
**— राजेंद्र भोसले,** आयुक्त

### पुणे महापालिकेचे आयुक्त थेट इंदूरमध्ये

- पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी मध्य प्रदेशच्या इंदूरमध्ये जाऊन कचरा गोळा करणे, कचऱ्याचे पुनर्चक्रीकरण, कचऱ्याचे व्यवस्थापन आणि वर्गीकरण यासारख्या गोष्टींचा आढावा घेतला. स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा अभियाना अंतर्गत आमदार हेमंत रासने यांच्या सोबत आयुक्तांची उपस्थिती लक्षवेधक होती.

# ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज आदिवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे पुढे येऊन मोठे अधिकारी होण्याचे प्रमाण वाढले आहे. स्वप्न साकारण्याच्या ध्यास घेतला तर मार्ग मिळत जातात. आपल्याला नेहमी सांगितले जाते की, अंथरूण पाहून पाय पसरावेत परंतु आपण अंथरूण वाढविण्याचे स्वप्न का पाहत नाही? स्वप्न झोपून नाही तर उघड्या डोळ्यांनी पहा, असे मत राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केले.



"काही वाईट झाले तर आपण लगेच भगवंताला बोलतो, परंतु चांगले झाले तर धन्यवाद म्हणण्यास विसरतो. कोरोना नंतर सर्वांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागले, परंतु भारत यातून पटकन बाहेर आला. कारण आपल्या देशातील नागरिकांची एकमेकांना मदत करण्याची वृत्ती आहे."
**— माधुरी मिसाळ**

**प्रोत्साहन**

श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट, श्री महालक्ष्मी मंदिर सारसबागच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ब्रह्मोत्सवाच्या पहिल्या दिवशी पुण्यातील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आली. यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, प्रविण चोरबेले, भरत अग्रवाल, तृप्ती अग्रवाल, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा आदी उपस्थित होते. मंदिरावर फुलांची आकर्षक आरास व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

- शिष्यवृत्ती उपक्रमांतर्गत पुण्यातील हुजूरपागा मुलींची शाळा, रेणुका स्वरुप हायस्कूल, विद्या विकास विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, मॉडर्न हायस्कूल, अहिल्यादेवी मुलींची शाळा, सौ.विमलाबाई गरवारे हायस्कूल या शाळांमधील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आली.

# पुणे पोलिसांनी उतरवला आरोपींचा माज

## जिथे घडला गुन्हा तिथेच काढली धिंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून पुण्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेय. त्यामुळे आता पुणे पोलिसांकडूनही ठोस कारवाई करण्यात येत आहे. आरोपींना धडा शिकवण्यासाठी पुणे पोलिसांनी मुळशी पॅटर्न राबवलाय. जिथं गुन्हा केला तिथेच आरोपींची पुणे पोलिसांनी धिंड काढली आहे. गाड्यांची तोडफोड करणाऱ्या आणि वाहतूक पोलिसांवर हल्ला करणाऱ्या आरोपींची पोलिसांनी धिंड काढली आहे. पुणे पोलिसांनी त्या आरोपींचा माज उतरवल्याची चर्चा होत आहे.

पुण्यात गाड्या तोडफोड करणाऱ्या आरोपींची पोलीसांनी धिंड काडली. फरासखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत गाड्यांची तोडफोड करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली. गाड्यांची तोडफोड करत दहशत पसरवणाऱ्या आरोपींची धिंड काढण्यात आली. ज्या परिसरात गाड्या फोडल्या त्याच परिसरात आरोपींची पोलिसांकडून वरात काढण्यात आली. पुण्यातील फरासखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन दिवसांपूर्वी करण्यात आरोपींकडून गाड्यांची तोडफोड आली होती. गाड्यांची तोडफोड करणाऱ्या चारही आरोपीला अटक करत पुणे पोलिसांनी धिंड काढली.



### फुरसुंगीत देखील हल्ला करणाऱ्याची धिंड

- वाहतूक पोलिसावर दगडाने हल्ला करून पळून जाणाऱ्या तरुणाला फुरसुंगी पोलिसांकडून अटक करण्यात आली. शनिवारी सायंकाळी ज्या चौकात हा प्रकार घडला त्याच चौकात त्याची धिंड काढून पोलिसांनी गुन्हेगारी प्रवृत्तीला माफ करणार नाही असा संदेश दिला. आदिनाथ ऊर्फ बबलू भागवत मसाळ (वय २५,रा. कोलवडी,मुरकुटे वस्ती, मांजरी) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

### कोथिंबिर, अंबाडी, चुका, चवळईच्या दरात वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कोथिंबिर, अंबाडी, चुका, चवळईच्या दरात वाढ झाली आहे. चाकवत, मुळे, पुदिन्याच्या दरात घट झाली आहे. घाऊक बाजारात मागणीच्या तुलनेत फळभाज्यांची आवक चांगली होत आहे. बहुतांश फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली, अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

# चैतन्य भाषा प्रसार मंडळाद्वारे मराठीचा प्रसार : अनिता जोशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** चैतन्य भाषा प्रसार मंडळ या संस्थेतर्फे पुणे येथील कोथरूड डेपो नजीकच्या वसुंधरा स्कूल्स, पुणे या विद्यालयात नुकत्याच घेण्यात आलेल्या मराठी बडबड गीत स्पर्धा, मराठी हस्ताक्षर स्पर्धा आणि मराठी निबंध स्पर्धामध्ये विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे देण्यासाठी पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. या स्पर्धेत धृवांश धिडे, माही साठे, विवेक खाडे यांना बडबड गीत स्पर्धेत, तर स्वराली कांबळे, शौर्य केदारी, गार्गी मगर यांना हस्ताक्षर स्पर्धेत तर अलिशा तांबोळी, सुमित ठाकूर, मनाली मोरे यांनी निबंध स्पर्धेत पारितोषिके पटकाविली.



मराठी व संस्कृत पंडित अनिता जोशी (संस्थापक) म्हणाल्या, सध्या पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना शिकवण्याकडे जास्त आहे, परंतु आपली मराठी भाषा मायबोली आहे तिचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठीच आम्ही चैतन्य भाषा प्रसार मंडळ हे स्थापन केले.

तर मायबोली, मराठी भाषा आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी अधिक प्रभावी माध्यम ठरू शकते, आणि हे कळावे हाच स्पर्धा घेण्यामागील उद्देश होता असे ॲड. रेवती रायरीकर यांनी सांगितले. या समारंभास राजेंद्र कुलकर्णी, राजेंद्र उत्पात, प्रणील पैठणकर या मान्यवरांची उपस्थिती होती.

### बनावट प्रतिज्ञा पत्राद्वारे फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उसने पैसे घेऊन ते परत करुन विश्वास संपादन केला. त्यानंतर प्रतिज्ञापत्र करुन एक महिन्याच्या उधारीवर बांधकाम व्यावसायासाठी लागणाऱ्या गाड्यांसाठी तब्बल २६ लाख ९८ हजार रुपयांचे २८ हजार लिटर डिझेल उधार घेऊन फसवणुक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत आनंद मदनलाल लाहोटी (वय ४१, रा. श्रीराम चौक, वानवडी) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी अरुण श्रीनिवासा बायरेड्डी (रा. नानाई बाग, वानवडी) व त्यांच्या भागीदारांवर गुन्हा दाखल केला. हा प्रकार चंदननगरमधील हॉटेल ग्रॅंडन येथे १ जुलै ते ३१ जुलै २०२४ दरम्यान घडला आहे.

# महात्मा गांधी विद्यालयात सौर वॉटर फिल्टर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खानापूर :** येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयात संस्थेचे संस्थापक कै.बाबुराव घोलप व कै.मामासाहेब मोहोळ यांचे स्मृतिसप्ताहाचे औचित्य साधून बीईंग फाउंडेशन पुणे व पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सौर उर्जेवर चालणाऱ्या वाटर फिल्टर चे उद्‌घाटन उपसचिव एल.एम.पवार यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांना शुद्ध पाण्याचा फिल्टरची सोय झाल्यामुळेच आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त ठरणार आहे असे उपसचिव एल.एम.पवार म्हणाले. संस्था पातळीवरून उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानदसचिव ॲड.संदीप कदम,परीक्षा विभागाचे मूल्यमापन व शैक्षणिक संशोधन विभाग प्रमुख किरण देशपांडे व शाखास्तरावून जेष्ठ शिक्षक शशिकांत जाधव,जेष्ठ लेखनिक रायबा कुंभार व जेष्ठ नाईक रमेश जावळकर यांनी वॉटर फिल्टर प्रकल्प मिळवून देण्यात योगदान दिले.



### मुख्याध्यापक पांडुरंग फापाळे यांनी दिल्या शुभेच्छा

- सर्व संस्था पदाधिकारी व अधिकारी तसेच बीईंग फौंडेशन च्या पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले. वॉटर फिल्टर प्रकल्प सुरु झाल्याने विद्यार्थी व शिक्षक यांनी समाधान व्यक्त केले. निवेदन भगवान मदने व आभार प्रा.सोमनाथ जाधव यांनी मानले.

### टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्ता भागातील धायरी परिसरात भरधाव पाण्याच्या टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार महिलेमृत्युमुखी पडल्याची घटना घडली. याप्रकरणी टँकरचालकाविरुद्ध नांदेड सिटी पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला. वर्षा प्रकाश रांगळे (वय ४५, रा. धायरी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार महिलेचे नाव आहे. याबाबत त्यांचा मुलगा वैभव (वय २५) यांनी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पसार झालेल्या टँकरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा शोध घेण्यात येत आहे. . सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव तपास करत आहेत.

# कोंढवा येथे कायमस्वरूपी 'नो-पार्किंग झोन' जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे वाहतूक विभागाने शहरातील रस्ते सुरक्षा सुधारण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी नवीन नियम लागू केले आहेत. या बदलांमध्ये भारती विद्यापीठ, डेक्कन आणि कोंढवा वाहतूक विभागांतर्गत कायमस्वरूपी आणि तात्पुरते बदल समाविष्ट आहेत. कोंढवा येथे कायमस्वरूपी 'नो-पार्किंग झोन' जाहीर करण्यात आला आहे. हा झोन ट्रायबेका हाय स्ट्रीट सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ते शॉपर्स स्टॉपच्या शेवटच्या दुकानापर्यंत ३०० मीटर परिसरात असेल. या निर्णयामुळे परिसरातील वाहतूक कोंडी कमी होऊन वाहतूक सुरळीत होईल, अशी अपेक्षा आहे.

सर्वसमावेशक प्रक्रिया घडवण्यासाठी, वाहतूक विभागाने नागरिकांना या बदलांबाबत त्यांच्या सूचना किंवा हरकती कळवण्याचे आवाहन केले आहे. रहिवासी २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत लेखी स्वरूपात आपला अभिप्राय पोलिस उपायुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफिस, बंगला क्रमांक ६, विमानतळ रस्ता, पुणे येथे सादर करू शकतात. अंतिम आदेश देण्यापूर्वी अधिकारी नागरिकांच्या अभिप्रायांचे पुनरावलोकन करतील. मात्र, अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या निर्बंधांमधून वगळण्यात आले आहे. डीसीपी अमोल झेंडे यांनी सांगितले की, हे बदल सर्व प्रवाशांसाठी रस्ते सुरक्षा आणि सुविधा वाढवण्यासाठी आहेत.

# अनिता माने यांना प्रेमकवी पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रंगत-संगत प्रतिष्ठानच्या काव्य विभागातर्फे व्हॅलेंटाईन डेनिमित्त गुरुवारी प्रेमकवी पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यंदाच्या प्रेमकवी पुरस्काराने प्रसिद्ध कवयित्री अनिता माने यांचा गौरव केला जाणार आहे. पुरस्कार वितरण समारंभ दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार भवन, दुसरा मजला, नवी पेठ येथे आयोजित करण्यात आला असून पुरस्काराचे वितरण प्रसिद्ध लेखिका व कवयित्री डॉ. वर्षा तोडमल यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.



कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रेम कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून यात कांचन सावंत, डॉ. ज्योती रहाळकर, सुजित कदम, कविता क्षीरसागर, चंचल काळे, जयश्री श्रोत्रिय, केतकी देशपांडे, निरूपमा महाजन, विजय सातपुते, मनीषा सराफ, स्वप्नील पोरे, तनुजा चव्हाण, प्रभा सोनवणे यांचा सहभाग असणार आहे, असे रंगत-संगत प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष मैथिली आडकर यांनी सांगितले. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# पुण्यातील कुटुंबाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌समधे नोंद

**गौरव**

**शहरातील डॉ. डुंबरे पाटील कुटुंबाने इटलीत नुकत्याच झालेल्या '७०.३ आयर्नमॅन ट्रायथलॉन स्पर्धे मध्ये बाजी मारत पुण्याचा आणि भारताचा झेंडा जगाच्या नकाशावर रोवला आहे. हडपसरमध्ये राहणारे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. संपत शिवाजीराव डुंबरे पाटील, त्यांच्या पत्नी रेडिओलॉजिस्ट डॉ. वैशाली डुंबरे पाटील, कन्या प्राची व मुलगा प्रसाद यांनी ही स्पर्धा निर्धारित वेळेत पूर्ण करत विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे.**



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विक्रम झाल्याचे मानपत्र नुकतेच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या वतीने डॉ. चित्रा जैन यांनी डुंबरे पाटील कुटुंबाला प्रदान केले. 'आयर्नमॅन ट्रायथलॉन'ही स्पर्धा इटलीतील रोमालिया येथे २२ सप्टेंबर २०२४ रोजी झाली. या स्पर्धेत डॉ. संपत, डॉ. वैशाली आणि बीजे वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे अंतिम वर्षात शिकणारी प्राची व प्रथम वर्षात शिकणारा प्रसाद यांनी सहभाग घेतला. एड्रियाटिक समुद्रामध्ये १.९ किमी पोहणे, त्यानंतर लगेच ९० किमी सायकल चालविणे आणि २१ किमी धावणे असे या स्पर्धेचे स्वरूप होते. ही संपूर्ण स्पर्धा आठ तासात पूर्ण करण्याचे आव्हान स्पर्धकांसमोर होते.



"मुलांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले, तर मुले निश्चितच त्यात यशस्वी होतात. नियमित व्यायामाचा दोन्ही मुलांना त्यांच्या अभ्यासात लक्ष केंद्रित करण्यासाठी खूप उपयोग झाला. त्यांची शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती निश्चितच वाढली. या स्पर्धेच्या तयारीसाठी एकत्रित केलेला हा प्रवास आमच्यासाठी अतिशय आनंददायी व अविस्मरणीय आहे. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने त्याची नोंद घेतली, याचा आम्हा सर्वांना खूप अभिमान आहे."
**— डॉ. वैशाली डुंबरे पाटील,** रेडिओलॉजिस्ट

विविध देशातील ३५०० पेक्षा जास्त स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. पोहण्याच्या वेळी समुद्रातील लाटांचा व सायकलिंगच्या वेळी प्रचंड वारा व चढ उतारांचा सामना स्पर्धकांना करावा लागला. परंतु डुंबरे-पाटील कुटुंबातील चारही सदस्यांनी शारीरिक व मानसिक आव्हानांवर मात करत अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली.

# दिवस चांगला जाण्यासाठी 'हे' कराच..

आपल्यापैकी बऱ्याच जणांची सकाळ अंथरुणातून उठण्यापूर्वीच निघून जाते. लोक अलार्म लावून झोपतात; पण वेळेवर उठू शकत नाहीत. ही सवय यशाच्या मार्गात अडथळा ठरू शकते. कारण दिवसाचे पहिले काही तास आपण दिवसभर किती फलदायी आणि आनंदी राहू हे ठरवतात. आता तर विज्ञानानेही हे सिद्ध केले आहे, की सकाळची सुरुवात चांगली झाली तर संपूर्ण दिवस चांगला जातो. अशा वेळी आपली सवय बदलण्याची गरज आहे.

सकाळी दहा वाजण्याच्या आधी फक्त दहा गोष्टी केल्या तर आपण नक्कीच अधिक निरोगी आणि आनंदी राहू. यासोबतच यशाचा मार्ग सुकर होईल. आपल्या रोजच्या काही सवयी बदलून आपणही यशाकडे वाटचाल करू शकतो. यासाठी फार काही करण्याची गरज नाही, फक्त आपली सकाळ सकारात्मक करायची आहे.



## सूर्योदयापूर्वी जागे व्हा

आचार्य चाणक्य म्हणतात, की सकाळी लवकर उठणे ही यशाची पहिली पायरी आहे. सकाळी लवकर उठल्याने दिवसाचे काम वेळेवर पूर्ण होण्यास मदत होते आणि आत्मविश्वास वाढतो. हे जग जागे होण्याआधी तुम्हाला काही शांत वेळ एन्जॉय करण्यास अनुमती देते. तुम्ही तुमची ध्येये ठरवण्यासाठी आणि दिवसाची योजना करण्यासाठी या वेळेचा वापर करू शकता. सकाळी उठण्यासाठी झोपेचा त्याग करण्याची गरज नाही. यासाठी झोपण्याच्या वेळेचे व्यवस्थापन करावे लागेल. वेळेवर झोपा आणि वेळेवर जागे व्हा.

उठल्यानंतर पहिले काय कराल?

सकाळी उठल्यानंतर पहिली गोष्ट म्हणजे पलंग नीटनेटका करा. खोली स्वतः स्वच्छ करा आणि घरातील वस्तू व्यवस्थित ठेवा. स्वच्छ वातावरणात राहिल्याने तणाव कमी होतो. त्याचा आपल्या मनावर आणि आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो. रात्रीच्या झोपेनंतर शरीराला हायड्रेशन आणि पोषण आवश्यक असते, म्हणून चयापचय सुधारण्यासाठी आणि शरीर रीहायड्रेट करण्यासाठी एक ग्लास कोमट पाणी पिऊन दिवसाची सुरुवात करा. त्यामुळे अनेक आजारांचा धोका कमी होतो.

## स्मार्टफोनपासून दूर राहा

अनेकजण डोळे उघडताच हातात मोबाईल धरतात आणि काही वेळ त्यात मग्न राहतात. हे अजिबात करू नये. दिवसाची सुरुवात शांततेने झाली पाहिजे. फार महत्वाचे नसेल तर सकाळी दहा वाजेपर्यंत फोन तपासू नका. हा वेळ स्वतःला समर्पित करा. हे आपल्याला आपल्यासाठी खरोखर महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास अनुमती देईल. सकाळी थोडी काळजी घेतल्याने आत्मविश्वास वाढतो. येणाऱ्या दिवसासाठी तो मानसिकदृष्ट्या तयार करते. याबाबत महात्मा गांधींनी म्हटले आहे, की आपण स्वच्छ राहिलो तर आपण निरोगी राहू.

## ध्यान करा

लक्षपूर्वक ध्यान केल्याने मन शांत आणि लक्ष केंद्रित करण्यात मदत होते. यासाठी शांत ठिकाणी बसून श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रित करा. हा सराव कालांतराने कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता वाढवू शकतो. दीर्घकाळात त्याचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम दिसून येतो.

## व्यायाम करा

सकाळची शारीरिक क्रिया ऊर्जा पातळी वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे रोज किमान ३० मिनिटे व्यायाम करा. यामुळे फक्त तंदुरुस्त राहणार नाही, तर दिवसभर उत्साही आणि ताजेतवाने अनुभवाल.

## नाश्त्यात साखर आणि कर्बोदके खाऊ नका

सकाळच्या पहिल्या आहारात साखर आणि कर्बोदके खाऊ नयेत. यामुळे शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, जे थकवा, अशक्तपणा आणि वजन वाढण्यासह अनेक समस्यांचे कारण आहे. मधुमेही रुग्णांनी याची विशेष काळजी घ्यावी.





## निरोगी नाश्ता करा

व्यायामानंतर, सकाळी प्रथिने आणि फायबर युक्त पौष्टिक नाश्ता करा. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि दिवसभर सक्रिय राहण्यास मदत होते. सकाळी निरोगी न्याहारी केल्याने मूड चांगला राहतो आणि काम करण्यास मदत होते. सकाळच्या नाश्त्यामध्ये हरभरा, मूग यांसारखे अंकुरलेले धान्य आणि कोणत्याही हंगामी फळांचा समावेश करा.

## कामांची यादी तयार करा

रोज सकाळी काही मिनिटे काढा आणि रोजच्या कामांची यादी तयार करा. या यादीतील महत्त्वाच्या कामांना प्राधान्य द्या. यामुळे उत्पादकता टिकवून ठेवण्यास मदत होते आणि काम लवकर आणि सहज होते.

# शहरात का वाढतात उंदीर?

पृथ्वीवर प्राण्यांच्या लाखो प्रजाती आढळतात. यातील काही प्राणी नामशेष झाले आहेत, तर काही प्राण्यांची लोकसंख्या वाढत आणि कमी होत आहे. शहरांमध्ये उंदरांची संख्या झपाट्याने का वाढत आहे, हे जाणून घेतले पाहिजे. तीव्र हवामान बदलाच्या काळातही उंदरांच्या संख्येत फरक नाही, उलट वाढतच आहे.

शहरांमध्ये, घरांमध्ये, कार्यालयांमध्ये, रेल्वे स्थानकांवर, बसस्थानकांवर, मेट्रोमध्ये सर्वत्र उंदीर दिसतील. शहरांमध्ये उंदरांची लोकसंख्या का वाढत आहे, हे माहीत आहे का? शहरांमधील तापमान खेड्यांच्या तुलनेत जास्त आहे, तरीही उंदरांची संख्या का वाढत आहे? जगभरातील प्रमुख शहरांमध्ये उंदरांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.

## शहरीकरणामुळे वाढतात उंदीर

जागतिक तापमानवाढीबरोबरच झपाट्याने वाढणारे शहरीकरण हे त्याचे प्रमुख कारण आहे. उंदीर ५० हून अधिक झुनोटिक रोग पसरवतात. वास्तविक, झुनोटिक रोग हे लोक आणि प्राण्यांमध्ये पसरणारे संक्रमण आहेत. हे संक्रमण विषाणू, बॅक्टेरिया, परजीवी आणि बुरशी यांसारख्या जंतूंमुळे होतात. यापैकी काही प्राणघातक ठरू शकतात. शहरांमध्ये



वाढत्या उंदरांच्या संख्येमुळे आरोग्य तज्ज्ञ चिंतेत आहेत.

## तापमानवाढीतही उंदरांच्या संख्येत वाढच

'सायन्स ॲडव्हान्सेस मॅगझिन'मध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, संशोधकांनी या अभ्यासात १६ शहरांचा समावेश केला आहे. त्यापैकी ११ मध्ये उंदरांच्या संख्येत मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. किंबहुना, या अभ्यासात असे आढळून आले आहे, की उंदरांच्या लोकसंख्येतील झपाट्याने होणाऱ्या बदलांमध्ये तापमान महत्त्वाची भूमिका बजावते. ज्या शहरांमध्ये सरासरी तापमान सामान्यपेक्षा जास्त होते, तेथे उंदरांच्या संख्येत ४०.७ टक्के वाढ नोंदवली गेली. ज्या ठिकाणी तापमान सामान्यपेक्षा कमी नोंदवले गेले आहे, तेथे उंदरांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून आले आहे.

## उंदरांमुळे शेती संकटात

संशोधनात उंदरांच्या दोन प्रजातींवर लक्ष केंद्रित केले आहे. उंदीर नॉर्वेजिकस जगभरात पसरले आहेत. कृषी उत्पादन आणि अन्न पुरवठ्याचे सर्वाधिक नुकसान करण्यासाठी त्यांना जबाबदार मानले जाते. अहवालानुसार, एकट्या अमेरिकेत उंदरांमुळे झालेल्या नुकसानाची एकूण अंदाजे किंमत वार्षिक अंदाजे २७ अब्ज डा्ॅलर इतकी आहे.



# लठ्ठपणामुळे दरवर्षी २८ लाख लोकांचा मृत्यू

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, लठ्ठपणा ही महामारी बनली आहे. महामारी म्हणजे असा आजार जो जगात वेगाने पसरत आहे. लठ्ठपणामुळे होणाऱ्या जीवघेण्या आजारांमुळे दरवर्षी २८ लाख प्रौढांचा मृत्यू होत आहे. भारत आणि जगातील सर्व देश लठ्ठपणाबद्दल चिंतित आहेत.

लठ्ठपणा यापुढे हलक्यात घेता येणार नाही, असे जगभरातील डॉक्टरांना वाटते. आता लठ्ठपणा ओळखण्याची पद्धत पूर्वीपेक्षा अधिक शास्त्रीय करण्यावर भर दिला जात आहे. भारतातील डॉक्टर गेल्या १५ वर्षांपासून लठ्ठपणा शोधण्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) टूल वापरत आहेत. यामध्ये लोकांची उंची आणि वजन यांचे प्रमाण वापरून कोणी लठ्ठ आहे की नाही हे ठरवले जाते; मात्र आता याबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे आली आहेत. आता लठ्ठपणा शोधण्यासाठी 'बीएमआय'चा वापर केवळ सपोर्ट मॉनिटरिंग टूल म्हणून केला जाईल.

## लठ्ठपणाची नवी व्याख्या

'लॅन्सेट डायबिटीज अँड एंडोक्राइनोलॉजी कमिशन'मध्ये जगभरातील ५८ तज्ज्ञ डॉक्टरांनी लठ्ठपणाची नवी व्याख्या दिली आहे. आतापर्यंत, लठ्ठपणा शोधण्यासाठी जगभरात वापरला जाणारा 'बीएमआय' यापुढे पुरेसा राहणार नाही. ते अधिक शास्त्रीय आणि वैद्यकीय पद्धतीने समजून घेण्याची गरज असल्याचे डॉक्टरांचे मत आहे. संशोधनात असे दिसून आले आहे, की लठ्ठपणा अधिक शास्त्रोक्त पद्धतीने समजून घेतल्यास, कोणत्या प्रकारचा लठ्ठपणा कोणत्या रोगांसाठी धोका बनू शकतो हे ओळखण्यास मदत होईल. त्या दिशेने काम करून आपण त्या सर्व आजारांचा धोका टाळू शकतो.

## 'बीएमआय'च्या कमतरता काय आहेत?

'बीएमआय'चा सर्वात मोठा दोष म्हणजे ते चरबी आणि स्नायूंमध्ये फरक करत नाही. समजा एखाद्या व्यक्तीचा बीएमआय ३० आहे; पण त्याचे वजन स्नायू आणि हाडांच्या घनतेमुळे जास्त आहे. अशा स्थितीत



तंदुरुस्त असूनही तो 'बीएमआय'नुसार लठ्ठ आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या कमरेभोवती चरबी जमा झाली असेल; परंतु त्याचा 'बीएमआय' फक्त २४ असेल, तर तो 'बीएमआय' नुसार तंदुरुस्त आहे. 'बीएमआय'च्या या कमतरतांबाबत डॉक्टरांनी अनेकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे अनेकांना आवश्यक उपचार वेळेवर मिळत नाहीत.

## कोणती चरबी जास्त धोकादायक?

खालच्या ओटीपोटात जमा झालेली चरबी हात आणि पाय यांच्या चरबीपेक्षा जास्त धोकादायक असते. कंबरेभोवती जमा झालेली चरबी किंवा यकृत आणि हृदयात जमा झालेली चरबी जास्त धोकादायक असल्याचे नव्या संशोधनातून स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे हात, पाय किंवा त्वचेखाली जमा झालेल्या चरबीपेक्षा जास्त आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे अनेक जुनाट आजारांचा धोका संभवतो.

## लठ्ठपणासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे

जगातील सर्वच देश लठ्ठपणाच्या समस्येला गांभीर्याने घेत आहेत. भविष्यात हा मोठा धोका होऊ शकतो. त्यामुळे अनेक गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नवीन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये उपचाराची दोन टप्प्यांत विभागणी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## 'क्लिनिकल लठ्ठपणा' म्हणजे काय?

'क्लिनिकल लठ्ठपणा' हा एक जुनाट आजार आहे. त्यामुळे शरीरात जमा झालेल्या अतिरिक्त चरबीमुळे अवयवांचे कार्य प्रभावित होऊ लागते. दैनंदिन कामात अडचणी येतात. ते ओळखण्यासाठी संशोधकांनी लहान मुले आणि प्रौढांसाठी वेगवेगळे निकष तयार केले आहेत. यामुळे सांधेदुखी, श्वास घेण्यात अडचण, हृदय अपयश आणि अवयव निकामी होणे यांसारखी लक्षणे दिसतात.

## 'प्रीक्लिनिकल लठ्ठपणा' म्हणजे काय?

'प्रीक्लिनिकल लठ्ठपणा'चा अर्थ असा आहे, की या रोगामुळे अद्याप कोणतीही आरोग्य समस्या उद्भवलेली नाही; मात्र त्यामुळे टाईप-२ मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीचे आजार आणि काही कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढत आहे. याशिवाय शरीरात अतिरिक्त चरबी दिसून येते. त्यात काही सुधारणा केल्या, तर आरोग्याच्या गंभीर परिस्थितीचा धोका टळू शकतो, याला खूप वाव आहे.



# गंगा दूषित का होत नाही?

**गंगा** नदी भारतीयांचे श्रद्धास्थान आहे. गंगा नदीला धार्मिक महत्त्वदेखील आहे. अनेक पौराणिक कथांमध्ये गंगा नदीचा उल्लेख सापडतो. गंगा जल हिंदू धर्मीयांसाठी खूप पवित्र आहे. गंगेचे पाणी कधीच खराब होत नाही. दरवर्षी गंगेत स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहेत; मात्र तरीही गंगेचे पाणी कधीच खराब का होत नाही, या विषयावर गेले काही दिवस संशोधन सुरू होते. अखेर याचे उत्तर सापडलं आहे.

गंगेचे उगमस्थान हिमालय आहे. गंगोत्री हे अनेक भाविकांचे पूजास्थान आहे. गंगेचे पाणी कित्येक महिने साठवून ठेवता येते. ते कधीच खराब होत नाही. इतकेच नव्हे तर, धार्मिक सणांच्या दिवशी दररोज लाखो भाविक गंगेत स्नान करतात. सध्या महाकुंभ मेळावा सुरू आहे. करोडो भाविक गंगेत अमृतस्नानासाठी येतात; मात्र तरीही कधीच या पाण्यातून महामारी किंवा आजाराचा संसर्ग होत आहे. गंगेच्या पाण्यात अशी तीन तत्व असतात यामुळं गंगेचे पाणी स्वच्छ राहते.

## पाण्यातील गुणच स्वतः करतात पाणी शुद्ध


राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी व अनुसंधान संस्थानने गंगेवर संशोधन केले आहे. यात समोर आले, की गंगेच्या पाण्यातच असे गुण असतात जे स्वतःच पाणी स्वच्छ करतात. गंगेच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात 'बॅक्टीरियोफेज' असतात. जे गंगेत प्रदूषण होण्यापासून बचाव करतात. हे संशोधन 'स्वच्छ गंगा मिशन'अंतर्गत 'नीरी' चे शास्त्रज्ञ डॉ कृष्णा खैरनार यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे.

## कसे झाले संशोधन?

या संधोधनासाठी तीन टप्प्यात गंगा नदीची विभागणी करण्यात आली आहे. यातील पहिला गोमुख हरिद्वार, दुसरा हरिद्वार ते पाटणा आणि तिसरा पाटणा ते गंगासागर. डॉ. खैरनार यांच्या संशोधनानुसार संशोधकांनी ५० वेगवेगळ्या ठिकाणाचे गंगा जल, नदीच्या तळाशी असलेली रेती आणि मातीचे सँपल घेतले आहेत. गंगा नदीत स्वतःलाच शुद्ध ठेवणारे गुण आहेत. संशोधकांनी कुंभ मेळेच्या दरम्यान सँपल एकत्र केले आहेत. गंगा जलमध्ये बॅक्टरियोफेज आढळून आले आहेत. जे पाण्यात किटाणु नष्ट करतात.

## गंगाजलात ऑक्सिजन जादा

गंगेच्या पाण्यात ऑक्सिजनची मात्रा अधिक असते. गंगाजलत ऑक्सिजनचा स्तर २० मिलीग्रॅम प्रती लीटरपर्यंत आढळून आला आहे. त्याचबरोबर टेरपिन नावाचे एक फाइटोकेमिलदेखील आढळून आले आहेत. हे तीन तत्व गंगेचे पाणी शुद्ध ठेवतात. खैरनार यांनी म्हटले आहे, की गंगेचे पाणी कधीच खराब होत नाही. गंगा नदीच्या पाण्यातील हे तत्व भारतातील अनेक नद्यांमध्ये आहेत. यमुना आणि नर्मदा नदीच्या पाण्यावरदेखील संशोधन करण्यात आले आहे; मात्र या नद्यांमध्ये या तत्वांचे प्रमाण खूपच कमी आहे.



# पापणी का फडफडते?



'माजो लवताय् डावा डोळा, जाइजुईचो गजरो माळता, रतनअबोली केसान् फुलता, काय शकुन, शकुन गो सांगताय् माका? बाय, माजो लवताय् डावा डोळा ! या गाण्यात डाव्या डोळ्याची पापणी फडफड करीत असेल तर काही तरी घडणार आहे याचे संकेत आहे. गाण्याच्या कडव्याची शेवटची ओळ सांगत आहे, 'काय शकुन, शकुन गो, सांगताय् माका? माजो लवताय डावा डोळा' असे उत्तर दिलेले आहे; परंतु वैज्ञानिक भाषेत पापणी का फडफडत असते? त्यामागे शरीरात काय रासायनिक क्रिया घडत असतात ते जाणून घेतले पाहिजे.

अनेकदा आपली पापणी फडफडत असते. त्या वेळी अनेकजण घरगुती उपाय करतात. अनेकजण पापणी फडफडत असेल तर काही तरी शुभ किंवा अशुभ बातमी कळणार असे म्हटले जात असते. काही जण तर डॉक्टरांनादेखील जाऊन विचारतात; परंतु घरातील आजी-आजोबा घरगुती उपाय सांगत असतात.

## पापणी फडफडणे सामान्य बाब..

डोळ्याची पापणी फडफडणे ही सर्वसाधारणपणे ही सामान्य क्रिया आहे. यात गंभीर आजार वगैरे काही नसते. काही वेळाने आपोआप पापणी फडफडणे बंद होते; परंतु जर ही समस्या खूपच वेळ येत असेल तर डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करायलाच हवी.

## तणावाचा परिणाम

डोळ्यांची पापणी फडफडणे हे तणाव आणि चिंतेमुळेदेखील होऊ शकते. जेव्हा आपण मानसिकदृष्ट्या खूपच थकलेलो असतो. आत्यंतिक तणावाचा सामना करीत असतो, तेव्हा आपल्या शरीरावर काही प्रतिक्रीया होतात. ज्यात डोळ्यांची पापणी फडफडणेदेखील सामील आहे. स्नायूंच्या अनियमित आकुंचन पावण्यानेदेखील हे होते. जेव्हा अपुरी झोप होते, तेव्हादेखील असा प्रकार होतो. जेव्हा नीट झोपत नाही, स्नायू काम करीत नाहीत, तेव्हा डोळ्यांची पापणी फडफडू लागते.

## जादा कॅफीनचे सेवन

काही वेळा डोळ्यांची फडफडणे जास्त कॅफीन सेवन केल्यानेदेखील होते. जादा कॅफीन घेतल्याने नर्व्हस सिस्टीम स्टिम्युलेट करू शकते. त्यामुळे पापण्या फडफडू शकतात. डोळ्यांतील ड्रायनेसदेखील डोळ्यांच्या पापण्या फडफडण्यासाठी जबाबदार असते. आपल्या डोळ्यातील पाणी कमी होते, तेव्हा स्नायू आंकुचन होऊ लागतात. त्यानेदेखील पापण्या फडफडू लागतात. खूप तास संगणक पाहिला, तर असे होऊ शकते. त्यामुळे अशा स्थितीत 'आर्टीफिशियल टीयर ड्रॉप'चा वापर करण्याची वेळ येऊ शकते.

## पोषक तत्वांची कमतरता

शरीरात जर पोषक तत्वाची कमरता असेल तरी हे घडू शकते. मॅग्नेशियम, पॉटेशियम आणि व्हिटामिन्स बी-१२ च्या कमतरतेने पेशींचे कार्य प्रभावित होऊ शकते आणि डोळ्याची पापणी फडफडू शकते. जर लागोपाठ पापणी फडफडू लागली तर ती दुखू शकते, सूज येऊ शकते. त्या वेळी ही समस्या मज्जापेशींशी निगडीत असू शकते. अशा वेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



संपादकीय विशेष

# अपघात टाळायचे तर...

महाकुंभ मेळा हा जगभर चर्चेत असणारा विषय असला तरी त्यातील अपघात आणि भाविकांचे जीव गमावण्याच्या घटनाही नोंद घेण्याजोग्या आहेत. इथेच नव्हे, तर रेल्वेरुळांवर, बोगदे बांधकामात, रस्त्यांवर, जल वाहतुकीमध्ये अपघातांचे प्रमाण वाढत आहे. माणसासाठी आपत्ती नवीन नाहीत. आपत्तीमध्ये होणारी हानी हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. मात्र सध्या माणसाला इजा होते, तेव्हाच त्या घटनेकडे आपत्ती म्हणून बघितले जाते. सध्याच्या महाकुंभमेळ्यामध्ये घडलेली घटना याचेच उदाहरण. तसेही वर्षभरात कुठे पूर येत असतात, दरडी कोसळत असतात. वळवे लागून जंगले जळत असतात. जगभर हे प्रकार सुरूच असतात. पण माणूस प्रभावित झाल्यानंतरच त्या घटनेला आपण आपत्ती म्हणतो. यंदा प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन होण्याआधीच त्यासंबंधीच्या बातम्या, सुरू असणारी तयारी बरीच चर्चेत होती. स्वाभाविकच लोक प्रभावित झाले होते. प्रत्यक्ष ही पर्वणी साधण्यासाठी अपेक्षेपेक्षा अधिक संख्येने लोक तेथे दाखल झाले. ही बाब कुंभमेळ्यामध्येच नव्हे तर अनेक ठिकाणी बघायला मिळते. गिरनार वा दत्ताच्या ठिकाणी होणारी अलोट गर्दी याची उदाहरणे आहेत. केवळ महत्त्वपूर्ण दिवशी वा पर्वातच नव्हे तर अलिकडे एरवीदेखील देवालयांना भेटी देणाऱ्या, तीर्थक्षेत्री गर्दी करणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड वाढली आहे. वेगवेगळ्या सणांच्या निमित्तानेही लोक मोठ्या संख्येने एकत्र येत असतात. खेरीज वेगवेगळ्या संताचे मेळावे, त्याला होणारी अलोट गर्दी आपण नेहमीच पाहतो. मग त्यातूनच कधी तरी स्वाध्याय परिवाराच्या कार्यक्रमात मागे घडला तसा चेंगराचेंगरीचा प्रसंग समोर येतो. याचे कारण असे की, इतक्या प्रचंड संख्येने लोक येण्याची कल्पना संयोजकांना नसते. जाहिरात, आकर्षण, तिथे त्या वेळी उपस्थित राहण्याची आत्यंतिक इच्छा या सगळ्यापोटी सामान्य माणूस तिथे येतो.

महाकुंभमेळ्यामध्ये चेंगराचेंगरी झालेल्या दिवशी साधारणपणे बारा कोटी भाविक येतील असा अंदाज होता. आत्तापर्यंत इतका मोठा जनसमुदाय तिथे कधीच एकत्र आला नव्हता. वस्तुत: तेथे सगळ्याची अतिशय उत्तम सोय होती. आताही आधी आठ ते नऊ कोटी भाविक येण्याचा अंदाज असला तरी १२ कोटी लोक येतील, असे गृहीत धरले होते. त्यानुसार सगळ्या गोष्टी नियंत्रितही केल्या होत्या. मात्र तरीही चेंगराचेंगरी होऊन काहींचे जीव गेले. बरेचदा अशा घटना अफवांमुळे घडतात. पूर्वीदेखील चेन्नईमध्ये त्सुनामीच्या अफवेने वा अलिकडेच रेल्वेच्या डब्यात आग लागल्याच्या अफवेमुळे लोकांनी पटापट उड्या मारल्याने अशा दुर्घटना घडल्या आहेत. घाबरलेल्या प्रवाशांनी कोणताही विचार न करता उड्या मारल्या आणि वेगाने येणाऱ्या रेल्वेखाली काहीजण चिरडले गेले. अशा घटना अगदी सेकंदांमध्ये घडतात. मुंबईमधील पूल पडल्याची अफवा आणि झालेल्या चेंगराचेंगरीत गेलेले काहीजणांचे जीव हेच सत्य दाखवून देतात. थोडक्यात, असे अपघात समुदायाच्या त्या क्षणाच्या मानसिकतेमुळे घडताना दिसतात. मात्र कालावधी पाच मिनिटांचा असला तरी होणारे नुकसान प्रचंड असते.

आधीच आपल्याकडे सामान्य माणूस गर्दीत एखादी आपत्ती आली, दुर्घटना घडली तर कसे वागायचे हे जाणत नाही. खेरीज तो मानसिकरित्या आपत्तीला तोंड देण्यासाठी तयारही नसतो. त्यामुळेच दहा कोटींची व्यवस्था असताना अचानक दोन कोटी लोक वाढले तर अपघाताची मोठी शक्यता निर्माण होते. हे टाळण्यासाठी आपण त्या दिवशी त्या ठिकाणी उपस्थित असणे गरजेचे आहे का, तेथे जायला हवे का याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. एक प्रकारे स्वत:ची धार्मिक जागृती करुन घेण्याची गरज आहे, असे वाटते. महाकुंभमेळा हा संपूर्ण भारताला एकत्र आणणारा, परस्परांना जोडणारा दुवा आहे. स्वाभाविकच अगदी हिमाचल, अरुणाचल, केरळ अशा विविध ठिकाणांहून माणसे इथे येण्याचा प्रयत्न करत होती. अशाच प्रकारे चारधाम यात्रेसाठीही देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक येत असतात. बाकी सगळ्यात विविधता असली तरी संस्कृतीचे हे दुवे जपण्यासाठी एकत्र येण्यात मात्र एकता दिसते. त्यातही आर्थिक सुबत्ता वाढल्यामुळे लोकांना प्रवास करणेही सुकर आणि शक्य झाले आहे. त्यामुळेही लोक पर्वणी साधण्याचे नियोजन करतात. मोठ्या गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी सरकार जय्यत तयारी करते. सैन्यदलाची मदत घेतली जाते. स्थानिक पोलिस तैनात असतात. खेरीज आपत्ती व्यवस्थापन करणाऱ्या एनडीआरएफसारख्यांची मदत असते. केंद्राचे रेस्क्यु फोर्स असतात. यंदा तर प्रयागराजमध्ये वॉटर अॅब्युलन्सही होती. हेलिकॉप्टरद्वारे हवेतून गर्दीवर लक्ष ठेवण्यात येत होते. तरीही मोठा अपघात झाल्याने एकूणच मानसिकतेचा वेध घेणे आवश्यक ठरले.

कुंभमेळ्यामध्ये साधू, संन्यासी, उपासक मोठ्या संख्येने सहभागी असतात. त्यांचे काही नेम-नियम असतात. त्यातील काहींना लोकांनी पायाला स्पर्श केलेला, नमस्कार केलेला चालत नाही. पण सामान्य भक्तांना याची जाण नसते. त्यातील काही भावनिकतेमुळे जवळ जातात आणि चूक घडते. अशातच छोट्याशा घटनेमुळेही चेंगराचेंगरी होते आणि गोंधळ उडतो. म्हणूनच सामान्य माणसाने नेहमीच सांगितलेले नियम पाळायला हवेत. स्वत:वर थोडे नियंत्रण ठेवले तर बऱ्याच अप्रिय गोष्टी टाळता येतील. जत्रा, यात्रा वा पर्वणीच्या काळात बाहेरुन येणाऱ्यांप्रमाणेच स्थानिक वा पंचक्रोशीतल्या नागरिकांचीही मोठी गर्दी असते. गंगा ही संस्कृतीत मोठे महत्त्व असणारी नदी आहे. तिचे पावित्र्य सर्वश्रुत आहे. तेव्हा यापुढेही विशिष्ट काळात इथे गर्दी होणारच आहे. अर्थातच हे लक्षात घेऊन सरकार पुढच्या काळात १५ ते २० कोटी भाविक येण्याचा अंदाज घेऊनच नियोजन करेल. मात्र यंदाच्या ताज्या आपत्तीचा दोष सरकारवर टाकता येणार नाही. यंदाही प्रयागराजमध्ये उत्तम व्यवस्था आहे. प्रवासी रेल्वेतून उतरल्यानंतर निर्देशित केलेला रस्ता घेतला तर थेट संगमावरच पोहोचेल, अशी व्यवस्था आहे. स्वाभाविकच शहरात भरकटण्याचा प्रश्नच येत नाही. येतानाही रस्त्यांची व्यवस्था चोख आहे. त्यामुळे प्रत्येक प्रवासी थेट आपापल्या फलाटावरच पोहोचतो. इथे चुकण्याची वा गोंधळ उडण्याची शक्यता जवळपास नाही. म्हणजेच नियम पाळले, दिशादर्शनासाठी लावलेल्या पाट्या वाचल्या तर प्रत्येक भाविक कमीत कमी वेळेत पोहोचून संगमावर स्नान करु शकतो. मात्र नियम पाळले जात नाहीत, तेव्हा आपत्ती ओढावते. आपत्ती विविध मार्गांनी येत असतात. त्यामध्ये कोणीही अडकू शकतो. म्हणूनच अन्य विषयांप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन हा विषयही मुलांना शालेय पातळीपासून शिकवला गेला पाहिजे, हा मुद्दाही दखलपात्रच.

# "उच्च सुरक्षा पाट्यांचा" अगम्य तुघलकी निर्णय!

**सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सर्व वाहनांसाठी 'उच्च सुरक्षा क्रमांकाची पाटी" बसवण्याचे आदेश दिले होते. एक प्रकारे वाहनांचे हे "आधार कार्ड "आहे. त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रासह अनेक राज्यात सुरू झाली असून सर्व प्रकारच्या कोट्यावधी वाहनांना ते सक्तीचे करण्यात आले आहे. अत्यंत "अव्यवहार्य", वाहन मालक व चालकांना 'जाचक' ठरणारा हा अगम्य 'तुघलकी' निर्णय असून त्यामुळे केवळ भ्रष्टाचाराचे 'नवे कुरण' निर्माण होणार आहे. केवळ वाहनांची चोरी व पाट्यांची बनावट गिरी रोखणे एवढाच यामागे उद्देश आहे. परंतु त्यामुळे पोलीस, आरटीओ, आणि संबंधित कंत्राटदार कंपन्यांची "चांदी" करणाऱ्या या निर्णयाला वेळीच पायबंद घालण्याची गरज आहे. या निर्णयाचा घेतलेला हा लेखाजोखा.**



आर्थिक रा

प्रा. नंदकुमार काकिर्डे



देशातील सर्व प्रकारच्या वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांकाची पाटी (हाय सिक्युरिटी नंबर प्लेट्स (एचएसएनपी) बसवण्याची सक्ती करण्यात आली असून त्यासाठी ३१ मार्च २०२५ अंतिम तारीख असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाचे जसे 'आधार कार्ड' आहे तसे प्रत्येक वाहनाचे 'आधार कार्डचे' दुसरे रूप म्हणजे ही उच्च सुरक्षा क्रमांकाची पाटी आहे. वाहन कायद्याखाली याबाबतच्या तरतुदी केलेल्या असून वाहतूक पोलीस व आरटीओ यांच्या वतीने त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. वास्तविक पाहता या उच्च सुरक्षा क्रमांक पाटीचा उद्देश वाहनांची चोरी रोखणे,खोट्या नंबर प्लेटचा प्रसार थांबवणे व चोरीला गेलेल्या वाहनांचा माग घेणे एवढाच मर्यादित आहे. तसेच या उच्च सुरक्षा क्रमांकाच्या पाठीमुळे वाहन मालकाची ओळख करणे किंवा तपासणे सहज सुलभ होणार आहे. त्यामुळे नागरिकांची व्यक्तिगत माहिती गोपनीय न राहता ती सार्वजानिक होऊ शकते. त्यामुळे प्रत्येकाची खासगी 'डेटा सुरक्षितता' वाऱ्यावर जाणार आहे. सर्वात महत्वाची गेष्ट म्हणजे या पाट्यांमुळे रस्त्यावर दररोज होणाऱ्या एकाही अपघाताला पायबंद बसणार नाही. ते थांबवता येणार नाहीत. भारतात दररोज रस्त्यावरील वाहन अपघातात सरासरी ४७५ मृत्यू दर तीन मिनिटाला एक मृत्यू असे आपल्याकडचे प्रमाण आहे. या पाट्या लावल्यामुळे जे हजारो अपघात होत आहेत त्यात तसुभरही फरक पडणार नाही. रस्त्यावरील वाहन अपघात पुढील अनेक वर्षे होत राहणार आहेत. या पाट्यांमुळे मालकाला, चालकाला कोणतीही रस्ता सुरक्षितता किंवा अपघात सुरक्षितता मिळण्याची शक्यता अजिबात नाही.

कोणत्याही वाहनाला या उच्च सुरक्षा क्रमांकाच्या पाट्या बसवल्यामुळे वाहन चालकाला किंवा रस्त्यावरच्या पादचाऱ्यांना किंवा अन्य कोणालाही अपघात झाला तर त्यांना नव्या पैशाचाही लाभ होणार नाही. एखाद्या एसटीतील किंवा अन्य प्रवासी गाडीमधील प्रवाशांचा अपघाती मृत्यू झाला तर त्यांचा काहीही संबंध या उच्च सुरक्षा पाटीशी नाही ही गोष्ट प्रथम लक्षात घेतली पाहिजे. आज देशभरामध्ये राष्ट्रीय महामार्गांवर किंवा अन्य रस्त्यांवर अपघात होतात त्याला या उच्च सुरक्षा क्रमांकाच्या पाट्या रोखू शकणार नाहीत. कारण त्यांचा तो उद्देशच नाही. जर देशातील वाहन चोरीची आकडेवारी पाहिली तर दररोज १०५ दुचाकी, चारचाकी व अन्य वाहनांची चोरी होते. या उच्च सुरक्षित क्रमांक पाट्या लावल्यामुळे या चोरींचे प्रमाण कमी होण्याची सुतराम शक्यता नाही. कारण या पाट्या सहजपणे तोडून टाकता येतात. वाहनाच्या सुरक्षिततेपेक्षा त्यावर बसलेल्या माणसाची, त्याच्या आयुष्याची सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची आहे. सरकार हीच गोष्ट नेमकी विसरलेली आहे. अपघात कमी व्हावेत म्हणून सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. उत्तम दर्जाचे रस्ते, वाहतूक नियंत्रण सुविधा आणि शिस्तबद्ध वाहतुकी बाबतचे लोकशिक्षण करणे हा योग्य मार्ग आहे.

मात्र राज्य शासनाने ते सक्तीचे केल्यामुळे सर्वसामान्य दुचाकी वाहनचालकांना त्याचा मोठा आर्थिक भुर्दंड बसणार आहे. व्यापारी वाहनांसाठी किंवा प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांना अशा प्रकारच्या उच्च सुरक्षा पाट्या बसवण्यामुळे काय फरक पडणार आहे याचा खरंच विचार करण्याची नितांत गरज आहे. केवळ या वाहनांची चोरी होऊ नये किंवा त्यांच्यात काही गैरव्यवहार म्हणजे फ्रॉड होऊ नयेत एवढीच अपेक्षा या पाट्या मागे आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर ही वाहने असताना केवळ महिला दीड महिन्यामध्ये या पाट्या बसवणे हे केवळ अशक्य नाही तर अव्यवहार्य ठरणार आहे. दुचाकी वाहनांपासून सर्व प्रकारच्या म्हणजे रिक्षा मोटारी बसेस ट्रक्स टेम्पो ट्रेलर्स, ट्रॅक्टर्स यांच्यासाठी अशा उच्च सुरक्षा पाट्या बसवणे सक्तीचे करण्यात आले आहे.याचा किमान खर्च ५०० रुपयांपासून ८०० ते १००० रुपयापर्यंत करावा लागणार आहे.हा अतिरिक्त भुर्दंड नक्की आहे. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे या पाट्या कोणीही मनापासून बसवणार नाही मात्र सरकारने सक्ती केल्यामुळे त्या पाट्यांबरोबरच त्यांच्या डोक्यावर "जीएसटी" चा भार टाकण्यात आला आहे. त्यामुळे या उच्च सुरक्षा पाट्या " विकतचे" दुखणे ठरणार आहे.

जर वाहनांना या उच्च सुरक्षा पाट्या बसवल्या नाहीत तर किमान एक हजार ते दहा हजार रुपये अशी दंडाची रक्कम वसूल करण्यात येणार आहे. पुणे शहरासह मुंबई किंवा अन्य प्रमुख राज्यांमध्ये विद्यमान वाहनांच्या सध्याच्या पाट्या बदलणे बदलून उच्च सुरक्षा पाट्या बसवणे हे अत्यंत वेळ खाऊ आणि गैरसाईचे आहे. महाराष्ट्र राज्याने तीन संस्थांना याचे कंत्राट दिले आहे.यातील महत्त्वाचा भाग असा की प्रत्येक राज्यात या पाट्यांचे डिझाईन आणि त्याचे वैशिष्ट्य वेगळे आहे त्यामुळे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वाहने गेल्यानंतर मोठ्या प्रमाणावर गोंधळ होण्याची दाट शक्यता आहे. दोन कोटी वाहनांच्या जुन्या पाट्या बदलणे म्हणजे राज्याच्या कचऱ्यामध्ये काही टन प्लास्टिकच्या तसेच धातूच्या पाट्यांचा कचरा वाढणार आहे.त्याची विल्हेवाट लावण्याची कोणतीही योजना राज्याकडे नाही. राज्यातील एकूणच आरटीओ कडील मर्यादित संसाधने, मनुष्यबळ व पायाभूत सुविधा यांची वानवा लक्षात घेता या कायद्याची अंमलबजावणी करणे हे मोठे आव्हान आहे.

शासकीय पद्धतीने दिलेल्या परिपत्रकामुळे याबाबतचा गोंधळ वाढताना दिसत आहे. त्या पाट्या बसवण्यासाठी निर्माण केलेली ऑनलाइनची सुविधा अत्यंत सुमार दर्जाची आहे. अगदी पुण्याची आकडेवारी पाहायची झाली तर पुण्यात तब्बल ७२ लाख वाहने आहेत. पुण्यात उद्यापासून दररोज एक लाख वाहनांची नव्या पाट्यांसाठी नोंदणी झाली तरी सुद्धा मार्च २०२५ अखेर पुण्यातील सर्व दुचाकी किंवा अन्य वाहनांना या पाट्या बसवता येणार नाहीत. सध्या हजार पाचशे दुचाकी वाहनांचीही नोंदणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

उच्च सुरक्षा क्रमांकाच्या पाट्या हे प्रशासन व सरकारच्या डोक्यातून आलेले नवे खुळ आहे. त्या बरोबरच या सेवेला 'जीएसटी'च्या कचाट्यात आणणे म्हणजे मूर्खपणाचा कळस आहे. सत्ताधारी किंवा विरोधी असा कोणताही राजकीय पक्ष याबाबत योग्य, वाजवी व तर्कशुद्ध भूमिका घेताना दिसत नाही. त्यामुळे याबाबत राजकीय साठमारी होत राहील. परंतु वाहन चालकांच्या सुरक्षिततेला मात्र कोणतेही संरक्षण नाही ही त्यांची शोकांतिका आहे.

खेचाखेची

## वास्तव

**बंड्या** : (साधू महाराजांपाशी जात) महाराज, तुम्ही माझी जन्मकुंडली पाहिली. मला सुंदर, सुशील, शांत, समजुतदार, संस्कारी आणि हुशार जीवनसाथी मिळण्याची काही शक्यता असल्याचं त्यात दिसतंय का?

**महाराज** : मुला, कल्पनाविश्व आणि भ्रमात जगणं सोडून दे. अशी शक्यता असती तर मी कशाला संन्यासी झालो असतो?

सुप्रभात

वेगळे काही

एखादा माणूस झोपेतच सुंदर पेंटिंग बनवतो, असं सांगितलं तर त्यावर विश्वास बसणार नाही. अशी अजब कलाकृती सादर करणाऱ्या माणसाचं नाव ली हॅडवीन असं आहे. तो जागा असताना अशी पेंटिंग बनवू शकत नाही. त्यावेळी पेंटिंग करणं हे त्याला विचित्रपणा असल्यासारखं वाटतं. पण, झोपेत असताना मात्र त्याला तसं वाटत नाही. त्यामुळे झोप लागली की त्याच्या हातून एकापेक्षा एक सुंदर पेंटिंग्ज साकारली जातात. त्याने काढलेली ती पेंटिंग्ज पाहिल्यावर कोणीही थक्क होऊन जातं. लहानपणी झालेल्या एखाद्या धक्कादायक गोष्टीमुळे ली हॅडवीनकडून असं होत असावं, असं डॉक्टर म्हणतात. अनेकांनी त्याला तो जागा असताना अशी पेंटिंग्ज करायला सांगितली. पण, तो तसं करु शकला नाही. झोपेत असताना पेंटिंग्ज बनवत असल्यामुळे झोपेतून उठल्यावर त्याला थकल्यासारखं वाटतं.

रूचिरा


## हटके चवीची रूचकर डीश

काही ठराविक सामग्री घेऊनही वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ बनवता येतात. त्यामुळे अशा पाककृतींची माहिती घेऊन त्या तयार करण्याचा प्रयत्न आनंददायी ठरेल. विशेष म्हणजे अशा पाककृतींची हटके चव आपल्याला खूप आवडते. चला तर मग, आज कालन ही केरळमध्ये प्रसिद्ध असणारी डिश कशी बनवायची ते पाहू या.



**सामग्री** : १०० ग्रॅम सुरण, एक कच्चं केळं, घोटलेलं दही, चार हिरव्या मिरच्या, चार चमचे तूप, अर्धा चमचा हळद, अर्धा चमचा मेथी पावडर, अर्धा चमचे मोहरी, एक चमचा जिरे, एक चमचा मिरी पावडर, तीन सुक्या मिरच्या, कढीपत्ता इत्यादी. वाटणासाठी: खोवलेला नारळ, जिरे इत्यादी.

**कृती** : प्रथम केळाची सालं काढून छोटे तुकडे करा. सुरणाचेही छोटे तुकडे करा. नारळ, जिरे वाटून घ्या. मिरी पावडर अर्धा कप पाण्यात मिसळून गाळून घ्या. या पाण्यात मीठ, हळद घालून त्यात चिरलेल्या भाज्या शिजवून घ्या. त्यात तूप आणि दही घालून ढवळून घ्या. मिश्रणाला उकळी आल्यावर नारळाचा चव आणि थोडी मेथी पावडर घाला. दुसऱ्या कढईत मोहरी, सुक्या मिरच्या, कढीपत्ता घालून फोडणी करुन ती कालनवर घाला. हटके चवीची रुचकर डिश तयार.




राशीभविष्य

- **मेष** : नोकरीत बदलाचा विचार संभवतो. व्यवसायात आवक साधारण राहील. आर्थिक चिंता भेडसावेल.
- **वृषभ** : कामात उत्साह राहील. अपेक्षित वार्तेने समाधान लाभेल. स्थावर प्रश्नात तडजोडीची भूमिका ठेवा.
- **मिथुन** : कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. कामासाठी बरीच धावपळ होईल. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **कर्क** : आर्थिक अनुकूलता राहील. गैरसमजांपासून दूर रहावं. कुलदेवतेची उपासना अवश्य करावी.
- **सिंह** : सरकारी कामांना गती येईल. विवाहाचे प्रश्न मार्गी लागतील. आप्तेष्टांच्या भेटीने समाधान मिळेल.
- **कन्या** : स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल. धनलाभाचे योग आहेत.
- **तूळ** : सरकारी कामांना गती येईल. गुंतवणुकीचा विचार प्रत्यक्षात येईल. आर्थिक समाधान लाभेल.
- **वृश्चिक** : नोकरीत कामाचा ताण वाढेल. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. प्रकृतीच्या तक्रारी राहतील.
- **धनु** : अनपेक्षित घटना चिंता वाढवणाऱ्या ठरतील. प्रवासाने दगदग होईल. वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **मकर** : नव्या संधींचा लाभ घ्यावा. महत्त्वाच्या कामात एकाग्रता राखावी. मित्र-मैत्रिणींच्या भेटी होतील.
- **कुंभ** : महत्त्वाच्या कामांना गती येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कर्ज प्रकरणात अनुकूलता राहील.
- **मीन** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. अचानक अधिक खर्च करावा लागेल. प्रियजनांच्या भेटी होतील.

सल्ला मोलाचा

## 'व्ही डे'ला दिसा स्पेशल!

'व्हॅलेंटाईन्स डे' जवळ येतोय. व्हॅलेंटाईनला खूश करण्यासाठी काय करायचं, याचं प्लॅनिंग सगळीकडेच जोरात सुरू असेल. या विशेष दिवशी एकदम हटके दिसण्यासाठीच्या या काही खास टिप्स... ✻ शरीराचा सर्वात जास्त थकणारा अवयव म्हणजे पाय. पायातला ओलावा टिकवला तरंच ते मुलायम राहतील. यासाठी संध्याकाळी कोमट पाण्यात १० ते १५ मिनिटे पाय बुडवून ठेवा. टाचेवरची मृत त्वचा स्क्रबरनं काढून टाका. एखादं फूट क्रीम लावा आणि पायात मोजे घालून झोपा. ✻ संपूर्ण शरीर ताजतवानं व्हावं यासाठी पार्लर, स्पामध्ये विविध प्रकारच्या ट्रिटमेंट्स असतात. उन्हामुळे स्कीन टॅन झाली असेल तर ब्लीच करून घेऊ शकता. सौना बाथने शरीरातली विषद्रव्ये काढून टाकू शकता. त्वचेचं संपूर्ण भरणपोषण करण्यासाठी आंघोळीनंतर बॉडी लोशन लावायला विसरू नका. ✻ केसांना मसाज करून तुम्ही त्यांचं सौंदर्य वाढवू शकता. रात्रभर तेल लाऊन दुसऱ्या दिवशी हेअर स्पा करून घ्या किंवा घरच्या घरीच चांगल्या शँपूने केस धुवा. केस धुतल्यानंतर कंडिशनर लावा. या प्रकारे केसांची काळजी घेतल्यामुळे केस मुलायम, चमकदार आणि निरोगी राहतील.

दिनविशेष

## १० फेब्रुवारी

१९१० : प्रख्यात लेखिका आणि वक्त्या दुर्गाभाई भागवत यांचा जन्म.
१९३१ : नवी दिल्ली शहराचे औपचारिक उद्‌घाटन.
१९९१ : अंदमान आणि निकोबार ही बेटं पर्यटनासाठी खुली.
२०१३ : २००१ मध्ये संसदेवर झालेल्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार जैश-ए-महंमदचा दहशतवादी अफजल गुरूला तिहारमध्ये फासावर लटकवले.
२०१४ : तेलंगण विधेयकाला राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी मंजुरी दिली.

महत्त्वपूर्ण काही...

## व्हिडिओ टेपचा शोध

अलिकडच्या काळात टीव्ही, व्हिडिओ यांचा वापर वाढीस लागला आहे. तसा व्हिडिओचा शोध अलिकडचाच. म्हणजे गेल्या ३० वर्षातला म्हणता येईल. आवाजाच्या लहरी विद्युतचुंबकीय संदेशाद्वारे नोंदता येतात, तर मग प्रकाशाच्या लहरी का नोंदता येऊ नयेत, या प्रश्नातून केलेल्या संशोधनामुळे टीव्ही, व्हिडिओ हे तंत्रज्ञान अस्तित्वात आलं. अर्थात, यातही सुरूवातीस अडचण होती. ती म्हणजे चित्रं प्रक्षेपित करण्यासाठी लागणाऱ्या टेपवर संदेश मावत नव्हते. त्यावर तोडगा म्हणून अत्यंत वेगाने फिरणारी, खूप लांबलचक टेप सुरूवातीस वापरली गेली. नंतर नोंदणीच्या पध्दतीत बदल घडवला जाऊन टेपवर तिरक्या रेषांमध्ये हे संदेश नोंदवले जाऊ लागले आणि त्यावर छोट्या भागात आवाजाच्या संदेशांची नोंदणी केली जाऊ लागली. व्हिडिओ टेप ही ऑडिओ टेपपेक्षा रूंद असते. तसंच जास्त लांब असते. व्हिडिओ कॅमेऱ्यामध्ये चित्रीकरण करताना या मंदगतीने फिरणाऱ्या टेपवर विद्युतचुंबकीय स्वरूपात संदेशाची नोंद होत जाते. तर टीव्हीमध्ये व्हिडिओ प्लेअरमार्फत ही टेप पाहताना उलट प्रक्रिया घडते. अशी या तंत्रज्ञानाची किमया आहे.

पंचांग

**सोमवार, १० फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. १३, नक्षत्र : पुनर्वसू
चंद्रराशी : मिथुन, प्रीति योग,
सूर्योदय : ७.०९, सूर्यास्त : ६.३६

फॉरवर्डस

माणसाच्या स्वभावाचं नेमकं वर्णन करणाऱ्या या पंक्ती खूप काही सांगून जातात...


**संभल कर चल नादान, ये इंसानों की बस्ती हैं, ये तो रब को भी आजमा लेते हैं, तेरी क्या हस्ती हैं...**

आरोग्यमंत्र

## कर्करोग दूर ठेवायचा तर...

एकीकडे गंभीर व्याधींवर प्रभावी उपचार उपलब्ध होत असताना दुसरीकडे दिवसेंदिवस कर्करोगाचं प्रमाण वाढत चाललं आहे. हा विकार जडण्यामागे जनुकीय कारणं असली तरी दैनंदिन आयुष्यातल्या काही चुकाही याला कारणीभूत ठरू शकतात. त्याची माहिती अवश्य घ्यावी.

✻ स्थूलपणा अनेक विकारांना आमंत्रण देतो. स्थूलपणामुळे कर्करोग जडू शकतो. नियमित व्यायाम तसंच संतुलित आहार घेऊन वजन नियंत्रणात ठेवता येणं शक्य आहे.



✻ मद्यपानामुळे स्वादुपिंड तसंच पोटाचा कर्करोगाची शक्यता वाढते. अतिमद्यपानामुळे याची शक्यता अनेक पटींनी वाढते. तसंच यकृत, स्तन, तोंड, मोठं आतडं, घसा यांचा कर्करोगही जडू शकतो.

✻ जास्त काळ उन्हात राहिल्याने सूर्याच्या अतिनील किरणांशी संपर्क आल्यामुळे त्वचेच्या कॅन्सरची शक्यता वाढते. सूर्याच्या घातक किरणांमुळे त्वचेच्या डीएनएला धोका पोहांचू शकतो. त्वचेमधील पेशींच्या वाढीचा वेग प्रमाणापेक्षा जास्त वाढल्याने कर्करोग होऊ शकतो.

✻ प्रक्रिया केलेल्या तसंच लाल मांसाच्या अतिसेवनामुळेही कर्करोग होण्याची शक्यता वाढते.

✻ टाल्कम पावडरच्या वापरामुळे महिलांमध्ये गर्भाशयाच्या कॅन्सरची शक्यता वाढत असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे.

✻ शर्करायुक्त पेयांमुळे रक्तातली साखर वाढते. वजन वाढतं. याची परिणती विविध प्रकारच्या कर्करोगांमध्ये होऊशकते.

वाचा तर खरं

सद्यस्थितीत ताण-तणावात होणारह वाढ हा मोठा चिंतेचा विषय ठरत आहे. परंतु लिंबाचा वास तणावावरील उतारा ठरु शकतो हे संशोधकांनी सप्रमाण सिद्ध केलं आहे. संशोधकांच्या मते डोळे बंद करुन सलग १५ मिनिटं लिंबाचा वास घेत राहिल्यास स्ट्रेस लेव्हल कमी होते. या बरोबर लवेंडर, सायट्रिक आणि मिंट हे सुगंधही तणावरहित अवस्था देण्यासाठी कारक ठरत असल्याचं संशोधक सांगतात. या सुगंधांमुळे मूड फ्रेश होतो आणि वेगळी ऊर्जा मिळते. शारीरिक, मानसिक मरगळ दूर करण्यासाठी हे सुगंध महत्त्वाची भूमिका बजावतात.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### पुन्हा चार चाकींची तोडफोड

**चिंचवड :** पिंपरी चिंचवड शहरात पुन्हा एकदा चार चाकी वाहनांची तोडफोड करण्यात आली आहे. साने चौकातील सिद्धी पार्क परिसरात चार चाकी वाहनांची मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आली आहे. एका अल्पवयीन मुलाने मध्यरात्री अंमली पदार्थाच्या नशेत वाहनांची तोडफोड केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. यात जवळपास १० ते १५ वाहनांच मोठा आर्थिक नुकसान झाला आहे. वाहनांची तोडफोड करणाऱ्या अल्पवयीन मुलाला चिखली पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. मात्र या घटनेमुळे साने चौक परिसरातील नागरिकात दहशतीचा वातावरण निर्माण झाला आहे.

### पिझ्झा मागवला म्हणून विद्यार्थिनी हॉस्टेल बाहेर

**पिंपरी :** पिझ्झा म्हटलं की अनेकांच्या तोंडाला पाणी सुटतं. पण आता याच पिझ्झामुळे पुण्यात धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पिझ्झा खाण्याचा मोह झाल्याने हॉस्टेलमध्ये पिझ्झा मागवला म्हणून विद्यार्थीनींना हॉस्टेलमधून बाहेर काढल्याची घटना पुण्यातील पिंपरी चिंचवडमधून समोर आली आहे. पिंपरी शहरातील मोशी परिसरात समाज कल्याण विभागाचे मुलींचे वसतीगृह आहे. याच ठिकाणी असलेल्या काही विद्यार्थिनींनी दोन दिवसांपूर्वी खाण्यासाठी पिझ्झा मागवला होता. मात्र, वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी यावर आक्षेप नोंदवला अन् कारवाई केली.हॉस्टेलवर राहणाऱ्या मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून बाहेरील व्यक्ती किंवा खाद्य पदार्थ आणण्यास नियमानुसर बंदी आहे.

# चिखलीकर घेणार मोकळा श्वास


## प्रचंड पोलीस बंदोबस्तात पुन्हा अतिक्रमण विरोधी मोहीम



पुणे कारवाई: कुदळवाडी भागात आरक्षित जागा आणि विकास रस्त्यांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच या परिसरातील अनधिकृत बांधकामे अशा एकूण 222 बांधकामावर महापालिकेच्या वतीने कारवाई करण्यात आली.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली:** येथील कुदळवाडी भागात आरक्षित जागा आणि विकास रस्त्यांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच या परिसरातील अनधिकृत बांधकामे अशा एकूण 222 बांधकामावर महापालिकेच्या वतीने कारवाई करण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि विविध क्षेत्रीय धडक कारवाई पथकांमार्फत 18 लाख 36 हजार 532 चौरस फूट बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.महापालिकेच्या वतीने आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई कण्यात आली आहे.



> महापालिकेच्या वतीने नागरी सुविधा पुरविताना त्या भागातील नागरी सुरक्षा देखील तितकीच महत्त्वाची आहे. त्या अनुषंगाने आगीसारख्या आपत्कालीन परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत असलेल्या कुदळवाडी भागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे.
> — **प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने चिखली परिसरातील अतिक्रमण कारवाईला मोठ्या जनक्षोभामुळे स्थगिती दिल्यानंतर, पुन्हा धडक कारवाईला करण्यात आली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून संभाव्य पुनरावृत्तीच्या घटना हाताळण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. स्थानिक व्यापारी आणि रहिवाशांचे संघटित निषेध टाळण्यासाठी इंटरनेट सेवा आणि मोबाइल नेटवर्क देखील विस्कळीत करण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे.

महापालिका आणि पोलीस यंत्रणेने संयुक्तरित्या अतिक्रमण कारवाई राबविली. पोलीस आयुक्त विनयकुमार चोबे, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. त्यांनी प्रत्यक्ष कारवाईस्थळास भेट देऊन पाहणी केली तसेच प्रशासनाला सूचना देखील केल्या.

सुमारे 42 एकर क्षेत्रात झालेल्या या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील 4 कार्यकारी अभियंते, 16 उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे 180 जवान, 600 पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. 16 पोकलेन, 8 जेसीबी, 1 क्रेन आणि 4 कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय 3 अग्निशमन वाहने आणि 2 रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी यात सहभागी झाले होते.



> शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. कुदळवाडी भागात वारंवार आगीच्या घटना घडल्या आहेत. अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या या बांधकामांमध्ये सुरक्षात्मक उपाय योजना न करता विविध व्यवसाय सुरू असल्याने अनेक अडचणी निर्माण होतात. या व्यवसायातून थेट नदीपात्रात दूषित पाणी सोडले जात होते, त्यामुळे पाणी तसेच हवा प्रदूषणात वाढ झाली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तरतुदींचे उल्लंघन करणे, कामगार कायद्याचे पालन न करणे अशा अनेक बाबी या भागात निदर्शनास आल्या होत्या. अशा परिस्थितीत कायद्याचे पालन करुन महापालिकेने निष्कासनाची कारवाई केली आहे. यापुढेही अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील.
> — **शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

# मे महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** ज्या पद्धतीने सर्वोच्च न्यायालयात आमचे सबमिशन सुरू आहे, त्यानुसार सर्वोच्च न्यायालय त्याला मान्यता देईल. ओबीसी आरक्षणासंदर्भात फेब्रुवारीमध्ये निकाल झाला, तर मे महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकतात. अनेक दिवस स्थानिक स्वराज्य संस्था रिकाम्या राहू नयेत. लवकरच या निवडणुका झाल्या पाहिजेत. यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, अशी माहिती महसूलमंत्री व भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

बावनकुळे यांच्या हस्ते क्रिकेट स्पर्धेचे शनिवारी (दि.8) उद्घाटन झाले. यावेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी बावनकुळे यांनी क्रिकेटच्या मैदानावर चौफेर फटकेबाजीही केली. पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक भाजप स्वबळावर लढविणार का असे विचारले असता, ते म्हणाले. राज्य पातळीवर महायुती म्हणून आम्ही एकत्रित निवडणुकांना सामोरे जात आहोत. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवाच्या की नाही, याबाबत स्थानिक युनिटला विश्वासात घेऊन निर्णय घेतला जाईल.

तसेच पक्ष व भाजपच्या मंत्र्यांमध्ये समन्वय ठेवण्यासाठी तसेच होणारे निर्णय सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपचा कार्यकर्ता असावा, याकरिता प्रत्येक मंत्र्यांकडे भाजप कार्यकर्त्याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य सरकारचे निर्णय आम्ही घरोघरी पोहचवू शकतो, हा त्यामागील उद्देश आहे.

**निवडणूक लढून जिंकून दाखवेन**

कामठी विधानसभा निवडणुकीत सलग पाच वेळा भाजपचा उमेदवार विजयी झाला आहे. राहुल गांधी म्हणतात की, कामठी विधानसभेच गडबड झाली आहे. त्यामुळे माझे राहुल गांधी यांना आव्हान आहे की, 2029 ची विधानसभा निवडणूक त्यांनी माझ्या विरोधात लढवावी. असे थेट आवाहन बावनकुळे यांनी राहुल गांधींना दिले असून मी त्यांच्या विरोधात निवडणूक लढून जिंकून दाखवेन.



# १० आरओ प्लांटवर कारवाई

## प्लांट तात्काळ बंद करण्याचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गिलियन बेरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली असून दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या अनधिकृत खाजगी आरओ प्लांट्सची तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत आढळून आलेल्या अशा १० आरओ प्लांटवर महापालिकेने कारवाई केली असून संबंधित चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती माहिती आयुक्त शेखर यांनी दिली

जीबीएसचा प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने खाजगी आरओ प्लांट्सच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये अनधिकृत खाजगी आरो वॉटर ऑपरेटर्स दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करुन पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आले होते.



# स्मार्ट सिटीचा निष्काळजीपणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहरात नागरिकांच्या सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्थेसाठी स्मार्ट सिटी लिमिटेड यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. या कॅमेऱ्यासाठी मे.क्रिस्टल कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेतला होता. त्या वीजपुरवठा बिलाची मासिक रक्कम अदा करणे आवश्यक होते.

पिंपरी-चिंचवड शहरात नागरिकांच्या सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्थेसाठी स्मार्ट सिटी लिमिटेड यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. या कॅमेऱ्यासाठी मे.क्रिस्टल कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेतला होता. त्या वीजपुरवठा बिलाची मासिक रक्कम अदा करणे आवश्यक होते. मात्र, वीज बिल अदा न केल्याने सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वीजपुरवठा खंडित करण्याची कार्यवाही विद्युत कंपनीने सुरू केली होती. तसेच महापालिकेच्या अन्य विकास कामांना नवीन वीज जोडणी करण्यास नकार देण्यात येऊ लागला होता. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे थकीत वीज बिल महापालिकेकडून भरण्यात येणार आहे. दरम्यान, संबंधित मे. क्रिस्टल ठेकेदारांवर आणि स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांवर आयुक्तांकडून कोणती कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून

# ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा, २ जवान शहीद



आयजी बस्तर पी सुंदरराज यांनी सांगितले की, चकमकीदरम्यान चार सुरक्षा कर्मचारी गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी दोन सैनिकांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. इतर दोन जखमी सैनिकांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.

यावर्षी १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत राज्यात वेगवेगळ्या चकमकीत ५० हून अधिक नक्षलवादी मारले गेले आहेत. छत्तीसगड पोलिसांच्या माहितीनुसार, राज्यात भाजप सरकार स्थापन झाल्यापासून सुरक्षा दलांनी आतापर्यंत विविध चकमकींमध्ये २१९ नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये छत्तीसगडमध्ये भाजपचे सरकार स्थापन झाले आणि विष्णू देव साई मुख्यमंत्री झाले. तेव्हापासून, राज्यातील नक्षलविरोधी कारवाईला वेग आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च २०२६ पर्यंत राज्य नक्षलमुक्त करण्याची घोषणा केली आहे.

**मुख्यमंत्री विष्णुदेव साई यांच्याकडून शोक व्यक्त**

छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साई यांनी सैनिकांच्या बलिदानाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवर लिहिले आहे की, 'बिजापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान परिसरात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत नक्षलवादी ठार झाले. या चकमकीत दोन सैनिक शहीद आणि दोन जखमी झाल्याची दुःखद बातमी देखील मिळाली आहे. सैनिकांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही. मार्च २०२६ पर्यंत राज्य नक्षलवादापासून मुक्त होईल.'

# मोदींच्या परदेशवारीनंतर शपथविधी

४८ जागा जिंकून २७ वर्षांची प्रतीक्षा संपवून भाजप दिल्लीत पुन्हा सत्तेत आले. गेल्या दशकापासून राजधानी दिल्लीत राज्य करणाऱ्या 'आप'ला २२ जागा मिळाल्या आहेत, तर पक्षप्रमुख अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्यासह त्यांच्या प्रमुख नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

**मुख्यमंत्रीपदाचे दावेदार**

मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर न करता भाजपच्या प्रमुख नेत्यांनी उच्चस्तरीय बैठका सुरू केल्या आहेत. ज्यामध्ये पाच नेत्यांची नावे दिल्लीचे नवीन मुख्यमंत्री पदाचे प्रमुख दावेदार म्हणून समोर येत आहेत.



नवी दिल्ली मतदारसंघात केजरीवाल यांचा पराभव करून जायंट किलर म्हणून उदयास आलेले पर्वेश वर्मा हे दिल्लीतील संभाव्य मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यांच्या यादीत आघाडीवर आहेत. दिल्ली विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणून काम केलेले भाजपचे वरिष्ठ नेते विजेंदर गुप्ता, पूर्वी प्रदेशाध्यक्ष म्हणून काम केलेले प्रमुख ब्राह्मण चेहरा सतीश उपाध्याय, केंद्रीय नेत्यांशी जवळचे संबंध असलेले दिल्ली भाजपचे सरचिटणीस आशिष सूद आणि वैश्य समुदायातील संघाचे मजबूत नेते जितेंद्र महाजन हे देखील इतर दावेदार आहेत. परंतु, दिल्ली भाजपचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा म्हणाले की, मुख्यमंत्री निवडीचा निर्णय पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने घेतला पाहिजे, तसेच सर्वोच्च पदावर नवीन चेहरा येण्याची शक्यताही आहे. तर दिल्लीच्या मुख्यमंत्री पदी महिला उमेदवारावर देखील होऊ शकतात, अशी चर्चा आहे.

## रशिया-युक्रेन युद्ध थांबणार? ट्रम्प यांचे पुतिन यांच्याशी संभाषण

### रशियालाही शांतता हवी




रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांना ट्रम्प यांच्या वक्तव्याबद्दल विचारले असता ते म्हणाले की, दोन्ही देशांमध्ये संवादाचे वेगवेगळे मार्ग काम करतात. मला व्यक्तिशः याबद्दल माहिती नाही. मी याची पुष्टी ही करू शकत नाही किंवा नाकारूही शकत नाही. रशियाला शांतता प्रस्थापित हवी असून, शांततेसाठी अमेरिकेशी वाटाघाटी करण्यास तयार असल्याचे रशियाने यापूर्वीच म्हटले आहे.

# आपले शौचालय आपली जबाबदारी..!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पिंपरी **स्वच्छ सर्वेक्षण २०२४:** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या झोन ई मधील प्र.क्रं ३, ४, ५,७ या ठिकाणी सार्वजनिक व सामुदायिक शौचालय स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेत सामुदायिक शौचालये व त्या आसपासच्या परिसराची स्वच्छता देखील करण्यात आली. उपस्थित विद्यार्थी, स्थानिक नागरिक, बचत गट व महानगरपालिका कर्मचाऱ्यां सोबत नागरिकांना देखील स्वच्छतेची शपथ घेण्यात आली तसेच, स्वच्छ सर्वेक्षण २०२४ बाबत माहिती देण्यात आली.

## कारवाईतून अकरा हजार रुपये इतकी दंडाची रक्कम वसूल

# कचरा करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** सार्वजनिक ठिकाणी वारंवार कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास येताच धडक मोहिमेंतर्गत सार्वजनिक ठिकाणाचे आरोग्य दूषित केल्याप्रकरणी आरोग्य विभागामार्फत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई आली. या कारवाईतून अकरा हजार रुपये इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयाने ही कारवाई केली.

**जनजागृती मोहीम**

● शहराचे सौंदर्य तसेच नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. अशा नागरिकांना कारवाई करण्याचा इशारा देऊन ही त्यांच्याकडून सार्वजनिक ठिकाणि कचरा टाकला जात आहे. या घटनांना रोखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.



शहरातील नागरिकांना स्वच्छतेची सवय व्हावी, याकरिता महापालिकेचा आरोग्य विभाग कायम जनजागृती मोहीम राबवत असतो. कचरामुक्त पिंपरी चिंचवड शहरासाठी महापालिकेच्या वतीने घरगुती कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रिया केली जाते. तरीदेखील काही नागरिक सार्वजनिक ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा टाकत आहेत.

#रा

# पंजाबमध्ये आपसमोर मोठे आव्हान

## राजधानी दिल्लीतील मानहानिकारक पराभवानंतर संकट तीव्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** दिल्लीतील दारुण पराभवानंतर पंजाबमध्येही आम आदमी पक्षासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. १० वर्षे राजधानी काबीज केल्यानंतर निवडणुकीत जनता आपल्याला एवढा धक्का देईल, असा विचारही अरविंद केजरीवाल यांनी केला नसेल. केजरीवाल स्वत: एक हजारांहून अधिक मतांनी पराभूत झाले, तर त्यांचे निकटवर्तीय माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि मंत्री सौरभ भारद्वाज यांनाही दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. २०१३ नंतर पहिल्यांदाच दिल्लीत 'आप'ला पराभवाला सामोरे जावे लागले. यातील एक मोठा घटक म्हणजे अँटी इन्कम्बेन्सी, ज्याला पंजाबमध्येही सामोरे जावे लागणार आहे. अशा परिस्थितीत आम आदमी पक्षाला आता आपल्या अस्तित्वासाठी लढा द्यावा लागणार आहे.



**'आप' ६२ वरून थेट २२ वर**

गेल्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने ६२ जागा जिंकल्या होत्या. तर केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले. पक्षाच्या मतांची टक्केवारीही १० टक्क्यांनी घसरून ४३.५७ टक्क्यांवर आली आहे. दिल्लीत १४ जागा अशा होत्या ज्यावर अत्यंत कमी फरकाने जय-पराजयाचा निर्णय घेण्यात आला. या जागा पाच हजारापेक्षा कमी मताधिक्याने जिंकल्या होत्या. दरम्यान, अरविंद केजरीवाल यांनी दुपारी आपला पराभव स्वीकारला. यानंतर आतिशी यांनी रविवारी मुख्यमंत्रीपदाचा ही राजीनामा दिला.

**मध्यमवर्गाची नाराजी**

दिल्लीतील आम आदमी पक्षाला मध्यमवर्गीयांच्या नाराजीला सामोरे जावे लागले, असे जाणकारांचे म्हणणे आहे. त्याचवेळी मध्यमवर्गाचा मुद्दा बनलेल्या 'शीशमहल'च्या विरोधात भाजपने प्रचार केला. नायब राज्यपाल आणि दिल्ली सरकार यांच्यातील संघर्षही दिल्लीच्या जनतेने पाहिला आहे. अशा परिस्थितीत लोकांनी डबल इंजिन सरकारवर विश्वास व्यक्त केला. आम आदमी पक्षाने गरिबांच्या मतांवरील पकड गमावली आहे, हेही नाकारता येणार नाही. या निवडणुकीतही गरिबांनी आम आदमी पक्षाला जाहीर पाठिंबा दिला आहे.

एमसीडीवर अजूनही आम आदमी पक्षाचे नियंत्रण आहे. आम आदमी पक्षाकडे २५० पैकी १३४ जागा आहेत. अशा परिस्थितीत 'आप'चा दिल्लीच्या जनतेशी असलेला संबंध संपुष्टात येणार नाही. त्याचबरोबर आम आदमी पक्षाची अवस्था भाजपसारखी झालेली नाही. विधानसभेत अजूनही त्याचे २२ सदस्य असतील. आम आदमी पक्ष विधानसभेत सक्रिय विरोधी पक्षाची भूमिका बजावू शकतो.

दुसरीकडे पंजाबमध्ये आम आदमी पक्षासाठी लोकसभा निवडणुकीदरम्यान धोक्याची घंटा वाजली होती. दरम्यान, दिल्ली निवडणूक पुन्हा एकदा आम आदमी पक्षाला सावध करत आहे. पंजाबमधील 'आप'चे अनेक आमदारही नाराज असल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत आम आदमी पक्षाला पंजाबवर आपली पकड कायम ठेवण्यासाठी मैदानात उतरावे लागणार आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपांवर मात करण्याचे मोठे आव्हान पक्षासमोर आहे. दिल्लीतील भ्रष्टाचारावर पंतप्रधान मोदी यांनीही बोट ठेवले होते.

## At a Glance

### रेल्वे घातपाताचा प्रयत्न हाणून पाडला

**रायबरेली :** चंपा देवी मंदिराजवळ रुळांवर ठेवलेले दगड लोको पायलटने पाहिल्यानंतर रायबरेलीमध्ये रेल्वेला घातपात करण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला. या घटनेनंतर रेल्वे अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करत स्थानिक पोलिस आणि जीआरपीला याबाबत माहिती दिली.

### भाजपच्या मतांची टक्केवारी वाढली

**नवी दिल्ली :** गेल्या दहा वर्षांत दिल्लीतील भाजपच्या मतांची टक्केवारी तब्बल १३ टक्क्यांनी वाढली आहे, तर 'आप'च्या मतांची टक्केवारी १० टक्क्यांनी घटली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजप आणि 'आप'च्या मतांमध्ये केवळ दोन टक्क्यांची तफावत होती. 'आप'ला २२ जागांवर मर्यादित ठेवत भाजपने ७० पैकी ४८ जागा जिंकून राष्ट्रीय राजधानीत सत्ता मिळवली आहे.

### जीएसटी परिषदेची लवकरच बैठक

**नवी दिल्ली :** जीएसटी परिषदेचे आढावाचे काम जवळपास पूर्ण झाले असल्याने जीएसटी कौन्सिल लवकरच कमी आणि कमी दरांबाबत निर्णय घेईल, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले. वस्तू व सेवा कर (जीएसटी) ही चार स्तरीय कररचना असून त्यावर ५, १२, १८ आणि २८ टक्के स्लॅब आहेत. लक्झरी आणि डिमेरिट वस्तूंवर सर्वाधिक २८ टक्के, तर पॅक्ड फूड आणि जीवनावश्यक वस्तूंवर सर्वात कमी ५ टक्के कर आकारला जातो.

# भारतातील ७ राज्यांमध्ये काही दिवसांत पाऊस



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर भारतात दिवसा खूप उष्णता जाणवत असून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. दरम्यान, अरुणाचल प्रदेश, आसामसह ईशान्य भारतातील किमान सात राज्यांमध्ये येत्या काही दिवसांत पाऊस पडेल. अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, आसाम, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरामध्ये पाऊस पडेल. गेल्या चोवीस तासांत हिमाचल प्रदेशात थंडीची लाट कायम आहे, तर हिमाचल प्रदेश आणि अरुणाचल प्रदेशात मुसळधार पाऊस झाला आहे. तर सिक्कीम, मेघालय, दक्षिण अंतर्गत ओडिशामध्ये दाट धुके दिसून आले.

**अवकाळी**

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, अरुणाचल प्रदेशात १५ फेब्रुवारी दरम्यान पाऊस पडेल. या कालावधीत ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, तर ११ आणि १२ फेब्रुवारी रोजी मुसळधार पाऊस पडेल. तर सिक्कीममध्ये ११ फेब्रुवारी, ईशान्य आसाममध्ये १० ते १४ फेब्रुवारी, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरामध्ये १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय पश्चिम हिमालयी भागात ११ फेब्रुवारी दरम्यान पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

वायव्य, मध्य आणि पूर्व भारतात पुढील तीन दिवस किमान तापमानात तीन अंशांची वाढ होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. याशिवाय उपहिमालयी पश्चिम बंगाल, सिक्कीममध्ये ९ फेब्रुवारी, गंगेच्या पश्चिम बंगालमध्ये १० आणि ११ फेब्रुवारीला, दक्षिण ओडिशात ९ आणि १० फेब्रुवारीला दाट धुके पडणार आहे.

### राजस्थानमध्ये कोरडे हवामान

● राजस्थानमध्ये शनिवारी हवामान कोरडे राहिले तर सीकर जिल्ह्यातील फतेहपूर येथे ३.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हवामान खात्याच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, करौली येथे किमान तापमान ४.३ अंश, दौसा येथे ४.६ अंश, माउंट आबू येथे ५.२ अंश, चुरू येथे ५.६ अंश आणि लुणकरंसर येथे ५.७ अंश होते. सीकर येथे किमान तापमान ६ अंश सेल्सिअस, डबोक येथे ६.६ अंश सेल्सिअस, चित्तौडगढ येथे ६.७ अंश सेल्सिअस, अंता येथे ६.९ अंश सेल्सिअस, नागौर येथे ७.१ अंश सेल्सिअस, वनस्थळी येथे ७.३ अंश सेल्सिअस आणि राजधानी जयपूर येथे १०.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

# कटरा येथील मद्य-मांस विक्री बंदी कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर::** जम्मू-काश्मीरच्या रियासी जिल्ह्यात असलेल्या माता वैष्णोदेवी च्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महत्वाची बातमी आहे. कटरा येथील बेस कॅम्प कटरा येथे मद्य आणि मांसाहारी पदार्थांच्या विक्री आणि वापरावरील बंदी दोन महिन्यांसाठी वाढविण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी रविवारी ही माहिती दिली. कटरा ते त्रिकुटा हिल्स आणि आसपासच्या १२ किलोमीटरच्या मार्गावर हे निर्बंध कायम राहणार आहेत. हे निर्बंध आदेश जारी झाल्यापासून दोन महिन्यांपर्यंत लागू राहतील.

कटराचे उपविभागीय दंडाधिकारी पियुष धोत्रा यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या (बीएनएस) कलम १६३ अन्वये ही बंदी घातली आहे. कटरा ते मंदिर मार्ग वगळता आर्ली, हंसली, मत्याल या मार्गाच्या दुतर्फा दोन किलोमीटरच्या परिघात असलेल्या गावांमध्ये मद्य आणि मांसाहारी पदार्थांवर बंदी घालण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे कटरा-टिकरी रस्त्याच्या दुतर्फा २०० मीटरच्या परिघात असलेल्या चंबा, सेर्ली आणि भागता गावांमध्ये निर्बंध लागू राहतील. कटरा-जम्मू रस्त्याच्या दुतर्फा २०० मीटरच्या आत असलेल्या कंदरोरियां, कोटली बाजलियान, नोमिन आणि मघल या गावांमध्येही ही बंदी लागू राहणार आहे.

**यात्रेकरूंसाठी हेलिकॉप्टर कोटा**

श्री माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डाने (एसएमव्हीडीएसबी) मंदिरात ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग यात्रेकरूंसाठी हेलिकॉप्टर कोटा सुविधा जाहीर केली आहे. एसएमव्हीडीएसबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंशुल गर्ग यांनी सांगितले की, यात्रेकरूंची सेवा वाढविण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. हा कोटा बोर्डाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल, अशी माहिती त्यांनी दिली.

# दिल्लीतील विजयाची जगभरात चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्ष २७ वर्षांनंतर दिल्लीत सरकार स्थापन करण्यासाठी सज्ज झाला आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपने ७० पैकी ४८ जागा जिंकल्या असून, अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाला २२ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा खातेही उघडता आले नाही. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने मिळवलेल्या शानदार विजयाची जगभरात चर्चा सुरू आहे. जागतिक प्रसारमाध्यमे भारताच्या राजधानीतील हा मोठा राजकीय बदल मानत आहेत.



रॉयटर्स या वृत्तसंस्थेने निवडणूक निकाल हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पक्षाचा ऐतिहासिक विजय असल्याचे म्हटले आहे. भाजपने निवडणूक प्रचार प्रशासन, कायदा व सुव्यवस्था आणि पायाभूत सुविधांवर कसा केंद्रित ठेवला याचाही उल्लेख आहे. हा विजय शहरी भागात पक्षाची वाढती ताकद दर्शवितो. विशेषत: एकेकाळी 'आप'ला पाठिंबा देणारे मध्यमवर्गीय मतदार आता भाजपमध्ये आले आहेत, असे त्याने नमूद केले आहे.

एसोसिएटेड प्रेस या वृत्तसंस्थेने भाजपच्या विजयाचे वर्णन दिल्लीतील सत्तेत मोठे राजकीय पुनरागमन म्हणून केले आहे. 'आप'ची घटती लोकप्रियता आणि अंतर्गत कलह यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली. काँग्रेसच्या मतांची टक्केवारी किंचित वाढली. असे असूनही काँग्रेस या लढतीत दूरची खेळाडू राहिली. फायनान्शिअल टाईम्सने या निकालांचा भारताच्या राजकारणावर कसा मोठा परिणाम होऊ शकतो हे वृत्त दिले आहे. एकेकाळी बलाढ्य प्रादेशिक शक्ती म्हणून पाहिल्या जाणाऱ्या 'आप'समोर आता अस्तित्वाचे संकट उभे ठाकले आहे. दिल्ली हा 'आप'चा महत्त्वाचा बालेकिल्ला होता. येथील पराभवामुळे त्यांच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असे ठळकपणे म्हटले आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, सध्या सुरू असलेली विधानसभा निवडणूक भाजप आणि 'आप' या दोन्ही पक्षांसाठी प्रतिष्ठेची लढाई आहे. भाजपसाठी दिल्ली जिंकणे हे केवळ निवडणुकीतील यशापेक्षा अधिक आहे. त्याचा संदेश दूरवर जाईल. भाजपचे उमेदवार प्रवेश वर्मा यांनी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव करत नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला. हा केवळ माझा विजय नाही तर आपल्या सर्वांचा विजय आहे. दिल्लीत चांगले सरकार यावे, अशी सर्वांची मागणी होती. दिल्लीच्या इतिहासात उद्या सुवर्णाक्षरांनी लिहिलं जाईल. आपल्यासमोर अनेक आव्हाने आहेत. येत्या ५ वर्षांत दिल्लीत कोणतेही राजकारण न करता केवळ विकास होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

# स्वामी समर्थ केंद्रात पंकजा मुंडे यांची हजेरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक:** संतोष देशमुख प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे फरार असताना दिंडोरीतील स्वामी समर्थ केंद्र येथे आल्याचा आरोप भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख आणि सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला होता. संतोष देशमुख यांच्या हत्येला दोन महिने पूर्ण झाले असून या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा अजूनही फरार आहे. त्यातच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे या रविवारी (दि. ९) नाशिकमध्ये दाखल झाल्या असून, स्वामी समर्थ केंद्राच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली असल्याने तर्कवितर्क केले जात आहेत.

वाल्मिक कराड याला पोलीस जेव्हा शोधत होते, तेव्हा नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे आण्णासाहेब मोरे म्हणजे गुरू माऊली यांच्या आश्रमात १५ आणि १६ डिसेंबर रोजी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे हे मुक्कामाला होते आणि १७ तारखेला ते आश्रमाच्या बाहेर निघून गेले, असा आरोप तृप्ती देसाई यांनी केला होता. दिंडोरीच्या आश्रमात त्यांना आश्रय दिलं गेला असेल, तर तेथील जे प्रमुख आहे त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी, तसेच त्यांना देखील सहआरोपी केलं पाहिजे, असेही त्यांनी म्हटले होते. यानंतर दिंडोरी येथील स्वामी समर्थ केंद्राच्या प्रतिनिधींनी आपली भूमिका स्पष्ट केली होती.


आता नाशिकमध्ये स्वामी समर्थ केंद्र प्रणित जागतिक कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला पंकजा मुंडे यांची हजेरी लावली आहे. मात्र या कार्यक्रमाला स्वतः अण्णासाहेब मोरे अनुपस्थित असल्याचे दिसून आले. अण्णासाहेब मोरे यांचा मुलगा आबासाहेब मोरे कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित आहे. पंकजा मुंडे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. दरम्यान, आज स्वामी समर्थ केंद्राचे प्रतिनिधी आबासाहेब मोरे कार्यक्रमातील भाषणात बोलताना म्हणाले की, स्वामी समर्थ केंद्र या पुढे कोणत्याही विषयात पडणार नाही. कारण चांगले काम करताना खूप कष्ट घ्यावे लागतात पण चुकीचे कोणीतरी काही तरी बोलत आणि त्यावर बातमी होते, असे म्हणत तृप्ती देसाई यांनी केलेल्या आरोपांना त्यांनी उत्तर दिले.

**पुरातत्व विभागाने दिले आदेश**

# विशाळगडावरील अतिक्रमणे ३० दिवसांत काढा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**विशाळगड :** विशाळगड अतिक्रमणाबाबत न्यायालयाने पुरातत्त्व विभागाची सुनावणी घेऊन अतिक्रमणधारकांना अतिक्रमण काढण्याचे आदेश देण्याचे निर्देशित केले होते. त्यानुसार पुरातत्त्व विभागाने सुनावणी घेऊन गडावरील २३ जणांना ३० दिवसांत अतिक्रमणे काढून घेण्याचे आदेश दिले असल्याचे पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वहाने यांनी स्पष्ट केले. या नोटिसींमुळे गडावर एकच खळबळ उडाली आहे.



गतवर्षी १४ जुलै रोजी विशाळगड मुक्ती आंदोलन झाले. या आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्यातून विशाळगडाशेजारील मुसलमानवाडीत दंगल झाली. जिल्हा प्रशासनाने संपूर्ण गडासह परिसरात संचारबंदी लागू केली होती. तब्बल १७५ दिवसांनी बंदी उठवून सध्या सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेतच पर्यटक, भाविकांना प्रवेश देण्यात येत आहे.

# ट्रम्प विरोधी निदर्शने

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**इस्तंबूल** नागरिकांचे पूनर्वसन? तुर्कीतील इस्तंबूल येथील अमेरिकी वाणिज्य दूतावासासमोर, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. गाझा पट्टीतील पॅलेस्टिनी नागरिकांचे पूनर्वसन शेजारील अरब राष्ट्रांमध्ये करावे, अशी भूमिका ट्रम्प यांनी मांडली होती.

# नाशिकमध्ये राष्ट्रवादीचे १२२ जागांवर स्वबळ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने संघटनात्मक विस्तारासाठी सभासद नोंदणी मोहिम सुरू केली आहे. सद्यस्थितीत महापालकेच्या ३१ प्रभागांमधील १२२ जागांवर स्वबळावर निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. अर्थात निवडणुका स्वबळावर लढवायच्या की महायुतीच्या माध्यमातून याचा फैसला पक्षश्रेष्ठींच्या आदेशांनंतर घेतला जाणार आहे.

ओबीसी आरक्षणाच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात २५ फेब्रुवारीला सुनावणी होत आहे. या सुनावणीनंतर महापालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा होईल, अशी शक्यता राजकीय तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने देखील या निवडणुक तयारीचा एक भाग म्हणून पक्ष संघटनात्मक बळकटीकरणासाठी शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सभासद नोंदणी अभियानाला सुरूवात केली आहे. प्रदेश पदाधिकारी अशोक सावंत, निवृत्ती अरिंगळे व अर्जुन टिळे यांचा क्रियाशील सदस्यपदाचा अर्ज भरून घेत या सभासद नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

# पालघरमध्ये २ कोटी ४२ लाखांचे ड्रग्स जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पालघर :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात एमडी ड्रग्ज प्रकरण चांगलंच गाजत आहे. असं असतानाच पुणे, नाशिकनंतर आता पालघरमध्ये पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आलीय. पालघरमध्ये रसायनशास्त्राच्या द्विपदवीधरानं आपल्या शिक्षणाचा वापर चक्क एमडी ड्रग्ज बनविण्यासाठी केल्याचं निष्पन्न झालंय. दरम्यान, आरोपीला अटक करण्यात आली असून २ कोटी ४२ लाख रुपयांचे ड्रग्स जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिलीय.

**कारवाई**

बोईसर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या छाप्यात २ कोटी ४२ लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. आमान नई मुराद (वय २९, रा. वसई, जिल्हा पालघर) असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव असून तो आपल्या घरातच ड्रग्स तयार करायचा. त्याच्या घरातून मेफेड्रोन नावाची पिवळसर रंगाची पावडर आणि अन्य साहित्य असा एकून २ कोटी ४२ लाख ७ हजार २०२ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आलाय. पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील तसंच सहाय्यक पोलीस निरीक्षक व्हटकर या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# आता लक्ष्य पश्चिम बंगाल

## शुभेंद्रु अधिकारी यांनी दिले ममतांना आव्हान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या घवघवीत यशानंतर पश्चिम बंगालचे भाजप नेते शुभेंदु अधिकारी यांनी तृणमूलच्या ममता बॅनर्जी यांना आव्हान दिले आहे. आता तुमची वेळ आहे, अशा शब्दांत अधिकारी यांनी ममतांना ललकारले आहे. दिल्लीचा विजय आमचा आहे, २०२६ मध्ये बंगालमध्ये अशीच कामगिरी करू, असे त्यांनी म्हटले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते सुकांत मजुमदार म्हणाले की, बंगालमधील जनताही भाजपला भरभरून मतदान करेल. त्यांनी दिल्लीत राहणाऱ्या बंगाली जनतेचे आभार मानले.

दिल्ली निवडणुकीत भाजपने ७० पैकी ४८ जागा जिंकल्या. तर, सत्ताधारी आम आदमी पक्ष २२ जागांवर घसरला. काँग्रेस आणि अन्य कोणत्याही पक्षाचे खाते उघडता आले नाही. आम आदमी पक्षाने २०१५ आणि २०२० मध्ये भाजपचा दारुण पराभव केला होता. यावेळी दिल्लीत अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांनाही आपली जागा वाचवता आली नाही.

**राजकीय**

पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी एप्रिल-मे महिन्यात विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे. अशा तऱ्हेने तृणमूल काँग्रेसला पराभूत करण्यासाठी भाजपकडून पूर्ण तयारी सुरू आहे. पश्चिम बंगालमध्ये टीएमसीला पराभूत करणे हे भाजपसाठी मोठे आव्हान आहे. पश्चिम बंगालमध्ये पंतप्रधान मोदींचा चेहरा समोर ठेवून निवडणूक लढवली गेली, त्यानंतरही भाजप तेथे चमकदार कामगिरी करू शकलेला नाही. २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आणि २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतही भाजपला पराभवाला सामोरे जावे लागले होते. २०२१ च्या कोलकाता महापालिका निवडणुकीतही टीएमसीने भाजपला पराभूत केले होते.

निवडणुकीनंतरही पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार झाला होता. भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये वारंवार हाणामारी होत असते. आरजी कर रुग्णालयातील निवासी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या मुद्द्यावरूनही दोन्ही पक्ष आमनेसामने आले होते. ममता बॅनर्जी यांनी आम आदमी पक्षाला पाठिंबा दिला. दिल्लीत आम आदमी पार्टी आणि काँग्रेसमध्ये जागावाटपाबाबत एकमत झाले नव्हते. इंडिया आघाडीचे अस्तित्व आता धोक्यात आले आहे. आता इंडिया आघाडीत टीएमसीचे वर्चस्व वाढले, तर बंगालमध्ये विजय मिळवणे भाजपसाठी आव्हानात्मक ठरू शकते. तसेच, ममता बॅनर्जी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठीत प्रमुख नेत्या म्हणून उदयास येऊ शकतात. त्या अरविंद केजरीवाल यांची जागा घेतील.



» Selected

## धामणीच्या खंडोबाला चांदीची तलवार अर्पण

**अवसरी :** आचार विचार आणि संस्काराने समृध्द असलेल्या जुन्या पिढीने धार्मिक संस्कृतीची जोपासना केली. हे संस्कार पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी व संस्कृती जोपासण्यासाठी नव्या पिढीत देखील विचारांची समृध्दी यायला हवी, असे विचार ह.भ.प.हिरामण महाराज कर्डीले (रामलिंग शिरूर) यांनी व्यक्त केले. धामणी (ता. आंबेगाव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात माघ शुक्ल पक्ष वसंत पंचमीला रविवारी श्री विक्रम किसनराव जाधव यांनी खंडोबाला चांदीची तलवार अर्पण केली. या कार्यक्रमात ते बोलत होते. धामणी येथील श्री खंडोबा देवस्थानाचे महात्म्य खूप मोठे आहे.राज्यभरातील हजारो भाविक येथे तळीभंडार करण्यासाठी येतात. गेल्या काही वर्षात या देवस्थानाचा लोकवर्गणीतून विविध विकासकामे करुन मंदिर परिसर सुशोभित झाला असून महाराष्ट्रातील जागृत व प्रेक्षणीय तिर्थक्षेत्र म्हणून धामणीचे खंडोबा देवस्थान राज्यात ओळखले जाते. चांदीचा खंडा (तलवार) देवस्थानास अर्पण करुन खंडोबा भक्तांनी खंडोबाची निस्सीम कृपा संपादन केली असल्याचे कर्डीले यांनी यावेळी सांगितले. चांदीची तलवार अर्पण करणारे भाविक विक्रम जाधव यांचा यावेळी ग्रामस्थांनी सत्कार केला. यावेळी ग्रामस्थ व देवस्थानाचे सेवेकरी उपस्थित होते.

## कर वसुलीसाठी रांजणी ग्रामपंचायतीकडून बक्षीस योजना

**रांजणी :** रांजणी (ता. आंबेगाव ) ग्रामपंचायतीने विविध कर वसूलीसाठी खातेदारांसाठी बक्षीस योजना जाहीर केली आहे.



खातेदारांचा देखील घरपट्टी, पाणीपट्टी विविध कर भरण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती रांजणीच्या सरपंच छाया बंडेश वाघ यांनी दिली. गावातील खातेदार पाणीपट्टी, घरपट्टी असे विविध प्रकारचे कर ग्राहक वेळेवर भरत नाहीत. त्यामुळे थकबाकी होते. त्याचा गावाच्या विकासावर परिणाम होतो. रांजणी गावच्या सरपंच छाया वाघ, उपसरपंच मधुसूदन भोर व सर्व सदस्यां मध्ये नुकतीच बैठक झाली.यामध्ये खातेदारांनी कर भरावेत यासाठी खातेदारांसाठी बक्षिस योजना जाहीर करण्यात आली.सन २०२४ -२५ म्हणजेच १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये मागील व चालू घरपट्टी व पाणीपट्टी भरणाऱ्या या खातेदारांना बक्षीसे देण्यात येणार आहेत. बक्षिसांची सोडत शनिवारी (दि.२६ एप्रिल) नरसिंह मंदिरात सायंकाळी सात वाजता महाआरतीच्या वेळेस काढण्यात येणार आहे. बक्षिसांमध्ये फ्रिज, एलईडी टीव्ही, कुलर, ओव्हन, मिक्सर, शेगडी, टेबल फॅन, डिनर सेट, प्रेशर कुकर, पाण्याचे जार, भिंतीवरील घड्याळ्याचा समावेश आहे.

## दुष्काळी खैरेवाडीचा पाणीप्रश्न सुटणार



**शिक्रापूर :** खैरेवाडी (ता. शिरुर) येथील राजीव रजन लाड ट्रस्टसाठी हिवरे कुंभारचे माजी सरपंच दिपक खैरे यांच्या माध्यमातून कॅनल वरून जल योजनेतून पाणी उपलब्ध झाले असून खैरेवाडीच्या सरपंच सुलभा खैरे यांच्या हस्ते पाणी पूजन करण्यात आले आहे. खैरेवाडी येथील राजीव रजन लाड ट्रस्ट भागात पाण्याची समस्या असल्याने हिवरे कुंभारचे माजी सरपंच दिपक खैरे यांच्या पुढाकाराने येथे जल जीवन योजनेचे पाणी उपलब्ध करण्यात आले. सदर पाण्याचे पूजन भीमाशंकर कारखान्याचे चेअरमन प्रदीपदादा वळसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर सरपंच सुलभा खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी हिवरे कुंभारच्या सरपंच दिपाली खैरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अमोल जगताप, खैरेवाडीच्या सरपंच सुलभा खैरे, सामुदायिक विवाह सोहळ्याचे जनक विकास गायकवाड, समाजसेक शहाजी दळवी, उपसरपंच नयना मांदळे, श्रीकांत तळोले, माजी सरपंच नवनाथ खैरे, नंदकिशोर गोडसे, चेअरमन जालिंदर मादळे, ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त विष्णू प्रभूदेसाई, साहेबराव भाडळे, विनय घोटगे, सचिन भागवत यांसह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेअरमन राजेंद्र साळुंखे यांनी केले तर ट्रस्टच्या वतीने साहेबराव भाडळे यांनी आभार मानले.

## शिक्रापुरात सामाजिक उपक्रमाने रमाईला अभिवादन

**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील सामाजिक कार्यकर्ते कैलास घोंगडे, सुरेश घोंगडे यांच्या संकल्पनेतून रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबवत रमाईला अभिवादन करण्यात आले आहे. शिक्रापूर बजरंगवाडी भागातील एका अनाथ इसमाला कपडे वाटप तसेच तळेगाव ढमढेरे येथील आनंदाश्रम येथे पंधरा युवतींना शालेय शिक्षणासाठी आर्थिक मदत देऊन रमाबाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले, यावेळी सामाजिक कार्यकर्ते कैलास घोंगडे, सुरेश घोंगडे, विकास कदम, मुनीर शेख, अशोक घोंगडे, दशरथ इंगोले आदी उपस्थित होते. दरम्यान माता रमाई यांच्या विचाराचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी सदर उपक्रम राबवला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते कैलास घोंगडे यांनी सांगितले.

# ‘त्या’ भाच्याला कोणती शिक्षा?

## पुणे जिल्ह्यासह खेड तालुक्याचे लक्ष, एसटी बसमध्ये चालवला होता कोयता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**खेड :** मामाच्या मुलीवर एकतर्फी प्रेम करून त्या मुलीशी लग्न करायला नकार देणाऱ्या मामाचा परिवार संपवायला निघालेल्या भाच्याला कोणती शिक्षा होणार? याकडे उत्तर पुणे जिल्ह्या सह खेड तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. साडे सहा वर्षांपुर्वी झालेल्या या भयानक घटनेत आरोपी भाच्याला राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस पी पोळ यांनी शुक्रवारी दोषी ठरवले आहे. सोमवारी (दि. १०) शिक्षा सुनावण्यात येणार असल्याची माहिती विशेष सरकारी वकील अॅड सागर कोठारी यांनी दिली.

अॅड कोठारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०१८ मध्ये १२ जूनला खेड तालुक्यातील दावडी गावात ही हृदयद्रावक घटना घडली होती. प्रवाशांनी भरलेल्या एसटी बसमध्ये मामाच्या एकुलत्या एक मुलावर कोयत्याने १७ वार करून त्याला जागीच ठार करण्यात आले होते. अजित भगवान पोखरकर, वय ४०, रा.कान्हुरकर मळा, दावडी, ता.खेड असे यातील आरोपी भाच्याचे नाव आहे.

त्याचे मामाच्या मोठया मुलीवर एकतर्फी प्रेम होते. त्यातुन त्याने तिला व परिवाराला त्रास दिला. त्याच्यावर पोलिसात गुन्हा देखील नोंदविण्यात आला होता. मात्र, तरीही मामाने या मुलीशी विवाह लावून द्यावा, असा आरोपीचा आग्रह होता. भीती दाखवण्याच्या हेतुने आरोपीने मुलीच्या एकुलत्या भावाचा काटा काढायचा ठरवले.

घटना घडली त्या दिवशी भाऊ आणि मुलीची धाकटी बहीण राजगुरुनगर येथे शाळेसाठी एसटी बसने निघाली. त्यावेळी अगोदरच आरोपी मागच्या बाकावर येऊन बसला होता. बस दावडी थांब्यापासून ५०० मिटर पुढे आल्यावर त्याने मागुन येऊन हातात आणलेल्या कोयत्याने बहिणीसमक्ष भावावर सपासप वार केले. त्यात भावाचा जागीच मृत्यू झाला. श्रीनाथ सुदाम खेसे, वय १८ असे दुर्दैवी भावाचे नाव आहे. पोलीसांनी खुनाचा गुन्हा नोंद करून आरोपीला शोधुन तत्कालिन पोलिस निरिक्षक प्रदीप जाधव यांच्या पथकाने अटक केली. तेव्हापासून आरोपी येरवडा कारागृहात होता.

राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात खटला सुरू होता. विशेष नेमणुक करण्यात आलेल्या अॅड कोठारी, सहायक वकील अॅड नारायण पंडित, अॅड विनायक जगनाडे यांनी १६ साक्षीदार तपासले. त्यात फिर्यादी तथा मयत मुलाचे वडील शिवाजी खेसे, प्रत्यक्षदर्शी लहान बहिण, एसटी बसचे वाहक रहीम अख्तर यांची साक्ष महत्वाची ठरली. पोलिस निरिक्षक अरविंद चौधरी, पोलिस विजय चौधरी यांनी न्यायालयीन कामकाजात सहभाग नोंदवला. सहा वर्षांनंतर आरोपीला दोषी ठरवण्यात आले आहे. सोमवारी शिक्षा सुनावण्यात येणार आहे, असे अॅड सागर कोठारी यांनी सांगितले.

## दुचाकी चोराला नाशिकमधून अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सणसवाडी (ता. शिरुर) येथील आनंदनगर येथून भाजी विक्रेते विनोद वाघे यांच्या दुकानासमोरील रोहिदास गाडेकर यांच्या खोलीमध्ये राहणाऱ्या गुरुदास पाटील या भाडेकरु ने विनोद यांची उधारी देण्यासाठी गावावून पैसे आणि पत्नी व मुलांना आणतो असे म्हणत विनोद यांची केए ०१ जेपी ६२८१ ही दुचाकी घेउन गावाला गेला.

त्यानंतर गुरुदास पुन्हा आलाच नाही. दरम्यान खोलीमालक रोहिदास गाडेकर यांनी गुरुदास परस्पर खोली खाली करुन फरार झाल्याचे सांगितल्याने विनोद रघुनाथ वाघे (वय ३३, रा. मलठण फाटा शिक्रापूर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी गुरुदास पाटील याच्या विरुद्ध गुन्हा करत तपास केला असता, सदर आरोपी नाशिक मध्ये असल्याचे समोर आल्याने पोलीस हवालदार रविकिरण जाधव व राहुल वाघमोडे यांनी थेट नाशिक गाठत गुरुदास राजेंद्र पाटील याला ताब्यात घेत त्याच्या जवळील दुचाकी देखील जप्त केली आहे.

# एकादशी दिनी भाविकांची लोटली गर्दी

## ‘श्रीं’चे गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्पसजावट; इंद्रायणीची आरती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** येथील जया एकादशी दिनी माऊली मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रमांतुन मंदिरात एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. पन्नास हजारावर भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. एकादशी दिनी भाविकांनी मंदिर, नगरप्रदक्षिणा करीत हरिनाम गजरात श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावटीने श्रींचे रूप लक्षवेधी दिसत होते. इंद्रायणी नदी घाटावर स्वच्छता आणि इंद्रायणी आरती उत्साहात झाली. यावेळी महिला भाविकांची उपस्थिती मोठी होती.

आळंदी मंदिरात भाविकांनी परंपरेने एकादशी दिनी गर्दी करीत श्रींचे दर्शन घेतले. एकादशी दिनी श्रींचे मंदिरात पहाटे वेदमंत्र जयघोषात पवमान अभिषेक करण्यात आला. यावेळी आळंदी देवस्थांनचे उपव्यवस्थापक तुकाराम माने, श्रींचे मानकरी, पुजारी, सेवक कर्मचारी आदि उपस्थित होते. भाविकांना श्रींचे मंदिर दर्शनास प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांचे नियंत्रणात कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शन देण्याची व्यवस्था उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक, कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांचे सहकार्याने केली. मंदिरात दुपारचा फराळाचा महानैवेद्य, वारकरी शिक्षण संस्थेचे वतीने परंपरेने प्रवचन, रात्री आरती झाली. श्रींचे दर्शन, प्रदक्षिणा पूर्वी भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानास गर्दी केली. आळंदी मंदिरात भाविकांनी धुपारतीस गर्दी केली. सप्ताहातील कीर्तन सेवा हरिनाम गजरात झाली.

मंदिरात परंपरेने धार्मिक उपचार श्रीची पूजा, आरती, फराळाचा महानैवेद्य आदी धार्मिक कार्यक्रम झाले. यावेळी सुरक्षा रक्षक, सेवक आणि मंदिरातील बंदोबस्ता वरील पोलिसांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश नांदुरकर यांनी मार्गदर्शन केले. आळंदीत सुरक्षित, सुरळीत वाहतूक राहावी यासाठी आळंदी दिघी वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश नांदुरकर यांनी परिश्रम पूर्वक काम पाहिले. आळंदीतील रहदारीची वर्दळ पाहता येथे वाहतुकीचे केलेले प्रभावी नियोजन यामुळे भाविक, नागरिक यांना वाहतुकीचे कोंडीतून एकादशी दिनी मुक्तता मिळाली. आळंदीत भाविकानी पोलीस प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले. आळंदीत बेकायदेशीर वाहन पार्किंग आणि बेशीस्त वाहन चालकांवर कारवाई सुरु करण्यात आली आहे. कारवाई टाळण्यासाठी आळंदीत रस्त्यावर वाहने पार्क करू नये असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

यावेळी राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान अध्यक्षा अनिता झुजम, माजी नगरसेविका मालन घुंडरे पाटील, आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, आळंदी शहर शिवसेनेचे उपशहर प्रमुख माऊली घुंडरे पाटील, राजेश नागरे, अभियंता अजित मेदनकर, बाळासाहेब ठाकूर, सोमनाथ बेंडाले, अमर गायकवाड, नेते गजानन गाडेकर, अनिता शिंदे, शालन होनावळे, शेखरबाई कदम, लता वरतले, मानसी सोळंखे, सुनीता शेळके, पुष्पा लेंडघर, सुरेखा कुऱ्हाडे, ताई देसले आदींसह भाविक उपस्थित होते.

## सूर्यकांत वाघमारे यांची भूमिका

# पंकज धिवार हेच पुरंदर आरपीआयचे अध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुका आरपीआय आठवले गटाच्या तालुका अध्यक्षपदी पंकज धीवर हेच असल्याचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे यांनी एका पत्राद्वारे स्पष्ट केले आहे. पंकज धिवार यांच्या निवडीचा कार्यकाल संपला नसल्याने त्यांचं त्यांच्या पदावरून करण्यात आलेल निलंबन रद्द करून पंकज धिवार हेच पुरंदर तालुका अध्यक्ष म्हणून काम करतील असं स्पष्ट करण्यात आले आहे.

याबाबत एक पत्र पुणे जिल्हा अध्यक्ष श्रीकांत कदम यांना देण्यात आले आहे. यामध्ये ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे.

तर याबाबत पंकज धिवार यांनी नीरा येथे पत्रकार परिषद घेऊन या बाबतची माहिती माध्यमांना दिली आहे. यावेळी प्रवीण कांबळे ( पुरंदर तालुका उपाध्यक्ष) स्वप्नील कांबळे ( पुरंदर तालुका युवक अध्यक्ष) रवींद्र वाघमारे इत्यादी उपस्थित होते.

धीवर यांनी दिलेल्या माहिती नुसार वाघमारे यांनी या दिलेल्या पत्रामध्ये त्यांनी म्हटले आहे की, पुरंदर तालुका अध्यक्ष पंकज धिवार हे पक्षाच्या निवडणुक धोरण आणि निवडणुक कार्यक्रमानुसार अध्यक्ष पदावर विराजमान झाल्याने पक्षाचे ते अधिकृत अध्यक्ष असतांना जिल्हा अध्यक्ष श्रीकांत कदम यांनी कोणतेही ठोस कारण नसतांना त्यांना निलंबित करण्याचे पत्र दिले होते.त्यावर जिल्हा कार्यकारणी, तालुका अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक गायकवाड या सर्वांच्या लक्षात ही बाब आणून दिल्या नंतर, प्रदेश अध्यक्षांनी पंकज धिवार हेच पुरंदर तालुका अध्यक्ष म्हणून कायम राहतील असा स्पष्ट सुचना वजा आदेश दिला आहे.

# भीमाशंकरच्या आराखड्यात रस्ते आणि विकासकामांचा समावेश करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आमदार बाबाजी काळे यांची मागणी**



**खेड :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या खेड तालुक्यातील श्री भीमाशंकर देवस्थान तीर्थक्षेत्र स्थळी भाविकांना येण्या - जाण्यासाठी तसेच दर्शन व तात्पुरत्या वास्तव्यासाठी खेड तालुक्यातून सुविधा निर्माण व्हाव्यात. यासाठी राज्य सरकारने प्रस्तावित केलेल्या विकास आराखड्यामध्ये खेड तालुक्यातील नियोजित कामांचा समावेश करावा असा आग्रह आपण धरला असल्याचा खुलासा खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी केला आहे.

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे भीमाशंकर विकास आराखडा संदर्भात विशेष बैठक झाली. त्यात झालेल्या चर्चा, कामांचे नियोजन,प्रस्ताव आणि मान्यता विचारात घेता नजीकच्या काळात खेड तालुक्यातील भोरगिरी ते भीमाशंकर मार्गाचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल. खेड तालुक्यातून भीमाशंकरला भाविकांना जाता येईल, असा विश्वासदेखील आमदार बाबाजी काळे यांनी शनिवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

आमदार बाबाजी काळे म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलावलेल्या या बैठकीला माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, शिरूरचे आमदार ज्ञानेश्वर कटके, भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष अॅड सुरेश कौदरे आदी मान्यवर तसेच जिल्ह्यातील सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भीमाशंकर विकास आराखडा संदर्भात विस्तृत चर्चा झाली. गेली काही वर्षे भीमाशंकर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. मात्र तांत्रिक अडचणी आल्यामुळे प्रत्यक्षात कामे अस्तित्वात आली नसल्याचे अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर तोडगा काढण्यासाठी चर्चा झाली. प्रस्तावित कामे मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या.

आंबेगाव तालुक्यात निगडाळे येथे देवस्थानला ११ एकर जमीन देण्यात आली आहे. येथे नव्याने करण्यात येणाऱ्या कामांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. खेड तालुक्यातील भोरगिरी ते भीमाशंकर रस्ता व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यात वनक्षेत्र हद्दीतील रस्त्याला अडचण येत आहे. आराखड्यात समावेश केल्यावर ती अडचण दुर होणार असल्याची चर्चा यावेळी झाली. तसेच भोरगिरी गावातील कोटेश्वर मंदिर आणि परिसराच्या विकासासाठी गरजे नुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची खात्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. भीमाशंकर तीर्थक्षेत्री येण्याजाण्यासाठी आंबेगाव तालुक्यातुन असलेल्या मार्गाचे विकसन झाले आहे. तसेच विकसन खेड तालुक्यातील रस्त्यांचे व्हावे. मंदिराकडे जाणाऱ्या भोरगिरी मार्गावर कमान करण्यात यावी असे सुचवण्यात आले आहे. त्याला सभागृहाने तत्वतः मान्यता दिली आहे, असे आमदार बाबाजी काळे यांनी सांगितले. त्यादृष्टीने खेड तालुक्यातून भीमाशंकर कडे जाणारा मार्ग लवकर उपलब्ध होईल, अशी अपेक्षा काळे यांनी व्यक्त केली.

# वृत्तपत्र विक्रेते बाळासाहेब मंचरकर यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अवसरी :** मंचर (ता. आंबेगाव ) येथील जुन्या पिढीतील वृत्तपत्र विक्रेते राजकीय आणि धार्मिक विश्लेषक बाळासाहेब उर्फ श्रीनिवास श्रीकृष्ण मंचरकर ( वय ७८ ) यांचे निधन झाले. त्यांचा अंत्यविधी मंचर येथील तपनेश्वर वैकुंठ भूमीत झाला.

यावेळी पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते, वृत्तपत्र वितरणातील अधिकारी, राजकीय, सामाजिक आणि विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ, मान्यवर उपस्थित होते.

बाळासाहेब उर्फ श्रीनिवास मंचरकर यांचा राजकीय धार्मिक क्षेत्रातील दांडगा अभ्यास होता.

मंचर येथे जुन्या ग्रामपंचायत कार्यालजवळ एसटी स्टँड होते, तेथून तसेच नंतर मंचर बस स्थानक स्थलांतर झाल्यानंतर, मंचर गावात पायी पेपर विकण्याचे काम बाळासाहेब उर्फ श्रीनिवास यांनी केले.

ओळखीची व्यक्ती भेटल्यावर पेपर वाटताना गप्पा मारणे आणि सर्वांच्या आपुलकीने चौकशी करणे यामध्ये बाळासाहेब उर्फ श्रीनिवास मंचरकर यांचा हातखंडा होता. विशेषतः राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात त्यांचा दांडगा अभ्यास होता. वृत्तपत्रे एजंट सागर मंचरकर यांचे ते वडील तसेच ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते श्रीकांत मंचरकर यांचे ते थोरले बंधू होत.

## पोलीस असल्याच्या बहाण्याने ज्येष्ठाला लुटले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** गोलेगाव ता. शिरुर येथील गुंजाळवस्ती येथील शिरुर गोलेगाव रस्त्याने विजय जासूद हे त्यांच्या ताब्यातील दुचाकीहून चाललेले असताना, पाठीमागून दुचाकीहून आलेल्या दोघा अज्ञातांनी त्यांना आवाज देत थांबवून आम्ही पोलीस असल्याचे सांगत पुढे चेकिंग चालू आले, असे सांगत विजय जासूद यांच्या गळ्यातील सोन्याची चेन तसेच हातातील दोन अंगठ्या असा साडेतीन लाख रुपयांचा ऐवज काढून घेऊन त्यांच्या दुचाकीहून पोबारा केला. याबाबत विजय गणपत जासूद (वय ८० वर्षे रा. चव्हाणवाडी ता. शिरुर) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी दोन अज्ञात इसमांवर गुन्हा दाखल केला आहे.

## पोषण आणि शिक्षणासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम

# गावडेवाडी जिल्हा परिषद शाळेची आकर्षक परसबाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अवसरी :** गावडेवाडी (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय परसबागेची सुरेख उभारणी करण्यात आली आहे. शाळेच्या आवारातील विकसित केलेल्या या परसबागेमध्ये विविध प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्ये, तृणधान्ये, फुलझाडे तसेच औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. शाळेच्या विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या सहभागातून ही बाग जोपासली जात आहे.

परसबागेत कांदा, लसूण, कोथिंबीर, ब्रोकोली, वांगे, मिरची, काकडी, मेथी, पालक, कोबी, तूर, वाल यांसारख्या भाज्यांची लागवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर हळद, ओवा, आले, कोरफड, गवती चहा, आवळा यांसारख्या औषधी वनस्पतींचे उत्पादन घेतले जात आहे. बागेच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी जास्वंद, सदाफुली, झेंडू, गुलाब यांसारखी फुलझाडेही लावण्यात आली आहेत.

परसबागेचे विशेष आकर्षण म्हणजे मायक्रोग्रीन शेतीचा उपक्रम. विद्यार्थ्यांनी १५ कॅरेटमध्ये मूग, मटकी, हरभरा, वटाणा, मेथी, मसूर, चवळी, तुर यांसारख्या कडधान्यांची रुजवणूक केली आहे. संशोधनानुसार मायक्रोग्रीनमध्ये अंकुरित कडधान्यांपेक्षा अधिक पोषकतत्त्वे असतात. त्यामुळे शाळेच्या मध्यान्ह भोजन योजनेत मायक्रोग्रीनचा वापर केला जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक पौष्टिक व सेंद्रिय आहार मिळतो.

परसबागेची देखभाल व निगा राखण्याचे सर्व काम विद्यार्थी स्वतः करतात. यात ते खुरपणी, तण काढणे, पाणी देणे, खत टाकणे अशी विविध कामे करत असल्याने त्यांना शेतीविषयी प्रत्यक्ष अनुभव मिळतो. विशेष म्हणजे, शाळेतून निर्माण होणाऱ्या भाज्यांसाठी सेंद्रिय खत तयार करण्यासाठी पालापाचोळा आणि शिल्लक पोषण आहाराचा पुनर्वापर केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक शेतीविषयी जागृती निर्माण होते.

परसबागेच्या या नाविन्यपूर्ण संकल्पनेची दखल घेत तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेत २०२३-२४ मध्ये गावडेवाडी शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला आहे. या बागेमुळे शाळेतील विद्यार्थी शेतीविषयक प्रयोग शिकत आहेत आणि शालेय पोषण आहार अधिक समृद्ध होत आहे. गावडेवाडी शाळेचा हा उपक्रम इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

#रा

» Selected

## खेड बांधकामाला नाही कोणी वाली

### उपविभागातील अनेक कामे ठप्प, उपअभियंत्याची नेमणूक नाही

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

**शिरोली :** सार्वजनिक बांधकाम उपविभाग खेड कार्यालयालाचे उपभियंता सेवानिवृत्त झाल्यानंतर पुणे प्रकल्प विभागातील उपअभियंता यांचेकडे येथील कार्यालयाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला. खेड बांधकाम उपविभागाचा अतिरिक्त पदभार असलेले पुणे प्रकल्प विभागातील उपअभियंता हे आठवड्यातून फक्त एक दोनदा येत असल्याने खेड उपविभागातील अनेक कामे ठप्प आहेत. एक महिना झाला तरीही सार्वजनिक बांधकाम खेड उपविभाग कार्यालयाचे उपअभियंता यांची नियुक्ती नाही. पुणे जिल्ह्यात खेड तालुका हा विस्तारणे मोठा, सर्वाधिक ग्रामपंचायती आणि लोकसंख्या जास्त यामुळे तालुका अडीच ब्लॉकचा गणला गेला आहे. त्यामुळे तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग हा देखील महत्वपूर्ण आहे. खेड बांधकाम उपविभागाचे उपभियंता असलेले संजय मुरकुटे हे ३१ डिसेंबर २०२४ रोजी उपअभियंता पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर खेड बांधकाम उपविभागाचे रिक्त उपअभियंता पदावर पुणे प्रकल्प विभागाचे उपअभियंता एसएम बाळशेटवार यांना प्रतिनियुक्ती म्हणून अतिरिक्त पदभार देण्यात आला. खरंतर बाळशेटवार यांचेकडे पुणे येथील प्रकल्प बांधकाम विभागाचा पदभार असताना, त्यात त्यांना खेड बांधकाम उपविभागाचा अतिरिक्त पदभार दिल्याने दोन्ही ठिकाणी काम करताना ते खेडच्या कार्यालयात आठवड्यातून एकदोन दिवस येत असल्याने अनेक कामे रखडली आहेत. खेड तालुका मोठा असल्याने तालुक्यात अनेक ठिकाणी इमारती, रस्त्यांची कामे, पुलांची कामे तर काही रस्त्यांची दुरुस्ती अशी अनेक कामे सुरू असून, ही कामे अंदाजपत्रकानुसार केली जातात का? आणि ती कामे गुणवत्तापूर्वक आहेत का? याची प्रत्यक्ष कामावर जाऊन पाहणी करणे आवश्यक आहे. नागरिकांचे शंकांचे निराकरण कोण करणार त्याचबरोबर कामावर नियंत्रण म्हणून कार्यालयाचे प्रमुख उपअभियंता हे दररोज उपस्थित असणे गरजेचे आहे, अशी भावना बोलून दाखवली जात आहे.

#### खेड बांधकामचा कारभार रामभरोसे

- पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत उत्तर विभागात खेड, मावळ, जुन्नर, आंबेगाव तालुक्यामध्ये घोडेगाव एक, घोडेगाव दोन, शिरूर आणि पुणे प्रकल्प विभाग असे उपविभाग आहेत. अनेक कामानिमित्त कार्यालयात आलेल्या व्यक्तीला साहेब पुण्याला मीटिंगला आहेत किंवा आले नाहीत अशीच उत्तरे कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून मिळत आहेत. या कार्यालयाचे प्रमुख दररोज येत नसल्याने कर्मचाऱ्यांना मोकळीक सापडली तर अन्य अधिकारी कुठे आहेत यांचा मेळ नाही. या उपविभाग कार्यालयातील एखाद्या सिनिअर शाखा अभियंता यांच्याकडे जरी प्रभारी उपअभियंता पदाचा पदभार दिला असता तरी अडचणी वाढल्या नसत्या. सध्यातरी खेड बांधकामचा कारभार रामभरोसे सुरु असल्याचे बोलले जाते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खेड उपाविभागाचे उपअभियंता पदावर तात्काळ पद नियुक्ती करावी अशी मागणी होत आहे.

## वैष्णव ठाकूर याचा विक्रम; वेटलिफ्टिंगमध्ये उचलले १६० किलो



**शिरोली :** खेड तालुक्यातील पिंपरी बुद्रुक गावचा सुपुत्र वैष्णव शहाजी ठाकूर या राष्ट्रीय खेळाडूंने उत्तरखंड राज्यात झालेल्या राष्ट्रीय वेटलिफ्टिंगच्या स्नॅच स्पर्धेत १६० किलो वजन उचलून विक्रम केला. तसेच वेटलिफ्टिंग स्पर्धेत ३३५ किलो वजन उचलून त्याने द्वितीय क्रमांक पटकाविला. उत्तराखंड राज्यात राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धा संपन्न झाल्या. वैष्णव ठाकूर या राष्ट्रीय खेळाडूने वेटलिफ्टिंगच्या प्रकारातील स्नॅच स्पर्धेत १६० किलो वजन उचलून विक्रम केला.वेटलिफ्टिंग स्पर्धेत ३३५ किलो वजन उचलून द्वितीय क्रमांक मिळविला.या यशाबद्दल त्याचे मित्रपरिवार,नातेवाईक व ग्रामस्थांनी अभिनंदन करून त्याचा सत्कार केला.भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील यांनी संतोषनगर येथील भाजपच्या कार्यालयात वैष्णव ठाकूर याचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. वेटलिफ्टिंगच्या स्नॅच स्पर्धेत १५७ किलो वजन उचलण्याचा विक्रम जगदीश विश्वकर्मा या खेळाडूच्या नावावर होता. परंतु वैष्णव उत्तराखंड मध्ये झालेल्या स्नॅच स्पर्धेत वैष्णव ठाकूर याने १६० किलो वजन उचलून विक्रम आपल्या नावावर नोंदविला आहे. यापूर्वी हिमाचल प्रदेश येथे झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत ठाकूर याने सहावा क्रमांक मिळविला होता. तर आता नुकत्याच उत्तराखंड राज्यात झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत स्नॅच मध्ये विक्रम करून वेटलिफ्टिंग स्पर्धेत त्याने दुसरा क्रमांक मिळविला. ऑगस्ट २०२५ मध्ये राष्ट्रकुल स्पर्धा होणार असून या स्पर्धेत उतरण्याचा प्रयत्न असून त्या प्रमाणे मेहनत सुरु आहे. आई आणि वडील यांचे खेळासाठी नेहमी प्रोत्साहन व भक्कम पाठिंबा आहे. राष्ट्रकुल स्पर्धेतील गोल्ड मेडल मिळविण्याचे स्वप्न असल्याचे वैष्णव ठाकूर याने बोलून दाखविले.

## महादू जिजाबा जांभळे यांचे निधन



**शिरोली :** वासुली गावचे प्रसिद्ध बैलगाडा मालक आदर्श शेतकरी रेशनिंग दुकानदार महादू जिजाबा जांभळे यांचे वयाचे ८२ वर्षी निधन झाले. त्यांचे मागे २ मुलगे, पत्नी, सुना, बहिण, पुतने, नातवंडे, भाचे असा मोठा परिवार आहे. उद्योजक दत्तात्रय जांभळे व सुखदेव जांभळे यांचे ते वडिल होत.

# पुरंदर विमानतळ : अस्वस्थता कायम

## शेतकऱ्यांना विस्थापित व्हावे लागणार असेल तर प्रकल्प कोणासाठी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** पुरंदरमधील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प पुण्याच्या विकासासाठी महत्वाचा असून कोणत्याही परिस्थितीत पूर्ण होणारच. यामुळे पुणे आणि परिसराचा विकास झपाट्याने होणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे येथील कार्यक्रमात जाहीर सांगितले असून, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त परतावा देण्याचेही सुतोवाच त्यांनी केले आहे. मात्र मुख्यमंत्र्याच्या याच विधानावरून पुरंदरच्या शेतकऱ्यांमध्ये पुन्हा एकदा अस्वस्थता निर्माण झाली आहे. पुण्याच्या विकासासाठी पुरंदरच्या शेतकऱ्यांना कायमचे विस्थापित व्हावे लागत असेल तर प्रकल्प नक्की कोणासाठी, असा प्रश्न येथील शेतकरी उपस्थित करीत आहेत.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, कुंभारवळण, एखतपूर मुंजवडी आणि खानवडी अशा सात गावांमध्ये विमानतळ प्रकल्प जाहीर झाला असून या गावांतील २८३५ हेक्टर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. यामध्ये गावठाण वगळले जाणार असल्याचे शासनाने सांगितले आहे. विशेष म्हणजे संपादित केलेल्या जागेतच चार ते पाच किलोमीटर लांबीच्या दोन धावपट्ट्या पूर्व पश्चिम करण्यात येणार आहेत. आणि वनपुरी पासून सलग पारगावचे अंतर पाहिल्यास सात ते आठ किलोमीटर आहे. त्यामुळे धावपट्टीमधून गावठाण कसे वगळणार, हा प्रश्नही निर्माण झाला आहे.

शासनाने नुकतेच पुरंदर तालुक्यात रेल्वेचा विस्तार करण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली असून रेल्वे आता पारगावच्या मार्गावरून थेट विमातळपर्यंत मालाची ने आण करण्यासाठी नवीन मार्गक्रमिका करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे हडपसर वरून दिवे घाट मार्गे सासवड, बोपदेव घाट मार्गे तसेच जेजुरी ते उरुळीकांचन, भोर, नारायणपूर ते सासवड. आणि सासवडवरून वाघापूर अशा सर्व बाजूने रस्त्यांचे चौपदरी ते सहापदरी जाळे करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे या रस्त्यांच्या मार्गातील सासवडवरून कुंभारवळण, एखतपूर मुंजवडी, खानवडी, पारगाव हा रस्ता पूर्णपणे वगळण्यात आला असल्याचे दिसत आहे. त्यामुळे तालुक्यात रस्त्यांचे जाळे निर्माण करून सासवडवरून पूर्वेकडे केवळ वनपुरी मार्गे वाघापूर हा एकच मार्ग विस्तारण्याचे दिसून येत आहे.

#### खानवडीमधील गावठाण कसे वाचविणार?

- खानवडीमध्ये शासनाने आंतरराष्ट्रीय मुलींच्या शाळेची उभारणी सुरू केली असून त्यासाठी गावाकडून केवळ सात एकर जागेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले. त्याचबरोबर याच परिसरात सौर उर्जा प्रकल्पासाठी जागेची मागणी केली, परंतु ग्रामस्थांनी त्यास जाहीर विरोध केला. असे असताना जिल्हाधिका-यांनी तब्बल 55 एकर क्षेत्रावर ताबा टाकला आहे. त्यातील 35 एकर क्षेत्रावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून येत्या सहा महिन्यात पूर्ण करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे गावालाच आता गावठाणसाठी जागा उरलेली नाही. तर उर्वरित जागेवर विमानतळ प्रकल्प करण्याचे निश्चित आहे. मग गावठाण कसे वाचविणार? असा प्रश्न आहे.

#### ...विस्थापित का व्हायचे?

- पुण्याच्या विकासासाठी शासनाचा पुरंदरच्या विमानतळासाठी अट्टाहास सुरू असला, तरी प्रकल्प पासून जवळपास 10 किलोमीटर परिसरात रस्त्यांचे जाळे असून विमानतळवर थेट वाहतूक होईल. त्यामुळे परिसरात त्याचा कितपत फायदा होईल. तसेच पुरंदर पासून सर्व परिसराला त्याचा निश्चित फायदा होणार असला तरी ज्या भागात प्रकल्प होणार आहे. त्या परिसरातील नागरिकांना कायमचे विस्थापित व्हावे लागत असेल तर प्रकल्प नक्की कोणासाठी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

त्यामुळे वनपुरी आणि उदाचीवाडी या दोन गावांच्या उत्तरेकडील भाग वगळता दक्षिणेकडील भागासह इतर सर्व गावे आणि गावठाण उठविण्यात येणार असल्याचे दिसून येत आहे.

# बांगलादेशींचे नारायणगाव कनेक्शन

## घुसखोरांपाशी आढळले आधारकार्ड : संबंधितांवर गुन्हे दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नारायणगाव :** नाशिक शहरातील आडगाव परिसरातून शहर पोलिसांनी आठ बांगलादेशी नागरिकांना पकडले असून त्यापैकी तीन बांगलादेशी नागरिकांकडे नारायणगाव (ता. जुन्नर) येथील आधारकार्ड आढळून आले आहे, अशी माहिती आडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन खैरनार यांनी दिली. त्यामुळे बांगलादेशींचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

बांगलादेशी नागरिक अवैधरित्या भारतात आले असून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात अनधिकृत वास्तव्य करीत असल्याचा संशय पोलिसांना आहे. म्हणूनच प्रशासकीय पातळीवर मोठ्या प्रमाणात तपास यंत्रणा काम करीत असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे काम चालू आहे. नाशिक जवळील आडगाव येथून पोलिसांनी आठ बांगलादेशी नागरिकांना पकडले असून अवैधरित्या भारतात आल्याचे उघड झाले आहे.

> नाशिक जवळील आडगाव येथून आठ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. अवैधरित्या भारतात राहत असल्याचे उघड झाले असून त्यापैकी तीन बांगलादेशी नागरिकांकडे नारायणगाव येथील आधार कार्ड असल्याचे निष्पन्न झाले आहे. लवकरच पुढील तपास करून दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे.
> –**सचिन खैरनार,** पोलीस निरीक्षक, आडगाव पोलीस ठाणे

त्यापैकी अलीम सुआनखान मंडल (वय ३२), अलअमीन अमीनुर शेख (वय २२), मोसिन मोफिजुल मुल्ला (वय २२) यांच्याकडे आधार कार्ड व रहिवासी दाखले नारायणगाव येथून काढण्यात आले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

नाशिक पोलिसांना नारायणगाव येथील कोल्हे मळा, भुजबळ चाळ येथील रहिवासी दाखला मिळून आला असून, संशयिताने ग्रामपंचायतीतील एका महिलेस हाताशी धरून आधार कार्ड काढल्याचे समोर आले आहे.

काही दिवसांपूर्वी नारायणगाव येथे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर पोलिसांनी कारवाई केली होती. चुकीच्या पद्धतीने आधार कार्ड अथवा महत्त्वाचे कागदपत्र बांगलादेशी नागरिकांना उपलब्ध करून दिले जात असतील तर संबंधितावर कारवाई होणे गरजेचे असल्याची चर्चा होऊ लागली आहे.

## साखर कारखान्यांना मोठ्या संधी : हर्षवर्धन पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** साखर निर्यातीमधून चांगला फायदा मिळवण्यासाठी साखर कारखान्यांनी स्पर्धात्मक राहण्यासाठी उच्च गुणवत्ता राखण्यावर भर दिला पाहिजे. जागतिक बाजारातील मागणी अभ्यासपूर्णरित्या समजून घेऊन आणि त्यांची पूर्तता करून साखर कारखान्यांना भविष्यात निर्यातीच्या संधी वाढवू शकतात, असे मत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

पुणे येथे कॉफको इंटरनॅशनल च्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीच्या सहकार्याने आयोजित शुगर कनेक्ट-२०२५ या परिसंवादामध्ये हर्षवर्धन पाटील बोलत होते.

हर्षवर्धन पाटील म्हणाले की, जगातील साखर बाजारातील बदलत्या धोरणानुसार सतर्क राहणे आवश्यक आहे.जागतिक साखर बाजारपेठेत भारताची भूमिका कायम महत्वाची राहिलेली आहे. आगामी काळातही भारत हा जागतिक बाजारपेठेत मजबूत राहण्यासाठी व्यापारातील बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम आहे. जागतिक साखर व्यापारामध्ये महाराष्ट्र राज्याची भूमिका देखील कौतुकास्पद राहिलेली आहे. २०२१-२२ च्या हंगामात भारताने ११० लाख टन साखरेची विक्रमी निर्यात केली, तेव्हा ७० टक्के पेक्षा अधिकचे योगदान देऊन महाराष्ट्राने जागतिक साखर व्यापारात महत्वाची भूमिका बजावलेली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी केले.

## भिगवण येथील उपबाजारात नवीन ज्वारीची आवक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** इंदापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भिगवण येथील उपबाजारात भुसार मार्केटमध्ये रविवारी नविन ज्वारीची आवक सुरू झालेली आहे. ज्वारीला प्रति क्विंटल ३५०० तर गहू प्रति क्विंटल ३५०० या उच्चांकी दराने विक्री झालेला आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती तुषार जाधव यांनी दिली.

शेतकऱ्यांना इंदापूर-अकलूज रस्त्यालगतच्या बाजार आवारात धान्य सफाई यंत्र सुविधा उभारली असून प्रति तास ५ टन क्षमतेने धान्य सफाई केली जाते. तसेच इंदापूर बाजार समितीने शेतमाल तारण योजनाही सुरू केलेली आहे. याचा फायदा शेतमाल बांधवांनी घ्यावा. बाजार समितीने मुख्य बाजार इंदापूर मार्केट ६० टन, शिवलिलानगर-इंदापूर अकलूज रस्त्यालगत ८० टन, उपबाजार भिगवण, निमगांव-केतकी व वालचंदनगर येथे ६० टन व क्षमतेचे भुईकाटा (वे-ब्रिज) असून त्यांची २४ तास सेवा उपलब्ध आहे.

शेतकरी बांधवांनी बाजार समितीचे विविध योजना व उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके, माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांनी केलेले आहे.

यावेळी संचालक माजी आमदार यशवंत माने, विलास माने, दत्तात्रय फडतरे, मधुकर भरणे, रोहित मोहोळकर, संग्रामसिंह निंबाळकर, संदीप पाटील, रुपाली वाबळे, मंगल झगडे, आबा देवकाते, संतोष गायकवाड, अनिल बागल, दशरथ पोळ, रोनक बोरा, सुभाष दिवसे, सचिव संतोष देवकर उपस्थित होते.

## दळे कुटुंबातील तब्बल पाच भावंडे पोलीस दलात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** वळती (ता. आंबेगाव ) येथील दळे कुटुंबातील तब्बल पाच भावंडे पोलीस दलात यशस्वीपणे काम करत आहेत. विशेष म्हणजे या दळे कुटुंबातील कोणीही पोलीस दलात, शासकीय सेवेत नव्हते.परंतु या पाचही भावंडांनी अपार मेहनत, कष्ट करून हे यश मिळवले आहे. त्यामुळे दळे कुटुंब व या पाचही भावंडांवर वळती गाव आणि पंचक्रोशीतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

वळती गावातील बांधकाम व्यवसायिक केरभाऊ दळे यांचा मुलगा प्रवीण दळे हा सुरुवातीला पोलीस दलात भरती झाला. त्या अगोदर दळे कुटुंबातील कोणीही पोलीस दल, शासकीय सेवेत देखील नसताना देखील प्रवीण याने अपार कष्ट, मेहनत करून पोलीस भरतीत यश मिळवले. प्रवीण सध्या पिंपरी चिंचवड शहर क्राईम ब्रांच युनिट (४) मध्ये कार्यरत आहे.

> वीस वर्षांपूर्वी पोलीस भरती विषयी अजिबात माहिती नव्हती. परंतू पोलिस होण्याचे ध्येय उराशी बाळगून नियमित धावण्याचा सराव ,व्यायाम सुरु ठेवला.त्यानंतर पुण्यात जाऊन पोलीस भरती विषयीची पुस्तके खरेदी केली. त्यातून अभ्यास करून यश मिळवले.आणि माझ्या मागच्या लहान भावांना देखील मी मार्गदर्शन केले. त्यांनीही अपार कष्ट, मेहनत करून यश मिळवले. - **प्रवीण दळे,** पुणे पोलिस.







त्यानंतर सारंग दळे याने देखील प्रवीणच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सेवेत जाण्याचे ध्येय बाळगले. सारंगने मैदानावर प्रचंड मेहनत घेऊन पोलीस भरतीत यश मिळवले. तो सध्या वाघोली पोलीस ठाण्यात कार्यरत आहे.

त्यानंतर मयूर दळे यानेही आपल्या दोन भावांचा कित्ता गिरवत प्रचंड मेहनतीला जिद्दीची जोड देऊन तो केंद्रशासनाच्या सशस्त्र सीमा बलात भरती झाला. तो सध्या उत्तर प्रदेशात (पलिया) येथे कार्यरत आहे. त्यानंतर त्यांचा सख्खा चुलत भाऊ वैभव भिमाजी दळे देखील पोलीस सेवेत भरती झाला. तो सांगली येथे पोलीस दलात काम करत आहे आणि नुकत्याच मुंबईत पार पडलेल्या पोलीस भरतीत आशुतोष दगडू दळे यानेही यश मिळवले आहे.

- प्रवीण, सारंग, मयूर हे तीनही भाऊ वडील केरभाऊ दळे यांना बांधकाम व्यवसायात मदत करायचे. बांधकामे करतानाच मैदानावरील सराव, पुस्तकांचा अभ्यास करून या भावंडांनी यश मिळवले आहे.वैभवने देखील आई-वडिलांबरोबर मिळेल ते काम करून नियमित अभ्यास,मैदानावरील सराव करून यश मिळवले.आशुतोष याने तर अक्षरक्षः शेळ्या मेंढ्या वळण्याचे काम करताना पोलीस भरतीच्या पुस्तकांचा अभ्यास करून पोलिस होण्याचे ध्येय अखेर गाठलेच.

# कांद्याच्या आवकेत घट; दरात किंचित वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याच्या आवकेत घट होऊन दरात किरकोळ वाढ झाली. लसुन, हिरवी मिरची व काकडीची विक्रमी आवक झाली. कारली, आले व बटाट्याचे भाव स्थिर राहिले आहेत. पालेभाज्यांची भरपूर आवक झाल्याने पालेभाज्यांच्या दरात किंचित घसरण झाली. एकूण उलाढाल ५ कोटी, ९० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ४,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १,५०० क्विंटलने घटल्याने भावात ५०० रुपयांची वाढ झाली. कांद्याचा कमाल भाव २,५०० रुपयांवरून ३ हजार रुपयांवर पोहोचला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १ हजार क्विंटलने घटूनही कमाल भाव २,००० रुपयांवर स्थिर राहिले. लसणाची एकूण आवक २५ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १५ क्विंटलने वाढून भावात ८ हजार रुपयांची घट झाली. लसणाचा कमाल भाव २५,००० रुपयांवरून १७ हजार रुपयांवर स्थिरावला.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३८२ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला. ओल्या भुईमुग शेंगांची एकूण आवक ३ क्विंटल झाली असून, या शेंगांना ८ हजार रुपयापर्यंत कमाल भाव मिळाला.



चाकण बाजारात कांद्याची झालेली आवक. ( छाया - अविनाश दुधवडे , चाकण )

## लसूण, हिरवी मिरची व काकडीची मोठी आवक, एकूण उलाढाल ५ कोटी ९० लाख रुपये...

**पालेभाज्या :** चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे : मेथी - एकूण १७ हजार ५०० जुड्या ( ८०० ते १,२०० रुपये ), कोथिंबीर - एकूण २० हजार ४५० जुड्या ( ७०० ते १,००० रुपये,), शेपू - एकूण ४ हजार २६० जुड्या ( ६०० ते ८०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ९५० जुड्या ( ४०० ते ६०० रुपये),.

**जनावरे :** चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४५ जर्शी गाईपैकी ३२ गाईची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), ११० बैलांपैकी ९० बैलांची विक्री झाली. ( १०,००० ते ४०,००० रु.), ११५ म्हशीपैकी ९५ म्हशींची विक्री झाली.( २०,००० ते ८०,००० रु.), १० हजार ५७० शेळ्या - मेंढ्यापैकी १०,२३० शेळ्यांची विक्री झाली. ( २,००० ते १५,००० रु.),.



#### शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :

- कांदा - एकूण आवक - ४,५०० क्विंटल. भाव क्रमांक - १. ३,००० रुपये, भाव क्रमांक २. २,५०० रुपये, भाव क्रमांक ३. २,००० रुपये.
- बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक १. २,००० रुपये, भाव क्रमांक २. १,५०० रुपये, भाव क्रमांक ३. १,३०० रुपये.
- फळभाज्या -
- फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -
- टोमॅटो - ३३० क्विंटल ( ५०० ते १,००० रू. ), कोबी - २४५ क्विंटल ( ४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २३६ क्विंटल ( ६०० ते १,००० रु.), वांगी - ८४ क्विंटल ( १,५०० ते २,५०० रु.), भेंडी - ८० क्विंटल ( ३,००० ते ४,५०० रु.), दोडका - ५८ क्विंटल ( ३,५०० ते ४,५०० रु.), कारली - ७२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), दुधीभोपळा - ६२ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), काकडी - १०३ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), फरशी - ७९ क्विंटल ( १,५०० ते २,५०० रु.), वालवड - ५२ क्विंटल ( ३,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - १७४ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), चवळी - ४० क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), शेवगा - ३० क्विंटल ( ५,००० ते ६,००० रु.), गाजर - २५५ क्विंटल ( १,५०० ते २,००० रु.), गवार - ५२ क्विंटल ( ५,००० ते ८,००० ), वाटाणा - ३८० क्विंटल ( २,००० ते २,५००), आले - १९० क्विंटल ( २,००० ते ४,००० ).,

# ३१ डिसेंबरपर्यंत आजारी रजा नाही



सोशल मीडियावर एक पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. व्हायरल झालेल्या या पोस्टमध्ये कार्यालयाचे नियम स्पष्ट करण्यात आले. ३१ डिसेंबरपर्यंत कर्मचाऱ्यांना सुटी मिळणार नसल्याचेही सांगण्यात आले. कंपनीच्या या ऑर्डरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली. याशिवाय कर्मचाऱ्यांना आजारी रजाही मिळणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. याचा सरळ अर्थ असा की, कर्मचारी आजारी असला तरी त्याला कार्यालयात यावे लागेल.

या आदेशाच्या प्रतीमध्ये २५ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला सुटी मिळणार नाही, असे लिहिले होते. याशिवाय कंपनीने आजारी रजेवर बंदी घातली आहे. यावर कंपनीचा युक्तिवाद असा आहे, की हा कालावधी सर्वात व्यस्त काळ आहे. भरपूर काम आहे, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे खूप महत्वाचे आहे. त्यामुळे आम्ही सर्व प्रकारच्या सुट्ट्यांवर बंदी घातली आहे. या व्हायरल पोस्टमध्ये कंपनीचे नाव समोर आले नसले, तरी ही कंपनी आपल्या तुघलगी फर्मानामुळे सतत चर्चेत असते. नुकतेच पुण्यातील एका कंपनीत काम करणाऱ्या तरुणीचा मृत्यू झाला होता. त्याचे कारण विषारी कार्यसंस्कृती मानले जात होते. यानंतर बाजार नियामक 'सेबी'च्या कर्मचाऱ्यांनीही विषारी कार्यसंस्कृतीची तक्रार केली. अर्थ मंत्रालयाला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे, की 'सेबी'चे नेतृत्व विषारी कार्य संस्कृतीला प्रोत्साहन देत आहे.



# भिकाऱ्याने दिली पाच कोटींची मेजवानी!

पाकिस्तानातून एका मेजवानीत मिठाई, शेवया, बिर्याणी, पुलाव, कोरमा आणि काय काय नाही अशी धक्कादायक घटना समोर आली आहे. या मेजवानीला सुमारे २० हजार लोक उपस्थित होते. या घटनेतील आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या कुटुंबाने या मेजवानीचे आयोजन केले होते, ते कुटुंब व्यवसायाने भिकारी असून भीक मागून आपला उदरनिर्वाह चालवते. राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेमुळे अनेकदा टीकेला सामोरे जाणाऱ्या पाकिस्तानलाही 'भिकारी देश' या लेबलचा फटका बसला आहे; मात्र एक अनोखी आणि धक्कादायक बाब म्हणजे देशातील व्यावसायिक भिकारीही प्रचंड संपत्तीचे मालक आहेत आणि कधी कधी समाजातील त्यांच्या 'भिकारी' या ओळखीच्या वर उठून लोकांना धक्का बसेल अशी कामे करतात. एका रिपोर्टनुसार, हा कार्यक्रम गुजरनवाला येथील राहवली रेल्वे स्टेशनजवळ झाला. पंजाबच्या विविध भागातून हजारो लोक यात सहभागी झाले होते. भिकारी कुटुंबाने या मेजवानीवर सुमारे पाच कोटी पाकिस्तानी रुपये खर्च केले, जे सुमारे १.२५ कोटी भारतीय रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी पाकिस्तानातील एका कुटुंबाची आहे, जी भीक मागून जगते;पण आपल्या मेहनतीने आणि प्रामाणिकपणाने त्यांनी इतकी प्रगती केली, की त्यांनी त्यांच्या आजीच्या चाळीसाव्या (चाळीसाव्या दिवसाच्या प्रार्थनेच्या दिवशी) २०,००० लोकांना जेवण दिले. परिस्थिती कशीही असो, मेहनत आणि चांगल्या हेतूने कोणतेही ध्येय गाठता येते, हे या कुटुंबाने दाखवून दिले.

# एका केळीची किंमत ५२ कोटी!

केळी खाण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागत नाहीत. बाजारात केळी ४० ते ७० रुपये डझनने विकली जात आहेत; पण एका सामान्य केळीची किंमत ५२ कोटी रुपये असू शकते? होय, न्यूयॉर्कमध्ये एका लिलावादरम्यान एक केळी ५२ कोटी रुपयांना विकली गेली!

भिंतीवर टेप केलेल्या केळीच्या वैचारिक कलाकृतीला न्यूयॉर्कच्या लिलावात तब्बल ६.२ दशलक्ष डॉलर्स मिळाले. त्यात प्रसिद्ध क्रिप्टोकरन्सी व्यावसायिकाकडून सर्वाधिक बोली लागली. 'कॉमेडियन' आणि इटालियन कलाकार Maurizio Cattelan यांनी तयार केलेल्या, केळीच्या या कलाकृतीने २०१९ मध्ये आर्ट बासेल मियामी बीचवर पदार्पण केले, तेव्हा जगाचे लक्ष वेधून घेतले. चांदीच्या डक्ट टेपसह पांढऱ्या भिंतीवर सुरक्षित केलेली एकटी पिवळी केळी ही एक युक्ती आहे की कलाविश्वाची खरी उत्कृष्ट नमुना आहे यावर पाहुणे वाद घालत राहिले. त्यामुळे भाव वाढले. बोली आठ लाख डॉलरपासून सुरू झाली; परंतु काही मिनिटांतच ती ४० लाख डॉलरपर्यंत गेली.

लिलावकर्ता ऑलिव्हर बार्कर म्हणाला, की खरेदीदार अतिरिक्त १ दशलक्ष डॉलर्स देईल. अंतिम हॅमरची किंमत ५.२ दशलक्ष डॉलर झाली, त्यानंतर एका व्यावसायिकाने ही केळी ५०२ दशलक्ष डॉलरमध्ये विकत घेतली.

असे असतानाही लिलावाचे पैसेही व्यापारी १० लाख रुपयांच्या खोलीत भरणार आहेत. त्यानुसार या केळीची किंमत ६.२ दशलक्ष रुपये आहे जी भारतीय बाजारपेठेत ५२ कोटी रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी सोशल मीडियावर पसरताच लोकांमध्ये खळबळ उडाली आणि ५२ कोटी रुपये किमतीच्या केळीमध्ये विशेष काय आहे याची उत्सुकता निर्माण झाली. सोशल मीडिया यूजर्सनी केळी विकत घेतलेल्या व्यक्तीबद्दल ही व्यक्ती एकतर खूप श्रीमंत आहे किंवा तो वेडा झाला आहे, अशा प्रतिक्रिया नोंदवल्या.





# झेंगडू शहरात सात सूर्य!

चीनच्या चेंगडू शहराच्या आकाशात अचानक सात सूर्य दिसायला लागले! हे अप्रतिम दृश्य पाहून तुमचा तुमच्या डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. अनेक वेळा निसर्ग असे काही दाखवतो, जे केवळ निसर्गाच्या नियमांमुळेच शक्य होते. महान योद्धे निसर्गाचे शोषण पाहून आश्चर्यचकित आणि अस्वस्थ होतात. अशीच एक घटना चीनमधून समोर आली आहे, जिथे आकाशात असे दृश्य दिसले, की कल्पना करणेही अशक्य होते. चीनच्या आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले आणि पाहणारे लोकही थक्क झाले. हे प्रकरण चीनच्या चेंगडू शहराचे आहे, जिथे आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले, ही विलक्षण आणि अविश्वसनीय घटना तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. १८ ऑगस्ट रोजी काढलेला हा व्हिडीओ काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाला. हे विलक्षण दृश्य आकाशात सुमारे एक मिनिट दिसले. 'डिम सन डेली एचके'ने दिलेल्या वृत्तानुसार, चेंगडू येथील एका स्थानिक व्यक्तीने हा व्हिडीओ आपल्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. या व्यक्तीने सांगितले, की आकाशात हे दृश्य पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले आणि लोकांचे पाय



जिथे होते तिथेच थांबले. ही घटना चीनमधील लोकांमध्ये चर्चेचा विषय बनली आहे. तज्ज्ञांचे असे मत आहे, की आकाशात सात सूर्य नाहीत किंवा ते कुठल्या जादूने आलेले नाहीत, उलट परावर्तनाचा परिणाम म्हणजे आकाशात असे दृश्य दिसले आहे. प्रकाशाच्या परावर्तनातील ऑप्टिकल भ्रमामुळे ही घटना घडली आहे. या घटनेचे मुख्य कारण म्हणजे प्रकाशाच्या अपवर्तनाची क्रिया आणि स्तरित काचेच्या परावर्तनामुळे होणारा सामान्य ऑप्टिकल भ्रम आहे.

# अन्नदानाचा विश्वविक्रम

तेलंगणाच्या गौतमकुमारने अनोखा विश्वविक्रम केला आहे. त्याने दिवसभरात एक हजारपेक्षा जास्त गरीबांना अन्नदान केलं. 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने त्याच्या या कामगिरीची दखल घेतली आहे. या संस्थेतर्फे गौतमचा सन्मानही करण्यात आला. हैदराबादमध्ये रहाणाऱ्या गौतमकुमारची स्वत:ची एनजीओ आहे. या एनजीओच्या माध्यमातून तो सामाजिक कार्य करतो. २०१४ मध्ये त्याने ही एनजीओ सुरू केली. सर्व नीडी असं त्याच्या संस्थेचं नाव असून कोणालाही उपाशी झोपावं लागू नये, हा या संस्था स्थापनेमागचा उद्देश आहे. जास्तीतजास्त लोकांना अन्नदान करण्याचा संकल्प त्याने सोडला आहे. त्याच्या संस्थेचे १४० कार्यकर्ते यासाठी झटत असतात. गौतमकुमारने हैदराबादमधल्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन गरजूंना भोजन दिलं. आधी तो गांधी हॉस्पिटलमध्ये गेला. तिथल्या गरीब रुग्णांना खायला दिलं. मग राजेंद्र नगरमध्ये जाऊन अन्नदान केलं आणि शेवटी अम्मा नन्ना अनाथालयात तो गेला. हा विक्रम केल्यानंतर 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने त्याला प्रमाणपत्र दिलं.



# मिठाच्या खाणींमधला स्पा

बेलारूसमध्ये वैद्यकीय पर्यटनाचं प्रमाण बरंच जास्त आहे. इथे मिठाच्या खाणींचं रुपांतर स्पामध्ये करण्यात आलं आहे. हे अनोखे स्पा लोकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहेत. जमिनीपासून ४०० मीटर खोल हे स्पा आहेत. या स्पामध्ये उपचार करून घेण्यासाठी दरवर्षी काही हजार पर्यटक बेलारूसला येतात. बेलारूसमधल्या खाणी तसंच बोगद्यांमध्ये मीठ आणि पोटॅशियम मोठ्या प्रमाणावर आढळतं. याचा उपयोग विविध विकारांवरच्या उपचारांसाठी केला जातो. इथे येणाऱ्या लोकांना मन:शांती तर मिळतेच शिवाय अस्थमा, ॲलर्जी आणि श्वसनाचे विकारही दूर होतात. राजधानी मिन्स्कपासून १३० किलोमीटर अंतरावर १९९१ मध्ये पहिलं नॅशनल स्पीलिओथेरपी क्लिनिक सुरू झालं. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांमध्ये रशियन लोकांची संख्या अधिक असते. इथे टीव्ही, इंटरनेटसारख्या सोयी नाहीत पण विविध प्रकारचे व्यायाम करता येतात. काही काळ निवांतपणे घालवता येतो. मीठाच्या खाणींमधल्या स्पामध्ये २ ते ३ दिवस रहाता येतं. दोन आठवडे रहाण्यासाठी एक हजार डॉलर म्हणजे ७० हजार रुपये इतका खर्च आहे. एक वेगळा अनुभव म्हणून इथे जायला काहीच हरकत नाही.





# मधमाशा झाल्या गायब

जागतिक तापमान वाढ, कमी होत जाणारे अधिवास यामुळे प्राणी, पक्षी, किटक यांची संख्या कमी होत चालली आहे. प्राणी–पक्ष्यांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याचा जीवसृष्टीवर विपरित परिणाम होऊ शकतो. इंग्लंडच्या पूर्व भागात मधमाश्यांच्या १७ प्रजाती नष्ट झाल्याचं अधिकृतरित्या जाहीर करण्यात आलं आहे. यात ग्रेट येलो बंबल बी आणि पॉटर फ्लॉवर बी सारख्या दुर्मिळ प्रजातीच्या मधमाश्यांचा समावेश आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर च्या अहवालात ही बाब नमूद करण्यात आली आहे. या घटनेकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नाही. ही धोक्याची घंटा असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत मधमाश्यांचं मोठं योगदान आहे. मधमाश्यांच्या कमी संख्येमुळे शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत प्रत्येकाला त्रास होणार आहे. ब्रिटनमधल्या सफरचंदाच्या शेतीसाठी मधमाश्यांची गरज असते.

या मधमाश्या विविध माध्यमातून ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत भारतीय चलनात सहा हजार कोटी रुपयांचं योगदान देत होत्या. मात्र आता इथली शेती, मधुमक्षिका पालन, फळांची लावगड यावर परिणाम होणार आहे. या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची गरज सर्वच स्तरातून व्यक्त होते आहे.

# वराशिवाय होतं लग्न

लग्नात वराला म्हणजे नवऱ्या मुलाला प्रचंड महत्त्व असतं. त्याची सरबराई केली जाते. प्रत्येक इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न होतो. वधू पक्षाकडचे तर वराच्या दिमतीला हजर असतात. वरातीत नवरा मुलगा घोड्यावर बसून मिरवत असत–ो. त्याच्या खाण्यापिण्याची पूर्ण व्यवस्था केलेली असते. मात्र आपल्या देशात लग्नाच्या विविध पद्धती असतात. प्रथा, परंपरा आणि विधी असतात. प्रत्येक जात, धम र्नुसार लग्नविधींमध्ये वैविध्य आढळतं. काही लग्नांमध्ये महिला वरातीत जात नाहीत. मात्र एका समाजातल्या लग्नात नवरा मुलगा वरातीत नसतो. राजस्थानातल्या छोटा उदयपूर भागातल्या आदिवासी समाजात अशी परंपरा आहे. लग्नात नवऱ्या मुलाऐवजी त्याची अविवाहित बहिण किंवा कुटुंबातली अविवाहित महिला सहभागी होते. नवरा मुलगा आईसोबत घरीच थांबतो. या प्रथेबद्दल ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. वरातीत वराची बहिणच सहभागी होते. गंमत म्हणजे लग्नाचे सगळे विधी तिच पार पाडते. सप्तपदीचा विधीही ही बहिणच पार पाडते. इथल्या तीन गावांमध्ये अशी परंपरा आहे. ही प्रथा मोडली तर वाईट गोष्टी घडतील या भीतीने कोणीही ही पद्धत मोडायला धजावत नाही. नवऱ्याशिवाय संपन्न होणारं लग्न म्हणजे विचित्रच प्रकार म्हणायला हवा.



# वाजतच नाहीत बारा



बाराचा टोला पडला की चांगलीच धावपळ सुरू होते. मध्यान्ह सुरू झाल्याची ही वर्दी असते. रात्रीच्या बाराच्या टोल्याला सर्व जण झोपायची तयारी करू लागतात. घड्याळात नेमाने दोन वेळा बाराचे टोले पडतात. पण एखाद्या घड्याळ्यात बारा वाजतच नसतील तर? जगात असं एक घड्याळ आहे. स्वीत्झर्लंडच्या सोलोथर्न शहरात हे विचित्र घड्याळ आहे. या शहरातल्या टाउन स्क्वेअरमध्ये हे घड्याळ पहायला मिळतं. गंमत म्हणजे या घड्याळात फक्त ११ आकडे आहेत. १२ हा आकडाच नाही. १२ न वाजणारी बरीच घड्याळं इथे आहेत. यामागचं कारण मजेशीर आहे. इथल्या लोकांना ११ हा आकडा खूप आवडतो. त्यांच्यादृष्टीने हा आकडा शुभ मानला जातो. या शहरातल्या अनेक वस्तूंची रचना अकरा आकड्याप्रमाणे केल्याचंही पहायला मिळतं. या शहरातल्या चर्च आणि चॅपलची संख्या ११ आहे. इथलं सेंट उसूर्स हे प्रमुख चर्च ११ वर्षांत बांधून तयार झालं होतं. या चर्चला ११ दरवाजे आहेत तसंच ११ घंटा बांधण्यात आल्या आहेत. इथले लोक अकरावा वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा करतात. याबाबतच्या काही आख्यायिका इथे प्रसिद्ध आहेत.

जगातलं सर्वात उंच एव्हरेस्ट शिखर सर करण्याची चढाओढ सध्या पहायला मिळते आहे. एव्हरेस्टच्या मार्गावर गिर्यारोहकांची मोठी गर्दी झाली आहे. इथे ट्रॅफिक जॅमसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. एव्हरेस्टची चढाई खूप कठीण असते. मात्र शेर्पा कामी रिता यांनी २४ वेळा हे शिखर सर केलं आहे. अशी कामगिरी करणारे ते जगातले पहिलेच व्यक्ती आहेत. वयाच्या बाराव्या वर्षापासून कामी रिता एव्हरेस्टच्या बेस कँपपर्यंत गिर्यारोहकांच्या गरजेचं सामान पोहोचवण्याचं काम करतात. जवळपास ११ वर्षं त्यांनी हे काम केलं.

१९९२ मध्ये त्यांना पहिल्यांदा एव्हरेस्ट चढण्याची संधी मिळाली. ही चढाई करण्याआधी त्यांनी एव्हरेस्टच्या वातावरणाची पूर्ण माहिती घेतली. १९९४ मध्ये कामी पहिल्यांदा एव्हरेस्टच्या कँप ४ पर्यंत म्हणजे २५,९३८ फूट उंचीवर पोहोचले. त्यानंतर त्यांनी नियमितपणे अशी चढाई सुरू केली. एका वर्षात दोन वेळाही ते एव्हरेस्ट चढले आहेत. शेरपा म्हणून जगातल्या सात खंडांमधल्या सात शिखरांवर चढण्याचा विक्रमही कामी रिता यांच्या नावे आहे. नेपाळमधल्या थेमू गावात कामी रिताचा जन्म झाला. वडिलांना एव्हरेस्ट चढण्याची खूप इच्छा होती. मात्र काही कारणांमुळे हे शक्य झालं नााही.

आता कामी आपल्या वडिलांची ही इच्छा पूर्ण करत आहेत. कामीचे मोठे भाऊ लाकपा रिताही १७ वेळा एव्हरेस्ट चढले आहेत. आपण अजून तंदुरूस्त असून साठीपर्यंत एव्हरेस्ट सर करत रहाणार असल्याचं कामी रिता सांगतात. त्यांच्या या उत्साहाला सलाम केला पाहिजे.



# एव्हरेस्टचे कलंदर



## नॅथन लायन 'अशी' कामगिरी करणारा जगातील ७वा गोलंदाज

**ऑस्ट्रेलियाचा अनुभवी ऑफ-स्पिन गोलंदाज नॅथन लायनने श्रीलंकेविरुद्ध गॅले स्टेडियमवर खेळल्या जात असणाऱ्या मालिकेतील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दिनेश चांदीमलची विकेट घेत त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ५५० बळी पूर्ण केले. कसोटी क्रिकेटमध्ये हा आकडा गाठणारा नॅथन लायन आता ७ वा गोलंदाज ठरला आहे. दुसऱ्या कसोटीच्या तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस ऑस्ट्रेलियन संघाने विजयाकडे पावले टाकली. त्या आधी श्रीलंकेच्या संघाने त्यांच्या दुसऱ्या डावात ८ विकेट गमावून २११ धावा केल्या. ज्यामुळे त्यांच्या खात्यात फक्त ५४ धावांची आघाडी जमा झाली. लायनच्या आधी, ऑस्ट्रेलियाच्या फक्त दोन गोलंदाजांनी कसोटी क्रिकेटमध्ये ५५० किंवा त्याहून अधिक बळी घेण्याचा पराक्रम केला आहे. यामध्ये दिग्गज फिरकी गोलंदाज शेन वॉर्न आणि वेगवान गोलंदाज ग्लेन मॅकग्रा यांच्या नावाचा समावेश आहे. वॉर्नने ७०८ तर मॅकग्राने ५६३ बळी घेतले. आता लायनचा या पंक्तीत बाबतीत समावेश झाला आहे. त्याच्या नावावर ५५२ बळी जमा झाले आहेत.**

# रो'हिट'मॅन शो

## रोहित शर्माचे शतक! : रविंद्र जडेजाच्या ३ विकेट्स




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कटक :** भारतीय क्रिकेट संघाने रविवारी इंग्लंडविरुद्ध दुसऱ्या वनडे सामन्यात ४ विकेट्सने विजयाला गवसणी घातली. यासह भारतीय संघाने तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. कर्णधार रोहित शर्मा भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याला उपकर्णधार शुभमन गिलचीही चांगली साथ मिळाली. या सामन्यात भारतीय संघासमोर इंग्लंडने ३०५ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग भारताने ४४.३ षटकात ६ विकेट्स गमावत पूर्ण केले. भारताकडून रोहितने शतकी खेळी केली.




### रवींद्र जडेजाने कुंबळेला टाकले मागे

- रवींद्र जडेजाने पुन्हा एकदा भारताकडून शानदार गोलंदाजी केली आणि १० षटकांच्या कोट्यात ३५ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. अशाप्रकारे जडेजाने एकदिवसीय सामन्यात मोठी कामगिरी केली. रवींद्र जडेजाने बेन डकेट, जो रूट आणि जेमी ओव्हरटनला बाद केले. यासह, जडेजाने इंग्लंडविरुद्ध सर्वाधिक विकेट्स घेण्याचा अनिल कुंबळेचा मोठा विक्रम मोडला. जडेजा आता इंग्लंडविरुद्ध भारताकडून सर्वाधिक विकेट्स घेणारा दुसरा गोलंदाज ठरला आहे.
- या बाबतीत अश्विन पहिल्या क्रमांकावर आहे. अश्विनने तिन्ही फॉरमॅटमध्ये इंग्लंडविरुद्ध १५० विकेट्स घेतल्या आहेत. दरम्यान, दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या जडेजाच्या नावावर ११९ विकेट्स आहेत. अनिल कुंबळेने इंग्लंडविरुद्ध ११७ विकेट्स घेतल्या आहेत. नागपूरमध्ये खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात रवींद्र जडेजानेही ३ विकेट्स घेतल्या होत्या. या काळात त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६०० विकेट्स पूर्ण करण्याचा विक्रम केला.

# ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेला घरात घुसून हरवलं

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील अंतिम मालिका श्रीलंका व ऑस्ट्रेलियादरम्यान खेळवण्यात आली. दोन सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेला घरच्या मैदानावर २-० ने पराभूत केले. मालिकेतील पहिला सामना ऑस्ट्रेलियाने २४२ ने जिंकला. तर दुसऱ्या सामन्यात ७५ धावांचं सोपं आव्हान स्वीकारलं. एक विकेट गमावत ऑस्ट्रेलियाने लक्ष्य गाठले व दुसरा सामनाही ९ विकेट्सने जिंकला.

दुसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २५७ धावा केल्या. ज्यामध्ये आपल्या कारकिर्दितील अंतिम कसोटी सामना खेळणारा दिमुथ करूणारत्ने अर्धशतक ठोकले. त्याचबरोबर कुसल मेंडीसने ८५ धावांची नाबाद खेळी केली. मिचेल स्टार्क, मॅथ्यू कुहनेमन, नेथन लायनच्या गोलंदाजीसमोर श्रीलंकन फलंदाजांचा निभाव लागू शकला नाही. डावात तिघांनीही प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या.

त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाने दमदार फलंदाजी करत धावांचा डोंगर उभारला. डावात कर्णधार स्टीव्ह स्मिथने शतकी खेळी केली, तर ॲलेक्स केरीने दीडशतक ठोकले. दोघांनी चौथ्या विकेटसाठी २५९ धावांची भागीदारी केली. स्मिथने २५४ चेंडूत १३१ धावा केल्या. ॲलेक्स केरीने १५ चौकार व २ षटकारांसह १५६ धावां ठोकल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४१४ धावा उभारत सामन्यात १५७ धावांची अघाडी घेतली.

ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेचा दुसरा डाव २३१ धावांवर गुंडाळला. या डावात अँजेलो मॅथ्यू व कुसल मेंडिसने अर्धशतकी खेळी केली. पण मॅथ्यू कुहनेमन व नेथन लायनने प्रत्येकी ४-४ विकेट्स घेत श्रीलंकेला गुंडाळले. ७५ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने १ विकेट्स गमावत १७.४ षटकांत पूर्ण केले. सलामीवीर उस्मान ख्वाजा २७ व मार्नस लाबूशेनने २६ धावांची नाबाद खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

# साची सुपरकिंग्ज्, रिस्क्राईब संघांची विजयी सलामी



**पुणे :** लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डी२ तर्फे आयोजित 'लायन्स् प्रीमियर लीग' २०२४-२५ टेव्टी-२० क्रिकेट स्पर्धेत साची सुपरकिंग्ज् आणि रिस्क्राईब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत शानदार विजयी सलामी दिली. सहकानगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूलच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अशोक अय्यर याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर साची सुपरकिंग्ज् संघाने रिस्क्राईब संघाचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना रिस्क्राईब संघाने ११८ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये सतिश देवोकर (३१ धावा), संतोष पुणेकर (२५ धावा) आणि समाधान दांडेकर (२२ धावा) यांनी संघाचा डावाला आकार दिला. अशोक अय्यर याने ३० धावांमध्ये ४ गडी बाद करून अचूक गोलंदाजी केली. हे लक्ष्य साची सुपरकिंग्ज्ने १९.५ षटकात पूर्ण केले. अरविंद चौहान याने ४४ धावांची तर, संतोषकुमार सांगळे याने २१ धावांची खेळी केली आणि संघाचा विजय साकार केला. विजय नवले याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर रिस्क्राईब संघाने योगेश व्हिक्टर्सचा ६ गडी राखून केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या योगेश व्हिक्टर्स संघाचा डाव १०५ धावांवर मर्यादित राहीला. सिकंदर पाटील (२९ धावा) आणि योगेश भोंगळे (२० धावा) यांनी संघाला शंभर धावांचा टप्पा गाठून दिला. विजय नवले याने ८ धावांमध्ये ३ गडी बाद केले. रिस्क्राईब संघाने १२.५ षटकात व ४ गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले. आनंद कामठे याने ४१ धावा आणि संतोष पुणेकर याने ३९ धावांचे योगदान देत संघाचा विजय सकार केला.

# महाराष्ट्राची सुदेष्णा वेगवान धावपटू, संजीवनीला सुवर्ण



**नवी दिल्ली :** नाशिकची खेळाडू संजीवनी जाधव हिने दहा हजार मीटर्स धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकून ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिला दिवस गाजविला. सातारा येथील खेळाडू सुदेष्णा शिवणकर हिने वेगवान धावपटूचा मान मिळविला, तर पुरुषांच्या गटात पुण्याचा खेळाडू प्रणव गुरव याला शंभर मीटर्स धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक मिळाले. राजीव गांधी क्रीडा संकुलातील गंगा आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स स्टेडियमवर आज या स्पर्धेचा पहिला दिवस महाराष्ट्राच्या दृष्टीने आनंददायी ठरला. सुदेष्णा शिवणकर हिने १०० मीटर धावण्याची शर्यत ११.७६ सेकंदात जिंकली. प्रणव गुरव याने शंभर मीटर्स धावण्याची शर्यत १०.३२ सेकंदात पार केली. त्याला अगदी थोडक्यात सुवर्णपदकाने हुलकावणी दिली. महिलांच्या दहा हजार मीटर शर्यत संजीवनी हिने ३३ मिनिटे ३३.४७ सेकंद या वेळेत पूर्ण केले. या शर्यतीमध्ये सुरुवातीपासूनच तिने आघाडी घेतली होती आणि शेवटपर्यंत तिने ही आघाडी कायम ठेवली. किंबहुना शेवटच्या टप्प्यात तिने साडेतीनशे मीटर्सची आघाडी घेतली होती. तिचे या स्पर्धेतील हे दुसरे सुवर्ण पदक आहे. यापूर्वी तिने याच क्रीडा प्रकारात एक रौप्य व एक सुवर्णपदक जिंकले होते. यंदा विजेतपद राखायचे माझे ध्येय होते आणि त्या दृष्टीनेच मी या शर्यतीचे नियोजन केले होते. सुवर्णपदकासाठी चिवट लढत झाली असती, तर विक्रमी वेळ नोंदविली असती. मोठी आघाडी होती तरीही सातत्यपूर्ण वेग ठेवला होता, असे २८ वर्षीय खेळाडू संजीवनी हिने सांगितले. संजीवनी ही नाशिक येथे ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विजेंदर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज ५ ते ६ तास सराव करीत आहे. ती येवला येथे तालुका क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत आहे.

# पाकविरुद्धच्या पहिल्या सामन्यात रचिनला दुखापत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पाकिस्तान, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात तिरंगी मालिका खेळवली जात आहे. पाकिस्तान त्याचे आयोजन करत आहे. शनिवारी झालेल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडने यजमान संघाचा ७८ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. हा सामना लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळवण्यात आला.

सामन्यात क्षेत्ररक्षण करताना न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रच्या डोक्यावर चेंडू लागला, त्याच्या डोक्यातून रक्त येऊ लागले, त्यानंतर त्याला मैदानाबाहेर नेण्यात आले. सोशल मीडियावर असा दावा केला जात आहे की रचिनला ही दुखापत फ्लड लाईट्समधील बिघाडामुळे झाली.



कमी प्रकाशामुळे, तो झेल नीट ओळखू शकला नाही आणि चेंडू त्याच्या डोळ्याजवळ लागला. यानंतर चाहते फ्लड लाईट्सबद्दल विविध टिप्पण्या देत आहेत. रचिन रवींद्र जखमी झाला ३८ व्या षटकात क्षेत्ररक्षण करताना रचिन रवींद्रला दुखापत झाली. मायकेल ब्रेसवेलने चांगल्या लांबीचा चेंडू टाकला आणि खुशदिल शाहने तो स्वीप केला. चेंडू मिड-विकेटवरून रचिनच्या दिशेने गेला, त्याने तो पकडण्याचा प्रयत्न केला पण तो चेंडू ओळखू शकला नाही. चेंडू थेट रचिनच्या कपाळावर लागला आणि रक्तस्त्राव सुरू झाला. डोक्यावर कापड बांधून सपोर्ट स्टाफने त्याला मैदानाबाहेर काढले. रचिन पुन्हा मैदानावर येऊ शकला नाही, त्याने दुसरा सामना खेळणे कठीण वाटते.

# बाराशे धावपटूंनी दिला 'रन फॉर किडनी'चा संदेश; 'सेवा भवन दौड़' आशुतोष पात्राने जिंकली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'सेवा भवन' या पुण्यातील रुग्णसेवा प्रकल्पातर्फे रविवारी आयोजित 'सेवा भवन दौड़'मध्ये उत्साहाने सहभागी होत बाराशे धावपटूंनी 'रन फॉर किडनी हेल्थ' हा संदेश दिला. 'सेवा भवन दौड़'च्या दहा किलोमीटर गटात आशुतोष पात्रा विजेता ठरला. युवकांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

'सेवा भवन दौड़'मधील दहा किलोमीटर गटाच्या शर्यतीचा प्रारंभ रविवारी सकाळी सव्वासहा वाजता महर्षी कर्वे संस्थेतून करण्यात आला.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, लेखक, दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, 'गिरिप्रेमी'चे उमेश झिरपे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, 'सेवा भारती'चे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघटनमंत्री श्रीपाद दाबक, 'आयर्न मॅन' निखिलेश पंत यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सेवा भवन दौड़' हा उपक्रम झाला. ही शर्यत आशुतोष पात्रा याने जिंकली. त्याने ही शर्यत ४० मिनिटे ४९ सेकंद या वेळेत पूर्ण केली. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतून पाच किलोमीटरच्या शर्यतीचा प्रारंभ करण्यात आला. या शिवाय 'चॅरिटी रन' हा उपक्रमही आयोजित करण्यात आला होता. अशी माहिती प्रमोद गोऱ्हे यांनी दिली.




### 'सेवा भवन दौड़'मधील विजेते

- दहा किलोमीटर (पुरुष गट) - आशुतोष पात्रा - प्रथम, पंकज कश्यप - द्वितीय, अन्वय नेहरकर - तृतीय
- दहा किलोमीटर (महिला गट) - अमृता मांडवे - प्रथम, अमृता सोनसळे - द्वितीय, उज्ज्वला मरगळे - तृतीय
- दहा किलोमीटर (साठ वर्षांवरील गट) - जयंत पाठक - प्रथम, राजेंद्र गुजराथी - द्वितीय, प्रशांत वडके - तृतीय

# मुंबई इंडीयन्सच्या नावे आणखी एक ट्रॉफी

**नवी दिल्ली :** जभरातील ट्वेंटी-२० लीग्समध्ये मुंबई इंडियन्स फ्रँचायझी आपले वर्चस्व राखून आहे. MIने काल दक्षिण आफ्रिकेत ११ वी ट्वेंटी-२० लीग जिंकली. कर्णधार राशिद खानच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सने SA20 लीगमध्ये विजेतेपद पटकावले. एमआय केप टाऊन विरूद्ध सनरायझर्स इस्टर्न केप यांच्यामधील अंतिम सामन्यात मुंबईने ७६ धावांनी विजय मिळवला व चषकावर आपले नाव कोरले. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना एमआय केप टाऊन संघाने ८ बाद १८१ धावा उभारल्या. ज्यामध्ये सलामीवीर रासी वान डर डुसेन व रायन रिकेल्टनने यांनी पहिल्या विकेटसाठी ३० चेंडूत ५१ धावांची भागीदारी केली. त्यानंतर मागोमाग मुंबईच्या ३ विकेट्स गेल्या. रायन रिकेल्टन (३३), रासी वान डर डुसेन (२३) व रिझा हेन्ड्रीक्स शून्यावर परतला. कॉनर एस्टरहुइझेन २६ चेंडूत ३९ धावा उभारल्या, तर डेवाल्ड ब्रेव्हिसने ३८ धावांचे योगदान दिले. त्यानंतर एमआयचा डाव घसरला. पण मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी विजय सोपा केला. सनरायझर्स इस्टर्न केप संघाच्या अवघ्या ३ खेळाडूंनी दुहेरी धावा केल्या. ज्यामध्ये टॉनी डे झोर्झी (२६), टॉम एबेल (३०), त्रिस्तन स्टब्स (१५) धावा केल्या. इतर खेळाडूंना ५ पेक्षा जास्त धावा करता आल्या नाहीत. रबाडाच्या वेगवान गोलंदाजीने ४ फलंदाजांना माघारी पाठवले. ट्रेन्ट बोल्ड व जॉर्ज लिंदे यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. कॉर्बिन बॉश व कर्णधार राशिद खानला प्रत्येकी एक विकेट घेण्यात यश आले. इंडियन प्रिमिअर लीग या सर्वात मोठ्या क्रिकेट लीगमध्ये मुंबई इंडियन्स संघाने ५ विजेतेपदे पटकावली आहेत.

# हॉकी महाराष्ट्राच्या पुरुष संघाची छाप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हॉकी महाराष्ट्राच्या पुरुष संघाने एक्सपोजर आणि एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत मैत्रीपूर्ण हॉकी सामन्यांत हॉकी क्लब इंटर-मोल, बेल्जियमविरुद्ध दोन्ही सामन्यांत विजय मिळवले. मात्र, महिला संघाला नेदरलँड्सच्या एचसी ब्लोमेंडालकडून पराभूत व्हावे लागले. नेदरलँड्ससोबतच्या पहिल्या हॉकी महाराष्ट्र एक्स्पोजर आणि एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर-पिंपरी येथे मैत्रीपूर्ण सामने खेळवण्यात आले.

तीन दिवसीय हॉकी फेस्टमध्ये युरोपमधील उत्कृष्ट संघ आमनेसामने आले. त्यात हॉकी क्लब इंटर-मोल बेल्जियम या पुरुष संघाचा समावेश होता. कलेक्टिव्ह माइंड्स फाउंडेशनच्या सौजन्याने हा संघ सहभागी झाला. हा प्रोग्राममागे हॉकीद्वारे दोन्ही देशांमधील अनुभवांची देवाणघेवाण करण्याची योजना होती. त्याचप्रमाणे एचसी ब्लोमेंडाल, नेदरलँड महिला संघाचा भारताच्या दौऱ्यात समावेश होता. ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता डच खेळाडू फ्लोरिस जॅन बोवेलँडर यांच्या नेतृत्वाखाली बोव्हेलँडर फाउंडेशनच्या सहकार्याने संघ सहभागी झाला.

प्रदर्शनीय सामने ३ दिवस आयोजित करण्यात आले. पहिले दोन दिवस पुरुष संघ खेळले. त्यानंतर महिलांनी प्रत्येकी एक सामना खेळला. शेवटच्या दिवशी दोन्ही संघ पुन्हा आमनेसामने आले. त्यानंतर मैत्रीपूर्ण स्पर्धेची सांगता झाली.

या स्पर्धेत हॉकी महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिलांचे प्रतिनिधित्व त्यांच्या राखीव संघांनी केले होते. हॉकी महाराष्ट्र पुरुष संघाने मायदेशातील श्रेष्ठत्व दोन्ही सामने सहज जिंकले. प्रथम त्यांनी ३-१ असा विजय मिळवला. त्यानंतर प्रतिस्पर्धी संघाचा ५-० असा धुव्वा उडविला.

# ट्रेंट बोल्टने केला जगातील सर्वात अनोखा विक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** न्यूझीलंडचा महान वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टने जगातील सर्वात अनोखा विक्रम रचला आहे. ट्रेंट बोल्टचे नाव आता इतिहासाच्या पानांवर नोंदवले गेले आहे. ट्रेंट बोल्ट हा एकाच फ्रँचायझीच्या चार वेगवेगळ्या संघांसह चार टी-२० विजेतेपद जिंकणारा जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. ट्रेंट बोल्टने शनिवारी हा मोठा पराक्रम केला, जेव्हा त्याच्या एमआय केपटाऊनने त्यांचे पहिले एसए२० जेतेपद पटकावले. एसए२० २०२५ च्या अंतिम सामन्यात एमआय केपटाऊनने सनरायझर्स ईस्टर्न केपचा ७६ धावांनी पराभव करत ट्रॉफीवर नाव कोरले.

ट्रेंट बोल्ट हा रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता, ज्याने २०२० मध्ये आयपीएलचे जेतेपद पटकावले होते. ट्रेंट बोल्टने २०२३ मध्ये एमआय न्यू यॉर्कसह मेजर लीग क्रिकेट मध्ये जेतेपद, २०२४ मध्ये एमआय एमिरेट्ससह इंटरनॅशनल लीग टी-२० मध्ये आणि शनिवार ८ फेब्रुवारी २०२५ रोजी एमआय केपटाऊनसह एसए२० विजेतेपद जिंकले. यासह, ट्रेंट बोल्ट एकाच फ्रँचायझीच्या चार वेगवेगळ्या संघांसह चार टी-२० जेतेपद जिंकणारा जगातील पहिला खेळाडू ठरला आहे.

# १६ वर्षाखालील कसोटी क्रिकेट स्पर्धेत पहिल्या डावात डीव्हीसीए संघाचे वर्चस्व

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणी यांच्या वतीने आयोजित लायन्स क्लब करंडक १६ वर्षाखालील कसोटी क्रिकेट स्पर्धेत ओम पाटील(१०८धावा)याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर डीव्हीसीए संघाने चोंधे पाटील क्रिकेट अकादमीविरुद्ध पहिल्या डावात आज दिवस अखेर २२२ धावांची आघाडी घेतली आहे.

फोर स्टार ग्राउंड हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी डीव्हीसीए च्या रूद्र पाटील(४-८), प्रज्योत गुंडाळे(२-१४), रुहुल्ला नदाफ(२-१७)यांनी केलेल्या सुरेख गोलंदाजीपुढे चोंधे पाटील क्रिकेट अकादमीचा डाव २९.२ षटकात सर्व बाद ५६ धावावर संपुष्टात आला. याच्या उत्तरात आज दिवस अखेर डीव्हीसीए संघाने ५० षटकात ४ बाद २७८ धावा केल्या. यात ओम पाटीलने १३५ चेंडूत १३ चौकाराच्या मदतीने १०८ धावांची खेळी केली. त्याला अभिषेक टोपनोने ६२ धावा, प्रज्वल मोरेने ७९ धावा काढून साथ दिली. दोन्ही संघातील अजून एक दिवसाचा खेळ शिल्लक आहे. दुसऱ्या सामन्यात पहिल्या दिवशी प्रथम फलंदाजी करताना क्रीक ९ क्रिकेट अकादमी संघाने ८२ षटकात सर्वबाद २४१ धावा केल्या.





## दमदार खेळीसह उभारली भक्कम धावसंख्या

# शम्स मुलानी, तनुष ठरले मुंबईसाठी तारणहार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सुरुवातीचे फलंदाज कितीही नावाजलेले असले तरी ते अपयशी ठरणे आणि तळाच्या फलंदाजांनी डाव सावरणे हे मुंबई संघाचे तयार झालेले समीकरण उपांत्यपूर्व फेरीतही कायम राहिले. शम्स मुलानी (९१) आणि तनुष कोटियन (९७) मुंबईसाठी तारणहार ठरले. या दोन मोठ्या खेळींच्या सात बाद ११३ अशा दारुण संकटात सापडलेल्या मुंबईला पहिल्या डावात ३१५ धावांपर्यंत मजल मारता आली.

ईडन गार्डनवर सुरू असलेल्या रणजी उपांत्यपूर्व फेरीचा हा सामना मुंबईसाठी यंदाच्या मोसमातील इतर काही सामन्यांसारखाच होता. रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल आणि श्रेयस अय्यर खेळत असतानाही घरच्या मैदानावर जम्मू काश्मीरविरुद्धच्या साखळी सामन्यात पहिल्या दिवशी अशीच दाणादाण उडाली होती; मात्र यावेळी मुलानी आणि कोटियन मदतीला धावले, त्यामुळे त्यातल्या त्यात दिलासा मिळाला. या सामन्यात सूर्यकुमार यादव खेळत आहे; पण त्याने घोर निराशा केली.



ईडन गार्डनच्या खेळपट्टीवर थोड्या प्रमाणात हिरवे गवत आहे, त्यातच सकाळी असलेले थंड वातावरण चेंडू स्वींग होण्यास पुरेसे होते. तरीही अजिंक्य रहाणेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली आणि पहिल्या चेंडूपासून चार फलंदाजांच्या दांड्या गुल झाल्या. सात बाद ११३ अशी अवस्था झाली तेव्हा प्रथम फलंदाजीचा निर्णय पुन्हा एकदा चुकल्याचे स्पष्ट होत होते. हरियानाच्या मध्यमगती गोलंदाजांकडे काही विशेष वेग नाही; मात्र त्यांचे चेंडू चांगले स्वींग होत होते. अंशुल कंबोजने सामन्यातील पहिल्याच चेंडूवर आयुष म्हात्रेची मधली यष्टी उखडली आणि तेथेच धोक्याची घंटा वाजली. दुसरा सलामीवीर आकाश आनंदने दोन चौकारांसह १० धावा केल्या; परंतु सुमीर कुमारच्या षटकातील अखेरच्या चेंडूवर त्याची उजवी यष्टी उडाली.

#रा